**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८१७

निर्णय दिनांक  १८-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पद्मशील रामचंद्र ढाले,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),<br>औरंगाबाद ग्रामीण. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>औरंगाबाद ग्रामीण. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. पद्मशील रामचंद्र ढाले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),पोलीस अधीक्षक कार्यालय,औरंगाबाद ग्रामीण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.१०.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याबद्दलचे आपले प्रतिकूल अभिप्राय नोंदवून, आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि. ७.८.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ४.२.२००८ ते ७.८.२००८ या कालावधीतील पोलीस अधीक्षक कार्यालयातील त्यांच्या स्वतःच्या प्रकरणासंबंधाने काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये,- "प्रोबेशनर पी.एस.आय.कु. उज्वला दिवाण यांनी माझ्या विरुध्द केलेला दि. ५/२/०८ रोजीचा अर्ज त्या अनुषंघाने केलेला संपूर्ण चौकशी अहवाल (जबाब, माझे उत्तर चौकशी अधिकाऱ्याचे मत), चौकशी अहवालावार केलेली कार्यवाही स्पे.आय.जी.औ.बाद रेंज यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत, दि. ८/७/०८ रोजी मी मा.एस.पी.औ.बाद (ग्रा) यांना केलेले निवेदन व त्यावरील कार्यवाहीची प्रत" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कलम ८(१)(छ) या कलमांतील तरतुदींनुसार व सुरक्षा प्रयोजनासाठी देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या या प्रपत्र 'ब' मध्ये तारखेचा कोणताही उल्लेख केलेला नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १५.९.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीने प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.९.२००८ रोजी केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दि. ३०.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आपला निर्णय कळविला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांच्या कृतीशी सहमती दर्शवून अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती त्या कालावधीमध्ये ते जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), औरंगाबाद यांच्या कार्यालयात कंत्राटीकरारपध्दतीने 'विधी अधिकारी वर्ग-ब' या पदावर कार्यरत होते. सदर कंत्राटाचा कालावधी दि. २५.२.२००८ रोजी संपला आहे. दि. ५.२.२००८ रोजी परिविक्षाधीन महिला पोलीस उपनिरीक्षक कु. उज्ज्वला दिवाण यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण),औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या वर्तनाविषयी तक्रार केली असून, त्यांनी केलेल्या या तक्रारीवरुन त्यांच्या सेवेच्या करारास दि. २५.२.२००८ नंतर मुदतवाढ दिली गेली नाही. परिणामी त्यांना आपली नोकरी गमवावी लागली. तसेच या प्रकरणाची वर्तमानपत्रामध्ये जाहीर वाच्यता होऊन (औरंगाबाद लोकमत,दि.७.२.२००८) त्यांच्या समाजातील प्रतिष्ठेला धक्का बसला व त्यांचे सामाजिक जीवन उध्वस्त झाले. त्यांचा कोणताही अपराध नसताना त्यांना विनाकारण आपली नोकरी गमवावी लागली व आपले सामाजिक स्थान पूर्ववत करण्याकरिता त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक कु.उज्ज्वला दिवाण यांनी केलेल्या तक्रारीची माहिती हवी आहे. केवळ ही माहिती प्राप्त झाल्यानेच ते आपले सामाजिक स्थान परत मिळवू शकतील.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आयोगासमोर, आयोगाचे कार्यालयातून त्यांना दि.२.११.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने सूचना देऊनही व दि. १४.११.२००८ रोजी दुपारी १२ वा. पोलीस उपनिरीक्षक श्री. साबळे यांना दूरध्वनीद्वारे निरोप देऊनही, विनापरवानगी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने सखेद नोंद घेतली असून पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाची नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८(१)(छ) अन्वये नाकारली आहे. अधिनियमातील कलम ८(१)(छ) मध्ये - 'जी माहिती प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल,अशी माहिती', जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नाकारता येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन व त्यांचा वरील युक्तिवाद लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी ज्या कलमाच्या आधारे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे, ते कलम या प्रकरणी खरोखरी लागू होते किंवा कसे, हे प्रथम ठरविणे गरजेचे आहे.

या घटनाक्रमामध्ये परिविक्षाधीन महिला पो.उ.नि. यांनी तक्रार केली आहे, हे सर्वश्रुत आहे व या प्रकरणाची बातमी औरंगाबाद येथील दै.लोकमत या वर्तमानपत्रात दि. ७.२.२००८ रोजी

प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे तक्रारीचा स्त्रोत अपिलार्थीसच नव्हेतर,जनसामान्यांना देखील अवगत झाला आहे. तसेच तक्रारदार स्वत: परिविक्षाधीन पोलीस अधिकारी असल्याने त्यांच्या जीवितास, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रकट केल्याने कोणताही धोका निर्माण होईल, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याकरिता दिलेल्या कारणाचे स्पष्टीकरण करण्यासाठी तसेच त्यावर युक्तिवाद करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचा कोणताही अधिकृत प्रतिनिधी देखिल आयोगासमोर हजर नाहीत. या संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन करता, विशेषत: अपिलार्थीस कोणत्याही कारणाशिवाय नोकरीस मुकावे लागले असल्याने व त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेस हानी पोहोचल्यामुळे, त्यांना, त्यांच्या बचावाची संधी देणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे. केवळ सदर माहिती प्राप्त झाल्यानंतरच अपिलार्थी त्यांचा बचाव मा. न्यायालयासमोर करु शकत आहेत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती दिल्याने, वर नमूद केल्याप्रमाणे, अधिनियमातील कलम ८(१)(छ) च्या तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग होईल, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे, हे सर्व पाहता, अपिलार्थीने त्यांच्या दि. ७.८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देय ठरत आहे. अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पत्र दिलेले आहे. याचा अर्थ, त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) नुसार वेळीच कारवाई पूर्ण केली आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ७.८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच एक दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच एक दिवसांचे आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः १८.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पद्मशील रामचंद्र ढाले,साहस होम्स, गारखेडा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),पोलीस अधीक्षक कार्यालय,औरंगाबाद ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,औरंगाबाद ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१४९३

निर्णय दिनांक १८-११-२००८

१ श्री. सलील जगन्नाथ सूर्यवंशी : अपिलार्थी
रा.शिरपूर जि. धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्याख्याता, कला महाविद्यालय, बामखेडा,
ता.शहादा, जि.नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य कला महाविद्यालय, बामखेडा,
ता.शहादा, जि.नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची द्वितीय व अंतिम सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सलील जगन्नाथ सूर्यवंशी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. रमेश शंकर जगताप, जन माहिती अधिकारी तथा व्याख्याता, कला महाविद्यालय, बामखेडा,ता. शहादा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. आसाराम श्रीराम बागुल,जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला महाविद्यालय, बामखेडा,ता. शहादा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०८.२००६ रोजी केलेले (राज्य माहिती

आयोगाच्या कार्यालयात दि. ३१.८.२००६ रोजी नोंदलेले) द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे हरवल्यामुळे माहिती पुरविली नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९९६-२००१ पर्यंतच्या हजेरीपटाच्या व पगारपत्रकाच्या प्रती अपेक्षित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. ३.७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सन १९९६-९७ ते २०००-०१ या कालावधीतील उक्त महाविद्यालयाच्या व्याख्यातांच्या मासिक देय पगारपत्रकांची तसेच उपस्थित हजेरीपटांच्या सविस्तर नोंदी." ही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या या अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी अशाच अर्थाचे एक शपथपत्र महाविद्यालये व विद्यापीठ न्यायाधीकरणाच्या न्यायालयामध्ये सादर केले असून या शपथपत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.७.२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आज सुनावणीमध्ये उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. आता राज्य माहिती आयोगाकडे आज रोजीच्या सुनावणी संदर्भात मिळालेल्या नोटिशीससोबतच्या सहपत्रामध्ये संबंधित

महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेला प्रथम अर्ज व त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये केलेले प्रथम अपील या दोन्ही अर्जांच्या प्रती त्यांना प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर आवश्यक वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि. १४.७.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले निर्णय लेखी स्वरुपात अपिलार्थीस कळवावेत. या सुनावणीची नोटीस त्यांनी अपिलार्थीस किमान सात दिवस अगोदर मिळेल, असे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अधिनियमातील कलम १९(३) अन्वये ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.७.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अपील दाखल करण्यास झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, यासंदर्भाने आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सलील जगन्नाथ सूर्यवंशी, २१,सुभाष कॉलनी,मु.पो.ता.शिरपूर

जि.धुळे-४२५ ४०५ यांना कळविण्यात येते की, या आदेशाद्वारे आयोगाकडे सादर करण्यात येणाऱ्या आपल्या म्हणण्याची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावी.

२. जन माहिती अधिकारी तथा व्याख्याता, कला महाविद्यालय, बामखेडा,ता.शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी या आदेशाद्वारे आयोगाकडे सादर करण्यात येणाऱ्या आपल्या म्हणण्याची प्रत त्यांनी अपिलार्थी यांना द्यावी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला महाविद्यालय, बामखेडा,ता.शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१२

निर्णय दिनांक  १८-११-२००८

१ श्री. तुकाराम यादव पाटील, : अपिलार्थी
श्रीरामनगर, जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, जळगाव
जि.जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,जळगाव भाग,
जळगाव.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. लक्ष्मण नरसिंग पाटील, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जळगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अनिल खंडेराव पवार, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव भाग, जळगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. तुकाराम यादव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २.८.२००६ रोजी पारित केलेल्या (दि.१.८.२००६ रोजीच्या) निर्णयाविरुध्द सदर द्वितीय अपील केलेले आहे. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपीलासंदर्भात अपिलार्थीस दिवाणी न्यायालयात दाद मिळवावी, असे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांच्या दि. २७.९.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे मेहरुण शिवार ता.जळगाव येथील सर्व्हे नं. ४४८/१ च्या संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.११.२००५ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत दि. १७.१२.२००५ पर्यंत निर्णय देणे अपेक्षित होते. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय जर वेळीच प्राप्त झाला असता तर त्यानंतर नव्वद दिवसाच्या आत म्हणजेच दि. १७.३.२००६ पर्यंत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित आहे.परंतु त्यांनी या प्रकरणी दि. २०.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील करताना, अपिलार्थीने ७ महिने, ३ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते. अधिनियमातील कलम १९(३) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

"माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ पोटकलम (१) खालील निर्णयाविरुध्दचे दुसरे अपील ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत. केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल:

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल करण्यास वाजवी कारण होती अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचा, किंवा राज्य जन माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करुन घेता येईल."

वरील तरतुद पाहता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, संबंधित अपिलार्थीस विहित वेळेत अपील दाखल न करण्याची कोणतीही कारणे असल्याचे दिसून येत नाही. त्यांनी तशा प्रकारचा उल्लेख राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही व आज सुनावणीचे वेळी अपिलार्थीच्या द्वितीय अपिलाची सुनावणी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतरही का घ्यावी, हे सांगण्याकरिता अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच ज्या मूळ अर्जावर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे, तो मूळ अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.९.२००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ च्या तरतुदीनुसार केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र माहिती अधिकार अध्यादेशाच्या संदर्भात निर्णय देण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगाला नसल्याने व अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदींचा भंग केला असल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत

आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. तुकाराम यादव पाटील,केदारनाथ हौसिंग सोसायटी निमखेडी शिवार गट क्रमांक ८६,प्लॉट क्रमांक २४,ब्लॉक क्र.११, दादावाडीच्या उत्तरेस, श्रीरामनगर,जळगाव-४२५००२

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,जळगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,जळगाव भाग, जळगाव(जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव) जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७६४

निर्णय दिनांक १८-११-२००८

१ श्री. वासुदेव सूर्यकांत जहागिरदार, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह दुय्यम निबंधक, वर्ग-२,
औरंगाबाद -क्र.५, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक,वर्ग-१,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. कडूबा हरसिंग शिमरे, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद -क्र.५,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.लिंबाजी कोंडीबा मुंढे,जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,वर्ग-१,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. वासुदेव सूर्यकांत जहागिरदार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैर हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०६.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २२ कडे दुर्लक्ष केले, त्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.२.२००६ रोजीच्या अर्जान्वये,जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार "डेव्हलपमेंट डीड, जीपीए डिक्लेरेशन डीड क्र.१३५१ दि.२५.२.२००० व क्र. १३५२ दि. २५.२.२००० च्या प्रती." ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कलम ८(ञ) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.५.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ६.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस भारतीय नोंदणी कायदा १९०८ च्या कलम ५७ (३) च्या तरतुदीनुसार माहिती देता येत नसल्याचे कळवून, यापुस्तकातील संबंधित पृष्ठाची झेरॉक्स प्रत सोबत जोडली. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून, जन माहिती अधिकारी

व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे माहितीसाठीच्या प्रथम अर्जास व त्या अनुषंगाने केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय देताना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदीचा विचार केला नाही, जो त्यांनी अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये निर्णय घेताना अनिवार्य होता. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय अशाप्रकारे सदोष आढळल्याने, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदींनुसार त्रयस्थ पक्षाचे म्हणणे लक्षात घेऊन, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे केलेल्या दि. ९.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले निर्णय लेखी स्वरुपात अपिलार्थीस कळवावेत. या सुनावणीची नोटीस त्यांनी अपिलार्थीस किमान सात दिवस अगोदर मिळेल, असे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अधिनियमातील कलम १९(३) अन्वये ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि. ०९.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीसह, हे आदेश निर्गमित

झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन या संदर्भातील निर्णय घ्यावा.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः १८.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वासुदेव सूर्यकांत जहागिरदार,रा.२/४/१७, भिल्ल कॉलनी, कोतवालपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद -क्र.५,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,वर्ग-१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८११

निर्णय दिनांक १८-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर,<br>पिंपळनेर ता. साक्री जि.धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)<br>जिल्हा परिषद, धुळे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, धुळे. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे. (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.११.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, ग्राम पंचायत,पिंपळनेर,ता.साक्री जि.धुळे यांनी जा.क्र. ५४९/५५८,दि. १७.७.२००१ अन्वये १० लोकांना दिलेल्या नोटीसांना दि.२०.७.२००१ च्या अर्जाने हरकत घेतली असता, जा.क्र.धुजिप/ग्रा.पं.३/५०२/२००१/ दि. ३०.७.२००१ अन्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.वि.) जि.प.धुळे यांनी गट विकास अधिकारी, पं.स.साक्री जि.धुळे यांना चौकशी व कारवाई करुन अहवाल सादर करण्यास्तव सूचित केले होते. अपिलार्थीने या चौकशीच्या संचिकेतील दाखल जाबजबाब, कागदपत्रे, कारवाईसह अहवालाची सर्व कागदपत्रे, या सर्व कागदपत्रांच्या खऱ्या नकलांची मागणी केली होती. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात, संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे टाळल्याचे नमूद करुन त्यांनी त्यांच्या दि. ११.७.२००६ रोजीच्या माहितीच्या प्रथम अर्जासंदर्भात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे यांच्याकडे दि. ६.९.२००६ रोजी प्रथम अपील केले होते तथापि या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे, नमूद केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांवरुन उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आढळले आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे योग्य राहील, असे या टप्प्यावरआयोगाचे मत आहे. सबब उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ६.९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अपील दाखल करण्यास झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, या अपिलावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,

यासंदर्भाने आपला निर्णय पारित करावा. या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अधिनियमातील कलम १९(३) अन्वये ते राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ६.९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अपील दाखल करण्यास झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन, यासंदर्भाने आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश कोंडाजी राशिनकर,शांताई, रामनगर,पिंपळनेर ता. साक्री जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८१२

निर्णय दिनांक १८-११-२००८

१ श्री. महेमुद रहेमान मन्सुरी, : अपिलार्थी
रा. धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प अधिकारी,
महानगरपालिका,
धुळे.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
महानगरपालिका,
धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. सतीश जयराम पाटील, अपिलार्थी श्री. महेमुद रहेमान मन्सुरी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गोपीचंद निंबा फुलपगारे, जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, महानगरपालिका,धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हनुमंत पितांबर कवठळकर, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका,धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थी यांनी त्यांचे प्रतिनिधी श्री. सतीश जयराम पाटील यांचेमार्फत राज्य माहिती आयोगास उद्देशून कोणतीही तारीख नसलेले एक पत्र सादर केले असून, या पत्राद्वारे त्यांनी आयोगास असे कळविले आहे की, त्यांनी या अपिलासंदर्भात मागणी केलेली माहिती, त्यांना धुळे महानगरपालिकेकडून मिळाली असून, त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नाही. याचबरोबर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे एक स्वतंत्र फॅक्स संदेश आज पाठविला असून या पत्रामध्ये सदर अपील रद्द करण्याची विनंती अपिलार्थीने केल्याचे दिसून येत आहे.

खुद्द अपिलार्थीस सदर विचाराधीन अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्याने व ते रद्द करण्याची विनंती अपिलार्थीने केली असल्याने अपिलार्थीचे सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. १८१२/२००७,दि.२४.०९.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महेमुद रहेमान मन्सुरी,रा.देवपूर ग.नं.३ जामा मशीद शेजारी, धुळे-४२४ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,महानगरपालिका,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,महानगरपालिका,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८१३

निर्णय दिनांक १८-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नरेंद्र भाऊसाहेब मराठे,<br>रा.शिरपूर जि.धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ प्रशासन अधिकारी,<br>विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>नाशिक. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. नरेंद्र भाऊसाहेब मराठे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०७.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती मिळवून देण्यात अडथळे आणले, अपूर्ण, चुकीची व सदोष माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात मांडले असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण,चुकीची व सदोष माहिती दिली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची मनीऑर्डर न सोडवून, माहिती मिळवून देण्यात अडथळा आणला,त्यामुळे त्यांच्यावरही अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिक्षण विभागाच्या कार्यपध्दतीसंबंधी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या या माहितीमध्ये - शिक्षण उपसंचालक, सह शिक्षण उपसंचालक, शिक्षण निरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्य याविषयी संपूर्ण माहिती, वरील अधिकारी यांनी अधिकार व कर्तव्यात कसूर केल्यास त्यांच्यावर होणाऱ्या कारवाईविषयी सविस्तर माहिती तसेच या संदर्भात असलेले पुस्तक कोणते, व ते कोठे मिळेल, याची माहिती, प्रत्येक शासकीय कार्यालयाने गतवर्षीचे कामकाज प्रसिध्द करणे आवश्यक असते, त्यानुसार त्यातील उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षणसेवक यांच्या ॲप्रुव्हलची यादी, ॲप्रुव्हलसंदर्भात जागरुक नागरिकाची काही तक्रार असल्यास, ती कोणत्या अधिकाऱ्याकडे करावी,या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना दिली असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

ज्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या, त्यासंदर्भात अपिलार्थीस रु. ३४/- इतके शुल्क जिल्हा कोषागारामध्ये जमा करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी - शुल्काचा सविस्तर हिशोब व सदर रक्कम कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करावयाची आहे ते लेखी नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि.०२.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये दि. ५.५.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि, सदर सुनावणीची तरतुद नाही व इतर काही अपरिहार्य कारणांमुळे सुनावणीस उपस्थित राहता येत नाही, असे कारण देऊन अपिलार्थी हे सुनावणी उपस्थित राहिले नाहीत, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भातील आपले निर्णय त्यांच्याकडील दि. २९.५.२००६ रोजीच्या पत्रामध्ये कळविलेले आहेत. अपिलार्थीच्या प्रथम माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थीच्या दि. २.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या दि. २९.५.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील सर्व मुद्यांचा जन माहिती अधिकारी यांनी योग्य तो परामर्श घेऊन अपिलार्थीस सर्वसाधारणपणे संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन सदर माहितीची तपासणी करण्याबाबत त्यांच्या दि. २९.५.२००६ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केले आहे. अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत, माहिती तपासण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहीले नाहीत, तसेच आज रोजी

आयोगासमोर देखील गैरहजर राहिले आहेत. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कशाप्रकारे सदोष माहिती दिली व पूर्ण माहिती मिळवून देण्यात कशाप्रकारे अडथळा आणलेला आहे, याबाबत आपले अभिप्राय नमूद केले आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्याकडील अनुक्रमे दि. २४.४.२००६ व २९.५.२००६ च्या पत्राचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीन्वये योग्य ती कार्यवाही केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत दिलेल्या अभिप्रायाशी (जन माहिती अधिकारी यांनी सदोष माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती मिळवून देण्यात अडथळा आणला) आयोग सहमत नाही. कारण आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांचा सदर आरोप नि:संशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारे अधिनियमातील विहित तरतुदींचे पालन करुन योग्य तो प्रतिसाद दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणत्याही कारवाईचे आदेश आयोग देत नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने केलेले आरोप सिध्द होत नाहीत व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्याने, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी केलेला पत्रव्यवहार पाहता, तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारातील मुद्यांचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज सुनावणीस उपस्थित नसल्याने, अपिलार्थी यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे

निकाली निघत आहेत. सबब अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र भाऊसाहेब मराठे, प्लॉट नं.३२, महालक्ष्मी कॉलनी,शरद शिंपींच्या घराजवळ,मु.पो.शिरपूर ता.शिरपूर जि. धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८१४

निर्णय दिनांक १८-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बन्सीलाल रतन ठाकरे,<br>रा.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,<br>अमरावती. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था,<br>महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग,पुणे. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नंदकिशोर रामचंद्र झिने, सहायक निबंधक (प्रशासन) बुलडाणा, जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,अमरावती यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. बन्सीलाल रतन ठाकरे(यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०९.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती मिळवून देण्याकामी सहाय्य केले नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही आदेश दिले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वप्रथम दि. २६.४.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे - त्यांचे अपील क्र. ६६/२००५, ०१/२००६ व ०६/२००६ च्या निर्णयाच्या प्रतींची मागणी केली होती. व या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित माहिती अधिकारी यांनी दिलेल्या लेखी जबाबाच्या प्रती व अपडेट गोषवारा/टिपणीची नक्कल- याची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थीने दि. २५.५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. झिने, सहा.निबंधक (प्रशासन)बुलडाणा यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेला दि. २६.४.२००६ रोजीचा प्रथम अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्वरित व विनामूल्य पुरविण्यास ते तयार आहेत. त्यांच्या विधानापृष्ठयर्थ त्यांनी विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,अमरावती यांनी त्यांच्या अपील क्र. १/२००६ व ६/२००६ या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या प्रती व संबंधित कागदपत्रे आयोगास दाखविली, यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपील क्र.६६/२००५ व्यतिरिक्त उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आता कबूल केले असल्याने, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. २६.४.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे (सदर अर्जाची प्रत आयोगामार्फत देण्यात येत आहे.) मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. २६.४.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बन्सीलाल रतन ठाकरे,आकाशवाणी कॉलनी, आकाशवाणी केंद्राच्या मागे,जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,सहकार संकूल, कांतानगर, अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, विस्तारीत मध्यवर्ती इमारत,डॉ.ॲनी बेझंट रोड,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८१५

निर्णय दिनांक १८-११-२००८

१ श्री. कमलाकर पंडीत पाटील, : अपिलार्थी
रा.विरावली, ता.यावल जि.जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत विरावली,
ता.यावल, जि.जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, यावल,
जि.जळगाव.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १८.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. मज्जीत अरमान तडवी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत,विरावली, ता.यावल, जि.जळगाव, श्री. एम.एस.सैंदाणे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत विरावली ता.यावल जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एकनाथ धनाजी लोहार, (प्र) जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पं.स. यावल जि. जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. कमलाकर पंडीत पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०७.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जात अपिलार्थी यांनी सदर अपील करण्याची कारणे दर्शविताना असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असून देखील ते, केवळ राजकीय द्वेषापोटी व गैरव्यवहार बाहेर येऊ नये म्हणून देण्यास टाळाटाळ करत आहेत, गट विकास अधिकारी यांनी दिलेले निर्णय देखील जन माहिती अधिकारी हे जुमानत नाहीत व ग्राम पंचायतीचे सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्य यांना वाचविण्याच्या उद्देशाने त्यांनी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वप्रथम दि. १७.०२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित दि. २५.९.२००५ ते १५.२.२००६ पर्यंतच्या कालावधीतील विस्तृत स्वरुपात असलेली एकूण आठ मुद्यांवरील माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - दि.२५.९.२००५ ते १५.२.२००६ पर्यंत झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभा, सार्वजनिक ग्रामसभा, व महिला ग्रामसभांमध्ये झालेल्या ठरावाच्या प्रती, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत दि.२५.५.२००५ ते १५.२.२००६ पर्यंत झालेला जमा खर्च व मजूर हजेरी रजिस्टरच्या नकला, नमुना नं.१५ व २२ च्या नकला, श्री.पंडीत नागो पाटील यांचे भोगवटा असलेल्या जागेचे ज्या वर्षापासून भोगवटयाचे उतारे व नमुना नं. ९ चे खतावलेल्या पावती क्रमांक, घरक्रमांक व वर्षनिहाय भरलेली रक्कम, दि.२५.९.२००५ ते १५.२.२००६ या कालावधीचे भरलेले भोगवटयाचे उतारे व नमुना नं.९ चे खतावलेला पावती क्रमांक, घर क्रमांक भरलेल्या रकमांचा आजपर्यंतचा तपशील, नंतर कमलबाई निंबाजी पाटील यांचे नावे

झालेल्या भोगवटयाचे उतारे व नमुना नं.९ चे खतावलेल्या पावती क्र.घर क्रमांक, भरलेली रक्कम इ.तपशील दाखला ग्रामसेवकाच्या सही शिक्क्यासह, घर नं.२७६/१,२७६/२ व २७६/३चे चतु:सिमासह नमुना नं.८-अ चे उतारे, संपूर्ण ग्रामीण योजनेंतर्गत गटार बांधकामाचे लाईन आऊट संबंधित शाखा अभियंता,पं.स.यावल यांनी दिला आहे काय,असा दाखला, सार्वजनिक बांधकाम विभाग यावल रस्त्याच्या सेंटरपासुन आपल्या हद्दीत आहे काय कि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या हद्दीत आहे काय असा ग्रामपंचायतचा दाखला, ग्रामपंचायत दप्तरी असलेल्या संपूर्ण भोगवटयाचे ८-अ चे संपूर्ण उतारे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दि. १७.२.२००६ रोजीच्या कथित अर्जाऐवजी त्यांना अपिलार्थीकडून दि. १८.०२.२००६ रोजी एक पाकीट प्राप्त झाले, सदर पाकीटामध्ये त्यांना कोरे कागद आढळून आल्याने त्यांनी या घटनेचा पंचनामा केला. सदर पंचनाम्यावर पाच व्यक्तींच्या सहया आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी पाठविलेल्या पाकीटामध्ये कोरे कागद आढळून आल्याचे दि. १९.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानंतर देखील अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे न पाठविता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ८.३.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.३.२००६ रोजी घेतली असता, सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस मुदतीत द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशामध्ये सदर माहिती अपिलार्थीस सशुल्क द्यावयाची की विनामूल्य द्यावयाची,

याबाबतचा कोणताही उल्लेख नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,विरावली (सध्या कार्यरत ग्रामसेवक,ग्रामपंचायत नावरे,ता,यावल)श्री. मज्जीत अरमान तडवी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे राज्य परिवहन महामंडळामध्ये वाहनचालक या पदावर कार्यरत आहेत व त्यांनी वरील अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर ते राहत नसून, त्यांचे निवासस्थान सध्या चोपडा येथे आहे.अपिलार्थीचा कथित दि. १७.२.२००६ रोजीच्या अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही. मात्र अपिलार्थीने पाठविलेल्या कथित माहितीअर्जाच्या पाकीटामध्ये कोरे कागद आढळून आल्याने त्यांनी या घटनेचा पंचनामा पाच व्यक्तींच्या समक्ष केला. सदर पंचनाम्याची प्रत त्यांनी आज रोजी आयोगाकडे सादर केली.अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा उलगडा त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.३.२००६ रोजी झालेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथमतः झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि.१८.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.८२२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविले. सदर पत्र त्यांनी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले असून, यासंबंधीचा पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवूनही अपिलार्थीने शुल्काची रक्कम त्यांच्या कार्यालयात न भरल्याने व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर ते राहत नसल्याने, अपिलार्थीस त्यांनी आजतागायत माहिती पाठविलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेल्या त्यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग यांच्याकडील अपील सुनावणीस उपस्थित न राहणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अर्जाऐवजी कोरे कागद असलेले पाकीट पाठविणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवूनही, त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, अपिलार्थी यांनी मूळ माहितीचा अर्ज दाखल करणे व राज्य माहिती आयोगाकडे त्याबाबत सुनावणी होणे यामधील सर्व टप्प्यामध्ये अपिलार्थीचे वर्तन आयोगास संशयास्पद आढळून आले आहे.अपिलार्थी यांची सदर कृती, त्यांना खरोखरीच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी आहे किंवा कसे, याबाबतच्या त्यांच्या हेतूबद्दल आयोगाच्या मनात शंका निर्माण करत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी संबंधित ग्रामसेवक यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क रक्कम रु.८२२/-चा भरणा त्यांच्याकडे केल्यास, ही माहिती ते अपिलार्थीस शुल्क भरल्याच्यादिवशी देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याच्या उद्देशामागे खरोखरीच व्यापक जनहीत आहे किंवा कसे याबाबतही अपिलार्थीच्या वर्तनाबाबत आयोग साशंक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याने, त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क रु.८२२/-चा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे. मात्र अपिलार्थी यांचे वरील घटनाक्रमामध्ये निदर्शनास आलेले वर्तन पाहता व मूळ अर्जामध्ये

खोटा पत्ता नमूद केल्यामुळे त्यांचा मूळ अर्जच अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कमलाकर पंडीत पाटील,मु.पो.विरावली ता.यावल जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत विरावली, ता.यावल जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यावल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८१८

निर्णय दिनांक १९-११-२००८

१ श्री. पुनमचंद रामचंद्र परदेशी, अपिलार्थी
रामबाग कॉलनी, धुळे रोड, अमळनेर,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो),
उप वनसंरक्षक जळगांव यांचे कार्यालय, जळगांव वन विभाग, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक,
जळगांव वन विभाग, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. भामरे पद्माकर नारायण, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, जळगांव वन विभाग, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. पुनमचंद रामचंद्र परदेशी व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), उप वनसंरक्षक जळगांव यांचे कार्यालय, जळगांव वन विभाग, जळगांव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १९-०६-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी दिनांक २१-१२-२००५ रोजी मागणी केलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना, त्यांच्या सहाय्यक कर्मचा-याकडून विहित मुदतीत प्राप्त झाली नाही, विहित मुदतीनंतर माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना बोलाविले असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०३-२००६ रोजी माहिती घेण्यासाठी बोलाविले होते, तथापि त्या दिवशी त्यांनी उप वन संरक्षकाच्या दालनामध्ये अनौपचारिक चर्चा केली आहे. अपिलाथीने माहिती अधिका-यास सहकार्य न करणा-या सदर अधिका-यांवर कलम ५ (४) व ५ (५) प्रमाणे कारवाई करण्यास कळविले होते, परंतु त्याचा कोणताही विचार न करता त्यांनी दिनांक ३१-०३-२००६ रोजी जुजबी माहिती दिली, त्यामुळे संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१२-२००५ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजी उप वनसंरक्षक श्री. पाले आर. के. यांच्या कार्यकाळातील, एकूण ३ विषयावर काही माहिती मागितली होती व काही कागदपत्रांच्या तपासणीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ते माहिती पाहण्यासाठी कधी व केव्हा येणार याची विचारणा केली. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळविले आहे. अधिनियमातील विहित मुदत व्यपगत झ

ाल्याने अपिलार्थीने दिनांक १४-०२-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्रथम पत्र लिहून अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००६ रोजी सकाळी ११-०० वाजता त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस हवी असलेली माहिती व अभिलेखे तपासण्यासाठी उपलब्ध करण्याची तयारी दर्शविली. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी दिनांक २०-०३-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात आले असता जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली, परंतु अपिलार्थी हे सदर माहितीची तपासणी न करता निघून गेले व जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २१-०३-२००६ रोजी पत्र लिहून त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणा-या, कुचराई करणा-या संबंधीतांवर कारवाई करण्याची विनंती केली. यानंतर परत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे या पत्राचे उत्तर दिले, तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर या संदर्भात असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयाव्यतिरिक्त इतर शासकीय कार्यालयाकडे वारंवार माहितीची मागणी करत असतात. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे पाहण्यासाठी दिनांक २०-०३-२००६ रोजी उपलब्ध करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर राहूनही त्यांनी या कागदपत्रांची तपासणी केली नाही व दिनांक २१-०३-२००६ रोजी त्यांनी संबंधीत जन माहिती अधिका-यांना सहाय्य करणा-या कर्मचा-याविरुध्द विभागीय चौकशीच्या कारवाईची अपेक्षा ठेऊन दिनांक २१-०३-२००६ रोजी त्याप्रमाणे पत्र दिले, तसेच या पत्रामध्ये त्यांनी त्यांना योग्य तो निर्णय घेण्यासाठी विनंती देखील केली आहे. एवढे असूनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थी यांची शासकीय कर्मचा-यांकडे वारंवार माहितीची मागणी करुन त्यांना त्रास देण्याची प्रवृत्ती त्यांना आतापर्यंत आढळून आली आहे. अपिलार्थीचे माहितीसाठीचे एकूण ८ अर्ज व १२ तक्रारी त्यांच्याकडे प्रलंबीत आहेत. अर्जदार ज्या ज्या वेळी माहितीची मागणी करतात त्या त्या वेळी त्यांना ही माहिती नियमीतपणे देण्यात येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची व आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादाची छानणी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक २१-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्दयांसंदर्भात माहिती मागितली होती, तथापि मुद्दा क्रमांक १ च्या व्दारे त्यांनी पळासदडे तालुका अमळनेर येथे जून २००० मध्ये लावलेल्या रोपांची प्रजातीवार संख्या, जिवंत व मेलेल्या रोपांची प्रजातीवार संख्या ही माहिती मागितली होती तर उर्वरित मुद्दयांव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही अभिलेखे तपासणीकरिता उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास मूळात जन माहिती अधिकारी यांनी जो प्रथम प्रतिसाद दिला आहे तोच दिनांक १३-०२-२००६ व दिनांक १५-०२-२००६ रोजी दिल्याचे दिसून येते, तथापि दिनांक १३-०२-२००६ रोजीचे पत्र हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवण्याची त्यांच्या सहाय्यकांना केलेल्या सूचनेची प्रत आहे तर दिनांक १५-०२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी तपासणीसाठी मागणी केलेले अभिलेखे तपासणीसाठी ते त्यांच्या कार्यालयात कधी व केव्हा हजर राहू शकतील याबाबत विचारणा केली आहे. मूळात अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार ३० दिवसाच्या आत प्रतिसाद देणे अपेक्षित आहे, तथापि या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद देण्याकरिता विहित केलेली मुदत व्यपगत झाल्या-नंतर २४ दिवसांच्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही कधीही माहिती नाकारल्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये दिसून येत नाही. याउलट अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २०-०३-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या अभिलेख्याची तपासणी करण्याकरिता बोलाविले असता अपिलार्थी त्या तपासणीसाठी कार्यालयात उपस्थित राहूनही त्यांनी मागणी केलेल्या अभिलेख्याची तपासणी केली नाही, यावरुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कितपत स्वारस्य आहे याबद्दल आयोग साशंक असून, केवळ शासकीय कर्मचा-यांना त्रास देण्याच्या दृष्टीने तर ही माहिती मागविली नाही ना अशी शंका आयोगाच्या मनात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन

करण्यासाठी आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, मात्र या घटनाक्रमामध्ये अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून झालेल्या पत्रव्यवहाराचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुद्दा क्रमांक १ व्दारे जी माहिती मागितली आहे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही पुरविली नाही, सदर माहिती अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ अन्वये ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देणे भाग होते, तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस अद्यापही दिलेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या या विलंबाबाबत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस उप वनसंरक्षक, जळगांव यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ०७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस उप वनसंरक्षक, वन विभाग, जळगांव यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पुनमचंद रामचंद्र परदेशी, रामबाग कॉलनी, धुळे रोड, अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), उप वनसंरक्षक जळगांव यांचे कार्यालय, जळगांव वन विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, जळगांव वन विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८१९

निर्णय दिनांक  १९-११-२००८

१ श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी, अपिलार्थी
काझी वाडा, वाडी चौक, अमळनेर,
तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. जगन्नाथ उखर्डू ताडे, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगांव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २०-१०-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय चुकीचा असल्याचा वाटल्यावरुन केले असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील मिळकत पत्रिका व नोंदणी रजिस्टरसंदर्भात एकूण २ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. आदेश नं. सी. टी. एस./बी.आर. १६०/७८ अमळनेर दि. १६/१/१९७९ च्या आदेशावरुन सि. स. नं. ९६०/४ चे मिळकतीवरुन ज्या इसमांची नांवे कमी करण्यात आली त्यांची माहिती.

२. मोजणी रजिष्टर नं. ३१० ते ३१३ दि. २४/२/१९७९ मधील नकला मिळाव्या सोबत दि. १६/१/१९७९ चे आदेशाची तसेच सि. स. नं. ९६०/४ चे मिळकत पत्रीकेची नकल असत."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ संदर्भात माहिती दिली तर अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ संदर्भात त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांना बोध होत नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीस स्पष्टपणे माहिती मागण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००६ रोजीच्या आदेशाव्दारे फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे दिनांक १९-११-२००८ चे पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये नगर भूमापन अधिकारी, अमळनेर यांच्या दिनांक १६-०१-१९७९ च्या आदेशाप्रमाणे सि. स. नं. ९६०/०४ च्या मिळकत पत्रिकेवरुन बाकीच्यांची नांवे कमी करण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये देखील अशाच प्रकारची मागणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे त्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिल्याचे दिसून येते, मात्र अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली मोजणी रजिस्टर नंबर ३१० ते ३१३ मधील नकला, दिनांक १६-०१-१९७९ च्या आदेशाची प्रत व सि. स. नं. ९६०/०४ च्या मिळकतीच्या नकला ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही असे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जाचे व आज रोजी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जाचे अवलोकन करता यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस मिळकत क्रमांक ९६०/०४ सिटी सर्व्हे नंबर या मिळकत पत्रिकेवर नगर भूमापन अधिकारी यांच्या दिनांक १६-०१-१९७९ च्या आदेशाप्रमाणे काही नांवे कमी करणे अपेक्षित आहे, तथापि अशा प्रकारची सूचना क्षेत्रीय अधिका-यांना देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास, अधिनियमातील विहित कार्यपध्दतीचा अवलंब केल्यानंतर, देणे अशाच स्वरुपाची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कुठल्याही टप्प्यावर टाळल्याचे, मुद्दामहून टाळाटाळ केल्याचे अथवा त्यांच्यापासून माहिती दडविल्याचे आढळून आले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहितीची मांडणी व्यवस्थितपणे केली नसल्याने, ही माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या मनात संभ्रम झाला असावा असे वाटते. आज सुनावणीच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे त्यांना विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, तसेच येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक माहितीसाठीच्या व अपील अर्जावर त्यांनी सकारात्मक कारवाई करावी.

अपिलार्थीने मागणी केलेली विनंती मान्य करण्याची अधिकारिता भूमी अभिलेख विभागातील अधिका-यांना असल्यामुळे व यासंदर्भात विशिष्ट स्वरुपाची कायदेशीर तरतूद असल्याने अपिलार्थीने या संदर्भात संबंधीत कायद्यातील तरतुदींचा मार्ग अवलंबवावा असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मधील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महंमद शफी अकमलोद्दीन काझी, काझी वाडा, वाडी चौक, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२०

निर्णय दिनांक १९-११-२००८

१ श्री. रविंद्र नंदलाल लढे, अपिलार्थी

१६, गणेश कॉलनी, जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

विद्युत भवन, पहिला माळा, जुने पावर हाऊस, जुना प्रकाशा रोड, शहादा,

जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, जुने पावर हाऊस, जुना प्रकाशा रोड, शहादा, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. चारुदत्त जगन्नाथ पाठक, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहादा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. ललित दत्तात्रेय ठाकूर, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. रविंद्र नंदलाल लढे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १५-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे व्दितीय अपील केले असल्याचे म्हटले असून त्यांची देयके काढण्यासाठी अतिविलंब झाला त्याची कारणे या विषयावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत दिनांक २२-०९-२००५ ते ३०-०६-२००६ या कालावधीशी संबंधीत असलेली, अपिलार्थीची देयके त्यांनी अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत का प्रलंबीत ठेवली, त्या मागील परिपत्रकाचा असलेला घेतलेला आधार, देयके निकाली काढण्यासाठी संबंधीत कर्मचा-याची जबाबदारी काय की आकसापोटी प्रलंबीत ठेवली, अशा प्रकारची माहिती मागितली होती. या अर्जासोबत अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यासाठी लागणारे शुल्क जोडले असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय घेतला असल्याचे अथवा कोठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या पातळीवर

मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे हे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास व अपील अर्जास अनुक्रमे तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे मान्य केले आहे, त्यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थी हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचारी असून त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीची काही देयके अदा करण्याचे बाकी होते, तथापि आता अपिलार्थीची सर्व देयके त्यांनी अदा केली असल्यामुळे व त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीची आता यासंदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

या प्रकरणात अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मूळात अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीची जरी काही देयके जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात प्रलंबीत असतील तरी त्यांनी विहित कार्यालयीन पध्दतीनुसार त्यांचे म्हणणे एका अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांकडे सादर करावयास हवे होते. तथापि त्यांनी त्यांच्या वैयक्तीक तक्रारीची तड लावण्याकरिता माहिती अधिकार अधिनियमाचा आधार घेतल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे या प्रक्रियेमधील प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाहीचे सविस्तर विवेचन या अधिनियमामध्ये केलेले आहे. अर्जदाराने माहितीची मागणी केली असता जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात असेल त्या स्वरुपात ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले निर्णय, त्यांच्याकडे असलेली माहिती यासंदर्भात अर्जदाराने त्यांना कोणतीही कारणे अथवा स्पष्टीकरण विचारणे अशा प्रकारच्या प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत, त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी कथित माहिती विचारली आहे ती त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

एवढे जरी असले तरी या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्ज व अपिलासंदर्भात आपला कोणताही निर्णय न कळवून अधिनियमातील अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. किंबहुना अपिलार्थीच्या मूळ अर्जावर व अपील अर्जावर कोणताही निर्णय अपिलार्थीस न कळवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे या प्रकरणी म्हणणे उचित ठरेल असे आयोगास वाटते. सबब, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र नंदलाल लढे, १६, गणेश कॉलनी, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२१

निर्णय दिनांक १९-११-२००८

१ श्री. अशोक हिंमतराव पाटील, अपिलार्थी

"सह्याद्री" साने गुरुजी हौसिंग सोसायटी, अमळनेर, जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर,

जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर,

जिल्हा जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक हिंमतराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अनिल संतोष पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संजय दत्तात्रय सोनवणे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आज रोजी राज्य माहिती आयोगाच्या विचाराधीन असलेले अपील क्रमांक १८२१ ची सुनावणी यापूर्वीच आयोगाने दिनांक २८-०७-२००८ रोजी घेतली असून यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २८-०७-२००८ रोजी पारीत केले आहेत. अपिलार्थीने एकाच माहितीसाठी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयात दोन वेगवेगळी अपिले दाखल केली होती. यापैकी मुंबई कार्यालयात दिनांक १७-०२-२००७ रोजी नोंद झालेल्या व औरंगाबाद येथे हस्तांतरित झालेल्या अपील अर्जाची दिनांक २८-०७-२००८ रोजी सुनावणी होऊन निर्णय झाला असल्याने आज रोजी विचाराधीन असलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८२१/२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक हिंमतराव पाटील, "सह्याद्री" साने गुरुजी हौसिंग सोसायटी, अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२३

निर्णय दिनांक १९-११-२००८

१ श्री. अनिल कृष्णराव पाटील, अपिलार्थी
रा. इंदिरा नगर, भडगांव रोड, पाचोरा,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,
गिरड रोड, पाचोरा, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मार्केट यार्ड, अजिंठा रोड,
जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिल कृष्णराव पाटील, जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, पाचोरा, जिल्हा जळगांव व जन अपिलीय अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, जळगांव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-०३-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना कोणतीही माहिती दिली नाही, त्यांच्या निर्णयाविरुध्द पहिले अपील कोणाकडे व कधी करावे याबाबत कोणतीही माहिती पुरविली नाही, त्यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (क) प्रमाणे नाकारण्यात आलेली आहे, असे नमूद करुन चुकीची माहिती देणा-या अधिका-याविरुध्द कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी होणे आयोगास अगत्याचे वाटते. उपरोक्त प्रकरणी कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा त्यांच्या अपील अर्जावर आवश्यक तो निर्णय दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून, झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, ३० दिवसाच्या आत घेऊन यासंदर्भात आपला निर्णय पारीत करावा. अपिलार्थीचे या निर्णयाने समाधान न झाल्यास ते राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व होणारा संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल कृष्णराव पाटील, रा. इंदिरा नगर, भडगांव रोड, पाचोरा, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, गिरड रोड, पाचोरा, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मार्केट यार्ड, अजिंठा रोड, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२४

निर्णय दिनांक १९-११-२००८

१ श्री. दिलीप रामा कदम, — अपिलार्थी
रा. बोदवड (त्रिमुर्ती मेडिकल मागे),
तालुका बोदवड, जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. संजय नारायण नारखेडे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जळगांव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिलीप रामा कदम, व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-०३-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केला असतांनाही त्यांना माहिती देण्याचे टाळले व सदर माहिती त्यांना उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली, प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००७ रोजी सुनावणी ठेऊन सदर अपिलावरील निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कळविला नाही, यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जाच्या अखेरीस त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी प्रत्यक्ष चौकशी करुन त्यांना खरी, अचूक व पूर्ण माहिती द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-११-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांनी एकूण वेगवेगळ्या १० मुद्दयांवर विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग भुसावळ यांनी त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-

२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १४-०२-२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस कार्यकारी अभियंता व उप अभियंता या दोघांकडूनही माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा आदेश अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे याच विषयावर वारंवार एकाच प्रकारची माहिती विचारत असतात व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळोवेळी मागितलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिनांक २८-१२-२००६ रोजी प्रथमतः उपविभागीय अभियंता यांच्या मार्फत व नंतर त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, सदर माहितीत काहीशा त्रुटी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, त्यांनी या प्रकरणी सदर माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेले अभिलेख पाहणे त्यांच्या दृष्टीने सोईचे होईल असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २५ वर्षाच्या कालावधीशी संबंधीत असून ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना निश्चितपणे त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या सामुग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागणार आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या उद्देशाने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या तपासणीसाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. या माहितीमधून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना काढून घेता येतील. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप संमिश्र असून अपिलार्थीने सर्वसाधारणपणे त्यांच्या अर्जातील काही भागाव्दारे जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित केले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील ज्या भागामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अथवा स्पष्टीकरण मागितले आहे तो अपिलार्थीस देय असणार नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीमध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सुसंगत नाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना खुलासे अथवा स्पष्टीकरण विचारणे आणि ते जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये "ही माहिती आपणास पूर्वीच देण्यात आलेली आहे, या उपविभागाशी संबंधीत नाही, अशा अर्थाची मोघम स्वरुपाची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्वीच म्हणजे कधी माहिती दिली याचा उल्लेख या दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या विभागाशी संबंधीत नव्हती तर त्यांनी ती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीन्वये ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा अर्ज पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयाची होती, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, त्यांनी अशा प्रकारच्या आपल्या कृतीव्दारे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपिलावरील निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नसल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. प्रथम अपील निर्णयाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविली आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी आज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कोणतेही अभिलेख आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत किंवा यासंदर्भात स्पष्टीकरण करण्याकरिता जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत हे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भात त्यांनी घेतलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या आदेशाची एक प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे २५ वर्षाच्या कालावधीमधील एकूण १० वेगवेगळ्या मुद्दयावर ज्या प्रकारची माहिती मागितली आहे हे पाहता, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी करावयाच्या माहितीच्या आकारमानावर निश्चितपणे काही मर्यादा घालण्याची गरज असल्याचे आयोगास वाटत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेख त्यांच्या तपासणीसाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावेत.

३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या आदेशाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप रामा कदम, रा. बोदवड (त्रिमुर्ती मेडिकल मागे), तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२५

निर्णय दिनांक १९-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र दुर्लभजी शहा,<br>५४, पोलन पेठ, जळगांव | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपसंचालक, नगर रचना, नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा संचालक, नगर रचना,<br>महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालय,<br>सेंट्रल बिल्डींग, पुणे | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुनिल श्रीराम सुकळीकर, जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. शामा मुंढे-जाधवर, नगर रचनाकार, मुख्यालय पुणे, जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. महेंद्र दुर्लभजी शहा हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १९-०३-२००७ रोजी केलेले, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक ०४-०४-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमानुसार माहिती मागितली असता माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांनी सदर अपील दाखल केले असल्याचे म्हटल्याचे आहे तसेच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जळगांव शहरातील सिटी सर्व्हे नंबर १९९२ श्री. जैन श्वेतांबर मुर्तीपूजक मंदिराच्या आवारातील अनधिकृत बांधकामाबाबत एकूण २ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये महानगरपालिकेकडून या विषयासंदर्भात मा. उच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट दाखल केले आहे. या ॲफिडेव्हिटवर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून योग्य तो खुलासा मिळण्याबाबत व लोकशाहीदिनी दिनांक ०७-०८-२००६ रोजी टोकन नंबर १५ च्या तक्रारीसंदर्भात वापरबंदच्या नोटीसबद्दल तक्रार केलेली असल्याने त्याबद्दलचा खुलासा अपेक्षित केला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणाची सद्य:स्थिती अवगत करुन दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील

आपले आदेश दिनांक १६-१२-२००६ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेल्या २ मुद्दयांसंदर्भातील माहिती मूळात अस्तित्वात नाही व दुस-या मुद्दयाची माहीती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे या प्रकरणी उपसंचालक नगर रचना यांनी मा. न्यायालयाकडे कोणताही खुलासा सादर केलेला नाही असे सांगितले. महानगरपालिकेने सादर केलेल्या ॲफिडेव्हिटमधील संदर्भात रीटवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस अपेक्षित असलेला खुलासा आजही लेखी स्वरुपात उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितेली मुद्दा क्रमांक १ ची माहिती उपलब्ध नव्हती तर अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक २ व्दारे संदर्भीत केलेले जळगांव शहर महानगरपालिकेचे १५९२ दिनांक ०६-०९-२००६ चे पत्र जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत नाही. अपिलार्थीने लोकशाहीदिनी दिनांक ०७-०८-२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जासंदर्भात जळगांव शहर महानगरपालिकेने सदर पत्र अपिलार्थीस पाठविले आहे, मात्र हा पत्रव्यवहार अपिलार्थी व जळगांव शहर महानगरपालिका यांच्यामधील असतांना त्या पत्रव्यवहाराबद्दल जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करावा असे या अर्जामध्ये अपिलार्थीने अपेक्षिलेले आहे जे पूर्णतः चुकीच्या गृहीतकावर आधारलेले आहे. त्यामुळे याही मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केलेली आहे. अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ती माहिती देणे या संपूर्ण प्रक्रियेमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल त्यांना कारणे, खुलासा अथवा त्यांचे अभिप्राय विचारणे व ते जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नाही हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात कोणतीही माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार "माहिती" म्हणून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस या प्रकरणाची सद्यःस्थिती अवगत केली आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, ती अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्तित्वात नसल्यामुळे व दुस-या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांचेशी संबंधीत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महेंद्र दुर्लभजी शहा, ५४, पोलन पेठ, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८४५

निर्णय दिनांक  १९-११-२००८

१ श्री. पठाडे विष्णू अन्नासाहेब, अपिलार्थी

मु. पो. ढोरकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पठाडे विष्णू अन्नासाहेब (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सिस्टर लीसी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. काळुसे एस. एस. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८-०६-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी टाळाटाळ होत असल्याचे नमूद करुन या अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दिनांक २९-१०-२००५, व दिनांक २८-१२-२००५ प्रमाणे आदेश देऊनही सदर संस्था त्यांना माहिती देण्यास तयार नाही. सदर संस्थेस अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यास जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. या अपील अर्जामध्ये अंतीमतः त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधीत संस्थेकडून मिळवून देण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड, जिल्हा औरंगाबाद या संस्थेसंदर्भात एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- या संस्थेच्या ४० ते ४२ मान्यताप्राप्त शाळेची नावासहीत यादी, सन १९९६ पासून सर्व शाळेत नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नांवे, शैक्षणिक पात्रता व ते धारण करीत असलेली पात्रता, संस्थेत एकूण डी. एड, बी. एड आणि बी. पी. एड मान्यताप्राप्त शाळेतील शिक्षकांची संख्या शाळेच्या नावासह, व संस्थेत सद्यस्थितीत रिक्त असलेल्या डी. एड, बी. एड आणि बी. पी. एड पदांचा शाळानिहाय तपशील -- या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत संस्थेने त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांची संस्था विना अनुदानित संस्था असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीमध्ये येत

नसल्याचे कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाची प्रतिक्षा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००५ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-१०-२००५ रोजीच्या पत्रान्वये मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सूचित केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास यासंदर्भात त्यांच्या शाळेकडे उपलब्ध असलेल्या पत्रव्यवहाराची नस्ती पाहण्याकरिता उपलब्ध करुन दिली. उपस्थित जन माहिती अधिकारी या मराठी समजू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना आयोगाने इंग्रजीमध्ये काही प्रश्न विचारले असता असे आढळून आले की, संबंधीत मुख्याध्यापक यांची अद्यापपर्यंत माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या कन्नड येथील शाळेसंबंधातील माहिती त्या अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. तथापि संस्थेच्या उर्वरित शाळासंबंधातील माहिती गोळा करण्यासाठी लागणारा संभाव्य कालावधी लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना, आजच्या सुनावणीमध्ये असे सूचित करण्यात आले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती त्यांच्या शाळेशी संबंधीत आहे त्यासह संस्थेच्या उर्वरित शाळांसंबंधी माहिती त्यांनी एकत्र गोळा करुन ती, माहिती त्यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

या प्रकरणी संबंधीत शिक्षण संस्थेने त्यांच्या दिनांक ०५-११-२००५ च्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्राव्दारे त्यांची संस्था खाजगी व विना अनुदानित असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नसल्याचे प्रतिपादन केले आहे. संबंधीत शाळेमध्ये इयत्ता पाचवी ते दहावी अशा सहा तुकड्या आहेत. सदर शिक्षण संस्था सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडील नोंदणीकृत संस्था आहे. धर्मादाय आयुक्त या सार्वजनिक प्राधिकरणाचा भाग असलेल्या कार्यालयाला अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेता येते त्यामुळे अधिनियमातील कलम २ (\ा) च्या तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस देय ठरते. तसेच या शाळेला शासनाच्या शिक्षण विभागाने दिनांक १३-०७-२००० रोजी मान्यता दिलेली आहे. या शाळेतील विद्यार्थी शासनाचे पूर्ण नियंत्रण असलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस नियमीतपणे बसत असतात. सदर माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ संबंधीत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेत असते. सदर शाळा तपासणीचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना आहेत, याचबरोबर शिक्षण उपसंचालकांनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना उद्देशून लिहिलेल्या क्रमांक २७९६/०१, दिनांक ३०-०१-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, या पत्राव्दारे शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व अनुदानित व विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांची व संस्थांमध्ये नेमलेले जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची यादी मागितली आहे. यावरुन संबंधीत शिक्षण संस्थेवर शासनाचे पूर्णपणे नियंत्रण असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) (घ) (एक) चे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, या कलमामध्ये समुचित शासनाची मालकी असलेले, त्यांचे नियंत्रण असलेले निकाय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरते, त्यामुळे केवळ शासनाकडून अनुदान मिळत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ आपल्याला लागू नाही, अशी झालेली संस्थेची धारणा ही चुकीची ठरते व संबंधीत संस्था हे सार्वजनिक प्राधिकरण ठरते. एकदा सार्वजनिक प्राधिकरण ठरविल्यानंतर संस्थेला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व तरतुदी लागू होतात, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रथम अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे उचित राहील.

या प्रकरणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता अशीही बाब निदर्शनास आली आहे की, वरील परिच्छेदात संदर्भित केलेल्या शिक्षण उपसंचालकांच्या पत्रावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही, जर संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शिक्षण उपसंचालकांच्या दिनांक ३०-०१-२००६ च्या पत्रामधील सुचनांचे वेळीच अनुपालन केले असते तर अपिलार्थीस त्यांना मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती यापूर्वीच प्राप्त होऊन सर्व संबंधीतांचा या प्रकरणातील पुढील कालापव्यय टळला

आला असता. निदान आता तरी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शिक्षण उपसंचालकाच्या या पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक ती कारवाई तातडीने करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

मूळात अधिनियमातील कलम ५ नुसार संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली नसल्याने त्यांच्यावर शिक्षेचे आदेश लावणे उचित होणार नाही, मात्र शिक्षण उपसंचालकांच्या सुचनांचे अनुपालन संबंधीत शिक्षण संस्थेने आतापर्यंत केले नसेल तर संबंधीत शिक्षण संस्थेवर प्रचलीत नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचा विचार त्यांनी करावा असे येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद हे अपिलार्थीस ही माहिती वरील आदेशाप्रमाणे देतील याची शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी खात्री करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पठाडे विष्णू आण्णासाहेब, मु. पो. ढोरकीन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फातीमा कॉन्व्हेंट स्कूल, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८३३

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किशोर भबुतमल शहा,<br>जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>जळगाव शहर महानगरपालिका,<br>जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त,<br>जळगाव शहर महानगरपालिका,<br>जळगाव. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. किशोर भबुतमल शहा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०२.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांचा दि. ४.७.२००६ रोजीचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७.७.२००६ रोजी प्राप्त झाला. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमानुसार ३० दिवसांत माहिती पुरविण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी प्रथम अपील केले. सदर अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांना उपस्थित राहता आले नाही. परंतु त्यांनी दूरध्वनीवरुन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे व आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. परंतु आजतागायत अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी केली नाही व अंतिमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे आयोगाचे कार्यालयातून त्यांना दि. १.११.२००८ रोजी सुनावणीस हजर राहण्यासाठी सूचनापत्र पाठवून, तसेच राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. १४.११.२००८ रोजी दुपारी ४ वाजता दूरध्वनीद्वारे जळगाव महानगरपालिकेतील श्री. दीपक फुलमोगरे, स्वीयसहायक यांच्यामार्फत संदेश देऊनही उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास अपिलार्थी यांच्यातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, त्यांनी दि. ७.७.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- "सि.सं.क्र. १९९९ टॉवर चौक जवळील दौलत प्लाझा कॉम्प्लेक्सची बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्राची माहिती, सि.सं.क्र. १८६३ चित्राचौक येथील चित्रा टॉकीज पाडून उभारण्यात आलेले P.K. प्लाझाची बोधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्राची माहिती व आकाशवाणी चौकातील सुरु असलेले श्री. खटोड यांचे बांधकामाबाबत बांधकाम परवानगीची प्रत" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थींच्या या माहितीच्या अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.८.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.९.२००६ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे दिसून येते. मात्र या सुनावणीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले किंवा कसे याबाबतची कोणतीही कागदपत्रे आयोगाकडे उपलब्ध नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७.७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने व अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी प्रथमतः सुसंगत असल्याने, तसेच अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असल्याने अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत देय ठरते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे प्रथमतः कोणता प्रतिसाद व तो कधी दिला याची माहिती आयोगाकडे उपलब्ध नाही. मात्र अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे या प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देय असताना देखील ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत त्यांना प्राप्त न झाल्याने आता अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तीस दिवसांचे आत विनामूल्य

पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीअन्वये द्वारे विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नसेल तर आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३) आयुक्त, जळगाव महानगरपालिका, जळगाव यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नसल्यास, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर भबुतमल शहा, प्लॉट नं. २०+२१/३, गजानन हौ.सो.,पार्वती नगर, जळगाव

२. जन माहिती अधिकारी जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८८

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय),<br>पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. पी. एम.अग्रवाल, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एस.एम.वाघमारे, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०८.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तीस दिवसांच्या मुदतीत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा तोंडी वा लेखी युक्तिवाद विचारात न घेता त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात निर्णय दिला. या निर्णयामध्ये न्यायदानात गफलत होऊन, त्याचा परिणाम, अपिलार्थीस योग्य प्रकारे माहिती मिळू शकली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना, त्या निर्णयासंबंधी कोणतेही कारण दिलेले नाही व इतर मुद्यांवर सुनावणीच्या दिवशी युक्तिवाद करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १०.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विधी अधिकारी, वर्ग-ब, या पदाच्या नियुक्तीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण १२ मुद्यांवर संमिश्र स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सदर अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २४.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम

प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५३/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश दि २८.६.२००७ रोजी पारित केले. सदर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न केले आहेत, माहिती देण्यास हयगय किंवा विलंब झालेला नाही, अपिलार्थी माहिती घेण्यास मुद्दाम टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येते" असे नमूद करुन अपिलार्थीस माहिती मिळविण्यात स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीच्या दि. १०.५.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम लेखी प्रतिसाद दि. २४.७.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर दिलेला आहे.या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५३/- इतके भरण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. ३१.५.२००७ रोजी खास दूतामार्फत पो.शि.ब.नं.१४६७ श्री. पठाण यांच्यामार्फत औरंगाबाद येथील पत्त्यावर पाठविण्यात आली होती. या वस्तुस्थितीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी दुजोरा दिला. त्यांनी आयोगास

असे अवगत केले की, सदर पोलीस शिपाई पठाण यांनी अपिलार्थीच्या मोबाईल क्र. ९८२३२९१४२७ वर संपर्क साधला असता, अपिलार्थी बाहेरगावी असल्याचे त्यांना समजले व अपिलार्थीने त्यावेळी श्री. पठाण यांना ते (अपिलार्थी) औरंगाबाद येथे आल्यानंतर माहिती स्वीकारण्याचे कबूल केले. अपिलार्थी ही माहिती घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आल्याने, त्यांनी सदरची माहिती दि. ७.६.२००७ रोजी सिटीचौक पोलीस स्टेशन मार्फत अपिलार्थीस पाठविली, त्यावेळी देखील अपिलार्थी त्यांच्या निवासस्थानी उपलब्ध नव्हते. त्यानंतर ज्यावेळी अपिलार्थी त्यांच्या निवासस्थानी उपलब्ध झाले व त्यांना सदर माहिती देण्यात आली त्यावेळी अपिलार्थीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्याचे कारणावरुन सदर माहिती स्वीकारण्याचे नाकारले व अंतिमत: त्यांना ही माहिती दि. ६.९.२००७ रोजी स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि . ६.९.२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदत संपल्यानंतर प्राप्त झाली व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कोणत्याही कारणाशिवाय असल्याचे व तोंडी व लेखी युक्तिवाद लक्षात न घेता, दिल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेले दि. २८.६.२००७ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करता सदर सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर होते. अपिलार्थी यांचा असा दावा आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची त्यांना संधी दिली नाही, तथापि आपले हे म्हणणे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे म्हणणे मांडण्याची जन अपिलीय अधिकारी यांनी संधी दिली असून सर्वांचे उपलब्ध तोंडी व लेखी म्हणणे आपले निर्णय देताना लक्षात घेतल्याचे दिसून येते.

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ लेखी व तोंडी युक्तिवाद आयोगासमोरील सुनावणीच्या वेळी सादर करण्यात येईल, असे म्हटले आहे, परंतु अपिलार्थी हे त्यांच्या युक्तिवादासाठी आज आयोगासमोर हजर नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली संपूर्ण सुसंगत माहिती दिली आहे, तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, उपलब्ध असलेला पुरावा पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोबाईलद्वारे संपर्क साधला होता किंवा कसे, या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना मागील दि. ०३.७.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी योग्य तो पुरावा सादर करण्याचे आदेशित केले होते. तथापि भ्रमणध्वनी कंपनीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांना देता येणे शक्य नसल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांना आपले म्हणणे सिध्द करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करता आली नाहीत. तसेच अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाद्वारे माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खास दुताकरवी व्यक्तिशः माहिती देण्याचा अट्टाहास धरण्याचे कोणतेही कारण आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून आले नाही. या परिस्थितीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे अथवा माहिती देण्याचे नाकारल्याचे, निःसंशयपणे आढळून न आल्याने त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत. अपिलार्थीस आता स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पाठविली असल्यामुळे, त्यांना माहिती देण्यासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा, विश्वासनगर, लेबर कॉलनी, प्लॉट नं. एस.आर.टी.-१९, हनुमान मंदीराजवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६५

निर्णय दिनांक : २०.११.२००८

१ श्री. अजित एम.देशमुख, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
निगडी, पुणे.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
निगडी, पुणे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: नगररचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण
निगडी, पुणे.

जन अपिलीय अधिकारी: मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण
निगडी, पुणे.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अनिल शंकर काळे, जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.सुहास दिवसे, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे

(यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अजित एम. देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०६.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना पूर्णपणे माहिती न दिल्याने व दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. ०३.२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, भूखंड विक्रीबाबत एकूण ४ मुद्यांवर शीघ्र टपालाद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. त्याचदिवशी (दि. १६.३.२००६ रोजी )अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.३.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि त्या दिवशी अपिलार्थी सुनावणीस हजर न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर दि. २६.५.२००६ रोजी आपले निर्णय पारित करुन त्या निर्णयामध्ये जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी, अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूरी वाटत असेल तर त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे, याबाबत संबंधित प्राधिकरणाकडे योग्य तो अर्ज करुन माहिती मागवावी, असा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १६.३.२००६ व २.६.२००६ या दोन वेगवेगळया दिवशी पुरविलेल्या आहेत. मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांनी दि. २.६.२००६ च्या पत्राद्वारे दिली असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांनी अद्यापही अपिलार्थीस दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शिवाय कोणतीही माहिती देण्याचे बाकी राहिलेले नाही, असे आयोगाचे निदर्शनास येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते तसेच अपिलार्थीस माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य पुरवावी लागेल.

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उशीरा माहिती दिल्याबद्दल माहिती अधिकाऱ्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० नुसार योग्य ती कारवाई करण्याचा दिलेला निर्णय हा त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या कक्षा ओलांडून दिल्याचे दिसून येते. अधिनियमातील कलम २० हे फक्त राज्य माहिती आयुक्तांनी वापरणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे, हे येथे नमूद करणे अगत्याचे आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाची हाताळणी योग्य प्रकारे केली नसल्याचे तसेच या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचे आढळून आले आहे. सुनावणीच्या वेळी आयोगास असे आढळून आले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या वेगवेगळया सहायकांकडून प्राप्त करुन घेऊन,नंतर ती संकलीत करुन पुरवावयाची होती, हे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना सहाय्य करणाारे त्यांचे सर्व सहायक ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे देखिल तितकेच जबाबदार आहेत, असे दिसून येते. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब माहिती अधिकार अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांच्या सर्व सहायक कर्मचारी/अधिकाऱ्यांवर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.अजित एम्.देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजारोड, बीड-४३११२२.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,निगडी,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,निगडी,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२७

निर्णय दिनांक : २०.११.२००८

१ श्री. मनोज निंबाजी हिवरकर, : अपिलार्थी
रा. काकोडा जि.जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक वन संरक्षक (भ. व का.)
जळगाव वनविभाग, जळगाव
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, जळगाव, वन विभाग,
जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. कदीम महेमुद, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक वन संरक्षक, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. पद्माकर नारायण भामरे, जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मनोज निंबाजी हिवरकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०४.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाप्रमाणे सुनावणी न घेता, त्यांच्याशी अनावश्यक पत्रव्यवहार केला, असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. ०९.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वडोदा वनक्षेत्रात गोळा केलेल्या डिंकाच्या लिलावाशी संबंधित व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण १० मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००० ते २००६ इतका असून अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध नसल्याने त्यांनी, ही माहिती ज्या अधिकाऱ्याच्या स्तरावर उपलब्ध आहे त्या सहायक माहिती अधिकारी (वनक्षेत्रपाल, वडोदा) यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज दि. १३.२.२००७ रोजी पाठविला. त्यानंतर वनक्षेत्रपाल, वडोदा, जे या प्रकरणी सहायक माहिती अधिकारी आहेत, त्यांनी अपिलार्थीस दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पाहण्यासाठी व्यवस्था केल्याचे कळविले. तथापि अपिलार्थीने संबंधित वनक्षेत्रपाल यांनी विनंती केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमामधील कलम १९(१) अन्वये दि. २६.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांच्याकडील दि. २९.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये

अपिलार्थीचा अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ पाठविला. जन माहिती अधिकारी यांनी परत तो अर्ज दि. ३०.३.२००७ रोजी वनक्षेत्रपाल,वडोदा (सहा.जन माहिती अधिकारी) यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. त्यानंतर वनक्षेत्रपाल वडोदा यांनी दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे शुल्क रु. ४८६/- चे चलन अपिलार्थीस

पाठविले. त्याची पोच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. वन क्षेत्रपाल यांनी चलन पाठवून-सूचना देऊनही अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला नाही व वनक्षेत्रपाल,वडोदा यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याने, माहिती स्वीकारण्याचे नाकारले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, तीचे स्वरुप हे व्यापक व मोठे असल्याने ही माहिती संकलीत करण्यासाठी त्यांना काही कालावधी लागला. अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता नाही मात्र अधिकाऱ्यांना मुद्दाम त्रास देण्याच्या दृष्टीने ते माहिती मागवतात व अधिकाऱ्यांना वेठीस धरत असतात. राज्य माहिती आयोगाकडे झालेल्या सुनावणीच्या वेळीही अपिलार्थी उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित राहत नाहीत. मा. लोकायुक्त, मंत्रालय येथे खोटे अर्ज करणे ही त्यांची नित्य सवय आहे. माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे गेले असता, मला माहितीची गरज नाही, असे सांगतात व शासनाच्या वेळेचा व निधीचा अपव्यय करतात. अपिलार्थीच्या या प्रवृत्तीची नोंद घेण्यासाठी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ९.२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही मोठया प्रमाणात होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी सहायक माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पाठविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती संकलीत करण्याकरिता संबंधित वनक्षेत्रपाल,वडोदा यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती एकाच वेळी उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे तसे कळविले आहे. या पत्रामध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची तपासणी करण्याची देखील त्यांनी अपिलार्थीस तयारी दर्शविली आहे. तथापि अपिलार्थी माहितीची तपासणी अथवा पहाणी करण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत, मात्र त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात वनक्षेत्रपाल,वडोदा यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४८६/- इतके त्यांच्याकडील दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले, तथापि अपिलार्थी यांनी सदर शुल्काचा भरणा केलेला नाही.

या घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या दि. ९.२.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांना दि. ८.३.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे प्रतिसाद देऊन त्यांना माहितीपोटीचे शुल्क कळविण्यास हवे होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक त्या शुल्काची कल्पना वनक्षेत्रपाल, वडोदा यांच्या दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये आली आहे. अपिलार्थी यांचा

मूळ माहितीच्या अर्जाचा दिनांक व अपिलार्थीस शुल्क कळविल्याचा दिनांक यामधील कालावधी अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त असल्याने आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागवूनही ते जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही हजर न झाल्याची बाब लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून हस्तगत करावी. सदर माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी त्यांचा कोणताही प्रतिनिधी पाठविणे अनुज्ञेय असणार नाही.या मुदतीनंतर अपिलार्थीस या अर्जासंदर्भातील ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य देय असणार नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीबाबत व अपिलार्थीच्या अधिनियमाप्रमाणे नियमित माहिती मागवून ती न स्वीकारण्याच्या सवयीबद्दल वरील पच्छिेदात युक्तिवाद केला आहे. अशाच प्रकारचा युक्तिवाद इतर जन माहिती अधिकारी देखिल इतर अर्जदारासंदर्भात आयोगाकडे वारंवार करीत असतात, हे पाहता, कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागताना त्या माहितीच्या आकारमानावर बंधने घालण्याची वेळ आली आहे, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती , हे आदेश निर्गमित होताच, व्यक्तिशः १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोज निंबाजी हिवरकर, मु.काकोडा पो.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर जि.जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (भ. व का.) जळगाव वनविभाग, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग जळगाव, आकाशवाणी चौक,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२८

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. पुनम योगेश चौधरी,<br>रा. जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जळगाव. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जळगाव. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. जनार्दन रामचंद्र बोदडे,अधीक्षक,वर्ग-२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी सौ. पुनम योगेश चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०४.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना मिळालेली नाही, जाणिवपूर्वक माहिती लपविली जात आहे, या कारणावरुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे व मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २९.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आंतर-जिल्हा बदलीबाबत दि. १.१.२००४ ते ३१.१२.२००६ या कालावधीशी संबंधित एकूण २ मुद्यांवर, शीघ्र टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने व सदर माहिती रेकॉर्ड रुममधून उपलब्ध करुन घ्यावी लागणार असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस दि. ३०.३.२००७ पर्यंत देण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन या संदर्भात दि. ३१.५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे सूचित केले आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती द्यावी किंवा कसे याबाबत कोणतेही

स्पष्ट आदेश दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती त्यांनी दि. १२.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे स्पीड पोस्टाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची असल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती रेकॉर्ड रुममधून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्याने अपिलार्थीस ते विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्यांना द्यावयाची प्रस्तावित माहिती किती पृष्ठांची आहे व ती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर किती, अशा संपूर्ण हिशोबासह अपिलार्थीस शुल्क कळविणे अभिप्रेत आहे. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी न करता अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने व सदर माहिती रेकॉर्ड रुममधून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्याने ती, दि. ३०.३.२००७ पर्यंत द्यावयाचे आश्वासित केले, सदर प्रतिसाद हा अधिनियमातील तरतुदीनुसार नसल्याने तो चुकीचा ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ९.३.२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीप्रमाणे ३० ते ४५ दिवसात न घेऊन या कलमाचा भंग केला आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी उशिरा घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस सशुल्क माहिती द्यावयाची किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख

केलेला नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय देखील सदोष ठरत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये जळगाव जिल्हा परिषदेमध्ये बदलून आलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या सर्व्हीसबुकच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्स प्रती, नेमणूक आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये त्यांनी या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस दिल्या नसल्याचे दिसून येते. त्यांनी नेमणूक प्रवर्ग कोणत्या कागदपत्रांच्या आधारे निश्चित केला आहे, त्या पुराव्याचा संदर्भ अपिलार्थीस त्यांच्या दि. ८.३.२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिलेला आहे. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १४६८/- भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने अर्ज केल्यापासून ३० दिवसांचे आत न कळविल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे आता विनामूल्य देय ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेली माहिती अशाप्रकारे अर्धवट दिल्याचे सिध्द होत आहे. अर्थात या मागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्‌हेतू असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेल्या पुराव्याच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. तथापि

अपिलार्थीचे सदर विधान वस्तुस्थितीशी सुसंगत नसून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.४.२००७ रोजी द्वितीय अपील करण्यापूर्वी म्हणजेच दि. ८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविल्याचे दिसून येते. सदर पत्र त्यांनी स्पीड पोस्टाद्वारे दि. १२.३.२००७ रोजी पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला असून अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना अशाप्रकारची असत्य विधाने करु नयेत, अशी त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती , हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. पुनम योगेश चौधरी, द्वारा भास्कर काळे, प्लॉट नं. १२,'ओम' शंकर नगर, सैफ प्रोव्हीजनजवळ, कासमवाडी रिक्षा स्टॉप, जिल्हापेठ, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८२९

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. पुनम योगेश चौधरी,<br>रा. जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा),<br>जिल्हा परिषद,जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जळगाव. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. जनार्दन रामचंद्र बोदडे,अधीक्षक,वर्ग-२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी सौ. पुनम योगेश चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०४.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आजपर्यंत मिळालेली नाही, भ्रष्टाचार उघडकीस येण्याच्या भीतीमुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दाम टाळाटाळ केली जात असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदर द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे व याचबरोबर मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २९.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ ते २००६ या कालावधीतील, जळगाव जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांची वैयक्तिक माहिती व याच कालावधीतील प्राथमिक शिक्षकांच्या पदांच्या वर्षनिहाय कमीजास्त स्थितीची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता, ही माहिती अपिलार्थीस देण्यास विलंब लागण्याची शक्यता वर्तवून माहिती तयार झाल्यानंतर, ती अपिलार्थीस सत्वर देण्याचे आश्वासित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात दि. ३१.५.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ३० दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले.

निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती द्यावयाची किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी माहितीपोटीचे रु. १००६/- इतके शुल्क आकारुन, अपिलार्थीस दि. १९.५.२००७ रोजी दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. २९.१.२००७ रोजीच्या माहितीच्या प्रथम अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रथम प्रतिसाद चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार अर्जदाराचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून, त्यांनी अर्जदारास ३० दिवसांचे आत त्यांना पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व त्याचा प्रतिपृष्ठ दर याप्रमाणे एकूण शुल्काचा हिशोब कळविणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशाप्रकारे कोणत्याही शुल्काचा हिशोब मुदतीत न कळविता, माहिती तयार करण्यास वेळ लागेल, असे मोघम विधान करणारे पत्र दि. २६.२.२००७ रोजी अपिलार्थीस पाठविले. अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती शुल्क लागेल, याची कल्पना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस मूळात शुल्क भरण्याचे पत्र दि. १९.५.२००७ रोजी म्हणजे अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिल्याचे दिसून येते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने दिले असल्याने

अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देय ठरते, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.१००६/- त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यापोटी त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रु.१००६/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत परत करावे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने व प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थी यांनी कोणताही लेखी अथवा तोंडी आक्षेप कळविला नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित व पूर्ण माहिती दिल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु. १००६/- इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच, पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. पुनम योगेश चौधरी, द्वारा भास्कर काळे, प्लॉट नं. १२,'ओम' शंकर नगर, सैफ प्रोव्हीजनजवळ, कासमवाडी रिक्षा स्टॉप, जिल्हापेठ, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८३०

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजीव जी. नैनाव,<br>रा.पाचोरा जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय ,<br>जळगाव<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक,<br>जळगाव | : | प्रतिवादी |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः | पोलीस उपअधीक्षक (गृह),<br>पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव. |
| जन अपिलीय अधिकारीः | अपर पोलीस अधीक्षक,<br>जळगाव. |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. संजय ठाकरे, व.श्रे.लिपीक, श्री. डी.डी.पाटील,क.श्रे.लिपीक जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. धनंजय कुलकर्णी, जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर

अपिलार्थी श्री. संजीव जी. नैनाव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०४.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व खोटे उत्तर दिल्याने व विहित मुदतीत माहिती न देऊनही त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क रु.६६/- इतके बेकायदेशीरपणे भरुन घेतले, तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी सदरचे अपील राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.१२.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- पिंपळगाव (हरे) पोलीस स्टेशनचे ए.पी.आय.श्री. राजभोज यांनी पोलीस स्टेशनचा चार्ज घेतल्यापासून ते दि. १९.१२.२००६ पर्यंत जळगाव येथील एल.सी.बी. (स्थानिक गुन्हे शाखा) यांचेकडे दाखल केलेल्या गुन्हयाचे ही त्यातील आरोपींची नावे एल.सी.बी. कडे दाखल झालेल्या गुन्हयांचे संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ८.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला, तथापि सदर प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २७.२.२००७

रोजीच्या अपील अर्जावर सुनावणी घेणे न्यायोचित राहील, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे केलेल्या दि. २७.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले निर्णय लेखी स्वरुपात अपिलार्थीस कळवावेत. या सुनावणीची नोटीस त्यांनी अपिलार्थीस किमान सात दिवस अगोदर मिळेल, असे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि. २७.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले निर्णय लेखी स्वरुपात अपिलार्थीस कळवावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजीव जी.नैनाव, प्लॉट नं. २०, नारायणनगर, पाचोरा, ता.पाचोरा, जि. जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८३१

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रविंद्र नंदलाल लढे,<br>रा. जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, धुळे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडळ कार्यालय,धुळे. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रविंद्र नंदलाल लढे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. भगवान बुधा मासूळ, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मंडळ कार्यालय,धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, - ते सेवेत कार्यरत असताना त्यांना नोव्हेंबर.२००५ मध्ये रु.१०००/- इतका दंड करण्यात आला, तो कोणत्या सेवानियमाप्रमाणे व त्यातील कोणत्या कलमाखाली, कोणत्या कागदपत्रांच्या आधारे त्या परिपत्रकासंबंधीची त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी हे देण्यास टाळाटाळ करीत आहेत,- असे नमूद करुन, याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. ३१.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात नोव्हेंबर,२००५ ते ऑगस्ट,२००८ अखेरपर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये काही माहिती - त्यांना करण्यात आलेला दंड ज्या नियम/परिपत्रकाच्या आधारे लावण्यात आला, त्यासाठी असलेल्या सेवानियमाची व संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, त्यांच्या दि.१५.१२.२००५, १२.१.२००६ व ४.४.२००६ च्या अर्जावर सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले शेरे, निर्णय, सक्षम अधिकाऱ्यासमोर ठेवलेली कार्यालयीन टिपणी, त्यावरील शेऱ्यासह इ. च्या साक्षांकित प्रती व केलेला दंड परत करणार का नाही, परत करणार असल्यास अपेक्षित कालावधीची माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.११.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती देऊन, अपिलार्थीस काही माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे दि. २३.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी यासंदर्भात दि. १५.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती योग्य रितीने दिली असल्याचे नमूद करुन सामान्य आदेश क्र. १५७, दि. १८.८.२००३ ची प्रत अपिलार्थीस पाठविली. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असंबद्ध माहिती पाठविली असंबंधित आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. ११.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमतः असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागविली आहे. यातील मुद्दा क्र. I व मुद्दा क्र. II च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या प्रश्नास उत्तर अशा स्वरुपात माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस मूलतः त्यांना १०००/- रु.दंड कोणत्या नियम/परिपत्रकाच्या आधारे करण्यात आला, याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम माहितीच्या अर्जासंदर्भात त्यांच्या कंपनीच्या सेवानियमांची प्रत अपिलार्थीस देणे योग्य राहिले असते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस कंपनीने लावलेल्या दंडाचे समर्थन केले आहे.

आज रोजी आयोगाला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी सेवाविनियम प्रकरण एकची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी सादर केली. यातील कलम ८७ अन्वये गौण चुका प्रकरणी कारवाई करण्याची पध्दत नमूद केली असून, त्यातील कलम (क) मध्ये सक्षम अधिकारी कर्मचाऱ्यास त्याच्या मासिक स्थूल वेतनाच्या जास्तीत जास्त १/३ इतक्या रकमेपर्यंत दंड करु शकेल, असे म्हटले आहे. या कलमामध्ये असा दंड करण्याबाबत सर्वसाधारणत: कर्मचाऱ्याचे लेखी स्पष्टीकरण घेण्यात येईल, अशी तरतूद आहे. या कलमाचे अवलोकन केले असता अपिलार्थीवर सक्षम प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सेवा विनियम कलम ८७ क व ख प्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येते. सदर सेवाविनियम संबंधित कलमाच्या साक्षांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात अद्यापि पाठविल्या नसल्याचे दिसून येते. त्या प्रती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्या लागतील. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. II द्वारे अपिलार्थीस त्यांच्या दि. १५.१२.२००५ , १२.१.२००६ व ४.४.२००६ च्या मूळ अर्जाच्या झेरॉक्स प्रती आवश्यक असल्याचे दिसून येते. तथापि या मुद्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या अर्जांवर सक्षम अधिकाऱ्याचा कोणताही शेरा नाही, असे उत्तर दिले आहे. तसेच या मुद्याद्वारे अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या कार्यालयीन टीपणीची प्रत दिलेली नाही. जी अपिलार्थीस अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. III ची माहिती अपिलार्थीस देय राहणार नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्याद्वारे त्यांचे मत विचारल्याचे दिसून येते तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही भविष्यकाळातील असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी देऊही शकणार नाहीत.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस मूळात रु१०००/-इतक्या दंडाची कंपनीकडून झालेली कारवाई अन्यायकारक असल्याचे

त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, सदर कारवाई करताना त्यांचे कोणतेही म्हणणे अथवा स्पष्टीकरण विचारात घेतले नव्हते, जे सेवाविनियमामधील उपरोक्त कलम ८७ अन्वये आवश्यक आहे. अपिलार्थीस दिलेली शिक्षा ही योग्य आहे किंवा अयोग्य आहे, या तपशीलात आयोग जाऊ इच्छित नाही, कारण असे केल्याने जन माहिती अधिकारी यांच्या प्रशासकीय अधिकारामध्ये कोणत्याही कारणाशिवाय हस्तक्षेप केल्यासारखे होईल व असे करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने, या मुद्यावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. मात्र उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भाने त्यांना माहिती देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाचा खुलासा केला आहे व अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे अपिलार्थीस पुरविलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जो प्रथम प्रतिसाद दिला आहे, तो अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर दिला आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळले, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे.

वरील वस्तुस्थितीवरुन, दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३१.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. I व II च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

मर्यादित, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. I व II शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,मर्यादित नाशिक यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रविंद्र नंदलाल लढे,१६ गणेश कॉलनी, जळगाव-४२५००१

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८३२

निर्णय दिनांक : २०.११.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिलीप गौरीशंकर अग्रवाल,<br>बोदवड, जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सरकारकुन,<br>जिल्हाधिकारी कार्यालय (ग्रा. पं.शाखा),<br>जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जळगाव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. लक्ष्मण नामदेव सातपुते,अव्वल कारकुन (ग्रा.पं.शाखा), जन माहिती अधिकारी तथा सरकारकुन (ग्रा. पं.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. दिलीप गौरीशंकर अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०१.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी

आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की,- जिल्हाधिकारी यांनी दि. २३.६.२००४ ला शाखा प्रमुख यांना पत्र क्र. ३/२८/कावि-८७१ दिले आहे. या संदर्भात काय कार्यवाही झाली याची त्यांना अद्याप माहिती प्राप्त होऊ शकली नाही. ग्रामपंचायत, बोदवड हे नियमबाहय व चुकीचे ठराव घेऊन शासनाची व जनतेची गैरसोय करतात, याबाबत जिल्हाधिकारी यांनी वरील हुकूम दिला आहे. माहिती अधिकारात त्यांना मिळालेल्या माहितीनुसार सदर ठराव नियमबाहय असल्याची माहितीसुध्दा दिलेली असताना ग्रामपंचायत बोदवडने केलेला सदर ठराव अद्यापि रद्द झालेला नाही. ग्रामपंचायत बोदवड व जि.प. जळगाव यांच्या कामात प्रचंड प्रमाणात अनियमितता असून भ्रष्टाचार आहे. जन अपिलीय अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी अपिलाची कागदपत्रे स्वीकारत नाहीत व माहितीही देत नाहीत, या अर्जाच्या शेवटी त्यांनी सदर प्रकरणाची विभागीय चौकशी करुन, खरी व अचूक माहिती देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी मूलतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रशासकीय बाबीसंदर्भात एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.११.२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या सर्व मुद्यांवरील माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलासोबतच्या प्रथम अपिलाच्या झेरॉक्स प्रतीवर दिनांकाचा उल्लेख नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.११.२००६ व

१८.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. १८.१२.२००६ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नस्तीबंद केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपील दाखल केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस,त्यांच्या दि. २.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली पूर्ण माहिती दि. २३.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना, जिल्हाधिकारी जळगाव यांच्या दि. २३.६.२००४ च्या पत्राचा संदर्भ दिला आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमध्ये या पत्राचा संदर्भ दिलेला नाही. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात, प्रशासकीय बाबीसंदर्भात माहितीची मागणी केल्याचे दिसून येते. जिल्हाधिकारी,जळगाव यांच्या दि. २३.६.२००४ रोजीच्या पत्रान्वये शाखाप्रमुख,ग्रा.पं.शाखा जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव यांना जिल्हाधिकाऱ्याने दिलेले आदेश खालीलप्रमाणे आहेत, " श्री. दिलीप गौरीशंकर अग्रवाल रा.बोदवड यांनी ग्रामपंचायत बोदवडने गट नं.१३/१ बाबत केलेला ठराव रद्द करणे कामी अर्ज केलेला आहे. सोबत प्रत पाठविलेली आहे. सदरची बाब आपले शाखेशी संबंधित असलेने याकामी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच अर्जदार यांना परस्पर कळविणेत यावे." या पत्राची प्रत जिल्हाधिकारी,जळगाव यांनी अपिलार्थीस अग्रेषित केली असून अपिलार्थीस असे अवगत करुन दिले की, ग्रा.पं.ठराव रद्द करण्याची बाब ही जिल्हा परिषद,जळगाव यांचेशी संबंधित असल्याने त्यांचा अर्ज जिल्हा परिषदकडे

पाठविण्यात येत असून यासंदर्भात अपिलार्थीने जिल्हा परिषदेशी संपर्क साधण्याचे पुढे सूचित केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या दि. २.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.११.२००६ रोजी दिलेली माहिती आयोगास सुसंगत वाटत आहे. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पुरेशी सुसंगत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी अपेक्षिलेल्या ९ मुद्यांवर योग्य तो खुलासा व माहिती दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत आवश्यक तो खुलासा केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी असे दिसून येते की, ग्राम पंचायत बोदवड यांच्या कथित अनियमित कारभाराविषयी अपिलार्थी हे सर्व संबंधितांकडे वारंवार चौकशीची मागणी करीत आहेत. अपिलार्थी यांच्या आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीची मूळ तक्रार ग्राम पंचायत,बोदवड यांच्याविरुध्द असून ग्रामपंचायत विभागातील कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे असल्यामुळे अपिलार्थीस जिल्हा परिषदेकडे संपर्क साधण्याची जिल्हाधिकारी यांनी केलेली सूचना आयोगास योग्य वाटते. विचाराधीन अपील अपिलार्थीच्या, ज्या मूळ अर्जावर आधारित आहे, त्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिल्याचे आढळल्याने, अपिलार्थी यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

माहिती अधिकार अधिनियमाद्वारे माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे, अशी कार्यवाही अभिप्रेत आहे. माहिती अधिकाराच्या कक्षा लक्षात घेता, अपिलार्थीचा मूळ अर्ज बोदवड,ग्रामपंचायत

संबंधित असल्याने अपिलार्थीने त्यांच्या तक्रारीची तड लावण्यासाठी योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०.११.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीप गौरीशंकर अग्रवाल,मेनरोड बोदवड, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा सरकारकुन (ग्रा. पं.शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८५०

निर्णय दिनांक २१-११-२००८

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, अपिलार्थी

८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,

धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक वनसंरक्षक,

यावल वन विभाग, जळगांव,

जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप वनसंरक्षक,

यावल वन विभाग, जळगांव,

जिल्हा जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रामेश्वर भिकनराव सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, यावल वन विभाग, जळगांव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अजित दत्तात्रय भोसले, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, यावल वन विभाग, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १७-०८-२००६ रोजी नोंद केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी कायदेशीर शुल्काची रक्कम भरुन घेतली नाही व त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केलेले आहे. तसेच या अर्जान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य माहिती देण्याचे व त्यांच्याकडून वसूल केलेले माहितीपोटीचे शुल्क रुपये ११०० इतके त्यांना परत करण्याचे आदेश द्यावेत व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व अर्धवट माहिती पुरविल्यामुळे त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती केली आहे. या अपिलामध्ये शेवटी त्यांनी या प्रकरणी त्यांना कराव्या लागणा-या पत्रव्यवहारासाठी एकूण रुपये १५०० इतका खर्च आला असून तो नुकसानभरपाईपोटी त्यांना देण्यासाठी देखील आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक १९-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९८९ ते १९९४ या कालावधीशी संबंधीत वन मजुरांची माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११०० इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०६-२००६ रोजीच्या पत्राबरोबर या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०७-२००६ रोजी काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १२-०६-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही असे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-०५-२००६ व २३-०६-२००६ च्या पत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये निर्णय दिला असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११०० इतक्या रकमेचा शासकीय कोषागारात भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व अपिलार्थीने सदर शुल्क न भरल्यास त्यांचे अपील निकाली काढण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे विचारले असता अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीच्या काही प्रती अवाचनीय, अस्पष्ट आहेत व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भाने केलेला पत्रव्यवहार ज्याचा त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये समावेश होता त्याचा या माहितीमध्ये समावेश नाही. अपिलार्थीच्या दिनांक १९-०२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मूळात ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीत नव्हती, त्यामुळे ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होऊ शकत नाही. सबब अपिलार्थीचा हा मुद्दा येथे फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीस या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांशी केलेल्या पत्रव्यवहारांची तपासणी करावयाची असेल किंवा त्याच्या प्रती हव्या असतील तर त्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीसाठीचा स्वतंत्र अर्ज करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस त्यांना माहितीपोटीचे शुल्क रुपये ११०० इतके भरण्याचे सूचित केले असले तरी या पत्रामध्ये त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काच्या संपूर्ण हिशोबाचा तपशील अपिलार्थीस कळविला नाही. या पत्रामध्ये माहितीच्या संभावीत पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर या तपशीलाचा समावेश नाही. अपिलार्थीस संपूर्ण हिशोब न पुरविण्याच्या त्यांच्या या कृतीमुळे अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा जन माहिती अधिकारी यांच्याकडून भंग झाला आहे, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीपैकी आता द्यावयाची उर्वरित माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी पुरविलेल्या अस्पष्ट प्रतींऐवजी अपिलार्थीस वाचनीय स्वरुपात माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती पुरवावयाची असल्यामुळे त्यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ११०० इतके अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत परत करावे लागेल. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे नकार दिलेला नाही व त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ न केल्याने त्यांच्यावर शास्तीचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी १५०० रुपये इतकी नुकसानभरपाई या प्रकरणी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारापोटी मागितली आहे, तथापि सदर रकमेचा तपशील अपिलार्थी राज्य माहिती आयोगासमोर सादर करु न शकल्यामुळे ही नुकसानभरपाई अपिलार्थीस देय होणार नाही.

वन विभागाच्या आयोगाकडे दाखल केलेल्या ब-याच व्दितीय अपिलांमध्ये बहुतांश वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक यांच्याकडे त्यांच्या क्षेत्रीय पातळीवरची माहिती मागविली जाते. सदर माहिती क्षेत्रीय पातळीवरुन गोळा करुन नंतर ती अर्जदारास

पुरविण्याकामी विलंब होत असतो व याचा परिणाम म्हणून जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास विलंबाने माहिती पुरविली जाते असे आयोगास आढळून आले आहे. अर्जदारास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने सचिव (वने) यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी वन क्षेत्रपाल पातळीवरील अधिका-यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करण्याचा विचार करावा.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली हा अपिलार्थीचा मुद्दा सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीपैकी जी माहिती अस्पष्ट किंवा अवाचनीय स्वरुपात पुरविली आहे ती माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ११०० त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत परत करावे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, यावल वन विभाग, जळगांव, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, यावल वन विभाग, जळगांव, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (वने), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८५१

निर्णय दिनांक २१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ,<br>८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,<br>धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक वनसंरक्षक,<br>मेवासी वन विभाग, तळोदा, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक,<br>मेवासी वन विभाग, तळोदा, जिल्हा नंदुरबार | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नामदेव गुमानसिंग पटले, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उत्तम गणपतराव कडलग, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १७-०८-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट व अपूर्ण स्वरुपाची असल्यामुळे त्यांनी दिनांक ११-०४-२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, मेवासी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असता, त्यांनी या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा त्यांच्या अपील अर्जासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. वन परिक्षेत्र अधिकारी, वडफळी यांनी त्यांना प्रथमतः दिनांक ३१-०३-२००६ रोजी माहिती पुरविली. त्यानंतर परत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०३-०५-२००६ रोजी काही माहिती पुरविली असता ती अर्धवट आढळून आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती पुरविल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश द्यावेत अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये श्री. डी. बी. बैसाणे, सहाय्यक वन संरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा, जिल्हा नंदुरबार यांना उद्देशून सन १९८४ ते १९८६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे बांबुफुलोराबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला अर्ज श्री. डी. बी. बैसाणे, सहाय्यक वन संरक्षक, यांच्या नांवाने केला होता, तथापि सदर अर्ज सहाय्यक वन संरक्षक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्या कार्यालयाने तो अर्ज श्री. डी. बी. बैसाणे, यांच्याकडे पाठविला. तथापि श्री. डी. बी. बैसाणे, हे त्यावेळी नाशिक येथे बदलीवर निघून गेले असल्याने, त्यांनी नाशिक येथून अपिलार्थीचा सदर अर्ज त्यावेळी कार्यरत असलेले सहाय्यक वन संरक्षक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत पाठविला. अपिलार्थीचा विचाराधीन प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक ०८-०३-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात वन परिक्षेत्र अधिकारी, वडफळी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती दिली. यामध्ये अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ६ ते ८ च्या संदर्भातील माहिती ही विभागीय स्तरावरील असल्यामुळे वन परिक्षेत्र अधिकारी हे अपिलार्थीस ती देऊ शकले नाहीत व त्यांनी तसा उल्लेख या पत्रामध्ये केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्याखाली एकूण ३ वन परिक्षेत्र अधिकारी कार्यरत असून, या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये फक्त वन परिक्षेत्र अधिकारी, वडफळी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. वन परिक्षेत्र अधिकारी, वडफळी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व उर्वरित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिल अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस परत काही माहिती दिली तथापि सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अशा प्रकारे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही अहवाल मागितले होते. त्या अहवालाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो दिल्या नाहीत तरी या अहवालाच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवाव्यात, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादा-मध्ये नमूद केलेल्या अहवालाच्या प्रती आता अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतली जाण्याचे कारण आयोगास सांगण्यास असमर्थता व्यक्त केली, कारण त्यांनी या पदाचा कार्यभार नव्याने दिनांक ०१-०७-२००८ रोजी स्वीकारला आहे. उपरोक्त प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वन विभागाच्या वन परिक्षेत्र अधिकारी स्तरावर उपलब्ध होती. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्याखाली एकूण ६ वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यरत होते, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वन परिक्षेत्र अधिकारी, वडफळी, मोलगी व काठी येथील वन परिक्षेत्र अधिका-यांशी संबंधीत होती. सदर वन परिक्षेत्र अधिका-यांची सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत वन परिक्षेत्र अधिका-यांकडून घेऊन ती एकत्रित करुन ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावयाची होती, असा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता सर्वसाधारण परिस्थितीत ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा उप वनसंरक्षक यांच्या कार्यालयात उपलब्ध असण्यास काही हरकत नव्हती. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण ८ मुद्दयांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण ही माहिती अपिलार्थीने मोघम स्वरुपात जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे, मात्र उर्वरित ७ मुद्दयांवरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरते. या ७ मुद्दयांपैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ७ ची माहिती दिल्याचे दिसते, मात्र अपिलार्थीस

मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना, अपिलार्थीने मागणी केलेली अहवालाच्या प्रती पुरविल्या नाहीत, या कारणास्तव, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे स्वरुप अर्धवट असल्याचे सिध्द होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील वन परिक्षेत्र अधिका-यामार्फत जरी माहिती देण्याचा प्रयत्न केला असला तरी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास स्वतः जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पुरविणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने अर्ज केल्यास आपल्या कनिष्ठांना, ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केलेली नाही, त्यांना अर्जदाराच्या अर्जाची प्रत पाठवून अर्जदारास परस्पर माहिती देण्याचे त्यांना सूचित करणे हे अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. अर्जदारास अधिनियमा-तील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडूनच माहिती पुरविली गेली पाहिजे. अर्जदारास विहित माहिती मिळाली किंवा कसे हे तपासण्याची व पाहण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्यावरच आहे. जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांची कर्तव्ये अधिनियमातील कलम ५ (१) व (२) मध्ये स्पष्ट केलेली आहेत, त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी फक्त अर्जदाराचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे देणे एवढेच या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वतः माहिती अपिलार्थीस न देता माहिती देण्याची आपली जबाबदारी टाळली आहे, असे म्हणण्यास येथे पुरेसा वाव आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस वन परिक्षेत्र अधिकारी यांच्यातर्फे माहिती पुरविण्याचा प्रयत्न करुन याव्दारे स्वतःची जबाबदारी टाळली आहे व आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य वनसंरक्षक, धुळे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ मध्ये नमूद केलेल्या अहवालाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ मधील अहवालाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

३. मुख्य वनसंरक्षक, धुळे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), एस. आर. पी. कॅम्पजवळ, धुळे, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक १८५२, १८५३, १८५४, १८५५, १८५६, १८५७ व १८५८**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८५२, १८५३, १८५४, १८५५, १८५६, १८५७ व १८५८

निर्णय दिनांक २१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ,<br>८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,<br>धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक वनसंरक्षक,<br>उत्तर धुळे वन विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक,<br>उत्तर धुळे वन विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार |

**निर्णय**

वरील सात प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २१-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश रेता मोरे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नागेनाहळ्ळी प्रवीण रुद्रेगैडा, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, उत्तर धुळे वन विभाग, शहादा जिल्हा नंदुरबार यांच्याविरुध्द केलेली एकूण ७ अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले असल्याचे नमूद करुन त्यांनी या सर्व अपील प्रकरणांशी संबंधीत प्रथम अर्जांव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या सर्व अपील अर्जामध्ये अपिलार्थीने शासकीय माहिती प्राधिकरणाविरुध्द योग्य ती दंडनीय कारवाई करण्याचे तसेच अपिलीय अधिकारी प्राधिकरणा-विरुध्द कारवाई करण्यास महाराष्ट्र शासनास सूचित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच या सर्व अपील प्रकरणी त्यांना रुपये १०,००० इतका नाहक खर्च करावा लागल्यामुळे त्यांना संबंधीतांकडून रुपये १०,००० इतकी नुकसानभरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०९-०२-२००६ ते ०२-०३-२००६ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ माहितीसाठीचे अर्ज केले असून प्रत्येक अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत वेगवेगळ्या मुद्दयांव्दारे वेगवेगळी माहिती मागविली आहे. अपिलार्थीच्या या सर्व माहितीसाठीच्या

अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे वेगवेगळे शुल्क भरण्याचे वेगवेगळ्या पत्राव्दारे सूचित केले आहे, मात्र अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा कोणत्याही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे न करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या शुल्काची मागणी त्यांना जास्तीची वाटल्याने व केवळ अनावश्यक माहितीच्या शुल्काचा त्यामध्ये समावेश असल्याची त्यांना शंका आल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्षतः माहितीचे अभिलेख तपासणीची मागणी केली व दिनांक ०८-०५-२००६ व दिनांक ०९-०५-२००६ रोजी (अनुक्रमे अपील क्रमांक १८५४, १८५५, १८८८ व १८५२, १८५३, १८५६, १८५७) अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र त्यांच्या दिनांक १२-०६-२००६ च्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीने वेळोवेळी केलेला आपल्या भूमिकेतील बदल लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्याची तयारी दर्शविली होती असे नमूद करुन अपिलार्थीने घेतलेल्या वेगवेगळ्या भूमिकेच्या मुद्दयावर अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त होऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द दंडनीय कारवाई व्हावी. यापेक्षा आपले अधिक काही म्हणणे आहे काय असे आयोगाने विचारले असता यापेक्षा अधिक काही सांगावयाचे नाही असे अपिलार्थी यांनी सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या सातही प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रती पुरविण्यासाठी त्यांच्याकडे आज रोजी आवश्यक तो निधी उपलब्ध नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार त्यांच्या विभागाविषयीच्या माहितीची मागणी करत असतात. अपिलार्थीच्या मागणीस अनुसरुन त्यांना आवश्यक माहितीपोटीचे शुल्क कळविल्यानंतर त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता ते अनावश्यक पत्रव्यवहार करत राहतात व विनामूल्य माहितीची अपेक्षा करत असतात.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या सर्व प्रकरणांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक ते माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले आहे, मात्र हे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कारवाई केली नाही. अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अर्जदारास माहिती कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटी लागणा-या शुल्काचा संपूर्ण हिशोब उदा. संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर अर्जदारास कळविणे अनिवार्य आहे, तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कळविले गेलेले शुल्क कशाच्या आधारावर आहे हे त्यांनी अपिलार्थीस न कळवून त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देणे भाग आहे.

आयोगास पुढे असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त सातही अर्जासंदर्भात आवश्यक त्या माहितीचे शुल्क कळविल्यानंतर अपिलार्थीने बदलून त्यांनी मागितलेल्या मुद्दयांचा अंतर्भाव असणा-या कागदपत्रांचे निरीक्षण करुन शुल्क भरण्याची तयारी दर्शविली व तदनंतर मोफत माहितीची मागणी करुन आपली भूमिका बदलली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा अनुदान उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत करुन दिले आहे. या सर्व परिस्थितीत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागणा-या शुल्काचा तुटवडा व अपिलार्थीने सातही अर्जासंदर्भात वेळोवेळी बदललेली भूमिका, या सर्व बाबी लक्षात घेता अपिलार्थीने या सातही अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संबंधीत अभिलेख्याची तपासणी करणे व या अभिलेख्याच्या ज्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना आवश्यक वाटतात, त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेणे योग्य राहील असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,

त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या विचाराधीन अपिलातील प्रथम अर्जासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे अपिलार्थीस पाहण्यासाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत, तसेच अपिलार्थीने त्यातील मागितलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्याच विषयाशी संबंधीत अभिलेखे अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध राहतील, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य अधिनियमातील विहित मुदतीत पार पाडले असल्याने व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर नाकारले नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणत्याही कारवाईचे आदेश आयोग देत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीचे पालन केले असल्यामुळे व त्यांच्याविरुध्द शासनाकडे शिफारस करण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्याने अपिलार्थीची ही मागणी आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपरोक्त प्रकरणी त्यांना आलेला खर्च रुपये १०,००० इतक्या रकमेची संबंधीत प्राधिकरणाकडून नुकसानभरपाई त्यांना मिळावी अशी विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीच्या खर्चासंदर्भात अपिलार्थीने आवश्यक तो तपशील व पुरावा आयोगाकडे सादर केला नसल्याने अपिलार्थीची नुकसानभरपाईची मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८५२/०७, १८५३/०७, १८५४/०७, १८५५/०७, १८५६/०७, १८५७/०७ व १८५८/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागितलेल्या माहिती संदर्भातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस तपासणीसाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत. या अभिलेख्यामधील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या व त्यांच्या प्रथम अर्जातील विषयाशी संबंधीत असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच मुदतीत विनामूल्य पुरवाव्यात.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक १८७२, १८८०, १८८१ व १८८३**

निर्णय दिनांक २४-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,<br>मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,<br>नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी (प्रतिवादी) |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७२) | सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलुम संस्था, देगलूर नाका, जगजीवनराम रोड, नांदेड |
| २ | मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू हायस्कूल, लेबर कॉलनी, नांदेड (अपील क्रमांक १८८०) | सचिव, नोबल एज्युकेशन सोसायटी मार्फत नोबल ऊर्दू हायस्कूल, लेबर कॉलनी, नांदेड |
| ३ | मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड<br>(अपील क्रमांक १८८१) | सचिव, अल अखसा एज्युकेशन सोसायटी, मार्फत सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड |
| ४ | मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड<br>(अपील क्रमांक १८८३) | सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड |

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २४-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे प्रतिनिधी श्री. सौदागर महंमद वसीम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती साबिरा बेगम, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, श्री. सैय्यद अशफाक हुसेन, मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू हायस्कूल, नांदेड, श्री. अहमद मुखतार अहमद, मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड, श्री. हाशमी सय्यद ईमोदोद्दीन, मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. महंमद बहाओद्दीन म. अहमद, सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलूम संस्था, नांदेड, श्री. महंमद जावीद, सचिव, अल अखसा एज्युकेशन सोसायटी, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड, श्री. महंमद युसूफ कुरेशी, सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १२-०६-२००७ व २४-०७-२००७ रोजी दाखल केलेली व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आयोगाकडे केलेल्या या सर्व अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळविण्याकरिता सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत विषयावर माहिती मागितली असतांना कोणत्याही जन माहिती अधिका-याकडून त्यांना माहिती दिली गेली नाही तर, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने विचाराधीन असलेल्या अपील प्रकरणांपैकी ३ प्रकरणी दिनांक २०-०३-२००७ रोजी व एका प्रकरणी (सर सय्यद उर्दू प्राथमिक शाळा) दिनांक ०२-०४-२००७ रोजी एकाच कालावधी-तील व एकाच स्वरुपाच्या माहितीसाठी अर्ज केले होते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- शालेय पोषण आहाराचा तपशील, शिजविणा-या ठेकेदाराचे नाव, निविदा काढली असल्यास वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द केली असल्यास त्याची झेरॉक्स प्रत, तसेच ८ वी, ९ वी व १० या वर्गांची तुकडीनिहाय संख्या, विद्यार्थ्यांकडून जमा केलेले शैक्षणिक शुल्क, प्रवेश फी, बिल्डींग फंड याबाबत वसूल केलेल्या रकमेची तपशीलवार माहिती, शाळेकडून घेण्यात आलेल्या परिक्षा, घटक चाचण्या व प्रथम व व्दितीय सत्र परिक्षेबाबत जमा केलेल्या फीचा तपशील, ऑडिट रिपोर्ट व खर्चाबाबतचा तपशील -- या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीशी संबंधीत कालावधी जून २००५ ते मार्च २००७ असा आहे. अपिलार्थी यांच्या मते त्यांनी वरील सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे ही माहिती मागितली होती, तथापि या सर्व जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीचा अशा प्रकारचा माहितीसाठीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने या संस्थांच्या जन अपिलीय अधिका-याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दोन प्रथम अपिले (अपील क्रमांक १८७२ व १८८३) दिनांक ०७-०५-२००७ रोजी, एक प्रथम अपील (अपील क्रमांक १८८०) दिनांक १७-०५-२००७ रोजी व एक प्रथम अपील (अपील क्रमांक १८८१) दिनांक ११-०६-२००७ रोजी केले. अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधीत सर्व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील अर्ज पाठविले होते, तथापि संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिला, असे अपिलार्थीने आज रोजी आयोगास सांगितले व त्याचप्रमाणे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये तपशील दिला आहे. विचाराधीन ४ अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलुम संस्था, नांदेड यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रथम अपील करतांना ते शाळेच्या पत्त्यावर न करता त्यांच्या निवासस्थानाच्या पत्त्यावर पाठविले. अपिलार्थीचा अपील अर्ज ज्यावेळी त्यांच्या निवासस्थानी गेला त्यावेळी ते काही खाजगी कामानिमित्त बाहेरगांवी गेले असल्याने त्यांना अपिलार्थीचा अपील अर्ज मिळाला नाही तर उर्वरित तीनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले.

सारांश, सर्वसाधारणपणे या सर्व प्रकरणातील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे अपिलार्थीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज प्राप्त झाला नसल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होण्याच्या दृष्टीने या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर अपिलार्थीच्या या प्रथम अपिलांची सुनावणी होणे आयोगास अगत्याचे वाटते. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज करण्याच्या वेळेस संबंधीत संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी होते, तथापि शिक्षण संचालनालयाच्या दिनांक २६-११-२००७ च्या आदेशानुसार आता ही व्यवस्था बदलली असून, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या सर्व प्रथम अपील अर्जांवर आता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांनी सुनावणी घेऊन आदेश पारीत करण्यासाठी ते त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहेत व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील सर्व अपिलांची सुनावणी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन आपल्या स्तरावर करावी व या संदर्भातील आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीचे या आदेशाने समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेली ही चारही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८७२/०७, १८८०/०७, १८८१/०७ व १८८३/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या (अपील क्रमांक १८७२ व १८८३) दिनांक ०७-०५-२००७, (अपील क्रमांक १८८०) दिनांक १७-०५-२००७, व (अपील क्रमांक १८८१) दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, या अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्याध्यापक, नोबल ऊर्दू हायस्कूल, लेबर कॉलनी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इनाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलुम संस्था, देगलूर नाका, जगजीवनराम रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, नोबल एज्युकेशन सोसायटी मार्फत नोबल ऊर्दू हायस्कूल, लेबर कॉलनी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ सचिव, अल अखसा एज्युकेशन सोसायटी, मार्फत सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इनाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : दिनांक ०७-०५-२००७ चे दोन व दिनांक १७-०५-२००७ व ११-०६-२००७ चे प्रत्येकी एक प्रथम अपील अर्ज)

११ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक १८७३, १८७४, १८७५, १८७६, १८७७, १८७८, १८७९, १८८२, १८८४ व १८८५**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८७३, १८७४, १८७५, १८७६, १८७७, १८७८, १८७९, १८८२, १८८४ व १८८५

निर्णय दिनांक २४-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी (प्रतिवादी) |
|---|---|---|
| १ | मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७३) | सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलूम संस्था, देगलूर नाका, जगजीवनराम रोड, नांदेड |
| २ | मुख्याध्यापक, हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, देवीनगर, देविमंदिर समोर, देगलूर नाक्याजवळ, नांदेड (अपील क्रमांक १८७४) | सचिव, हबीबीया एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, मार्फत हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, मिल्लतनगर, नांदेड |
| ३ | मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड (अपील क्रमांक १८७५) | सचिव, अल अखलासा एज्युकेशन सोसायटी, मार्फत सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड |
| ४ | मुख्याध्यापक, विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७६) | सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हे बोरगांव संचालित, मार्फत विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड |
| ५ | मुख्याध्यापक, विद्या निकेतन मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर, बिलोली, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७७) | सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हे बोरगांव संचालित, विद्या निकेतन मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर, बिलोली, जिल्हा नांदेड |
| ६ | मुख्याध्यापक, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७८) | सचिव, ज्ञानदीप शिक्षण मंडळ, हदगांव संचालित, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड |
| ७ | मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री विद्यालय, मौजे कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८७९) | सचिव, श्री. गणेश शिक्षण संस्था, मार्फत लालबहादूर शास्त्री विद्यालय, कासराळी, मौजे कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड |
| ८ | मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण हायस्कूल, (इंदिरानगर), | सचिव, रंगराव पाटील प्रतिष्ठाण, जनाई वसंतनगर, मार्फत |

| | | |
|---|---|---|
| | बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १८८२) | यशवंतराव चव्हाण हायस्कूल, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड |
| ९ | मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड (अपील क्रमांक १८८४) | सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड |
| १० | मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड (अपील क्रमांक १८८५) | सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड |

**निर्णय**

वरील दहा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २४-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे प्रतिनिधी श्री. सौदागर महंमद वसीम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती साबिरा बेगम, मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, (अपील क्रमांक १८७३), श्री. महमद मुखतार अजगर, मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड (अपील क्रमांक १८७५), श्री. अशोक नागनाथराव दगडे, मुख्याध्यापक, विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, (इंदिरानगर), बिलोली, (अपील क्रमांक १८७६), श्री. रमेश सांडगे, मुख्याध्यापक, विद्या निकेतन मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बिलोली, (अपील क्रमांक १८७७), श्री. दिलीप नारायणराव कुलकर्णी, मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री विद्यालय, मौजे कासराळी, (अपील क्रमांक १८७९), हाशमी एस. ईमायोद्दीन, मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, नांदेड (अपील क्रमांक १८८४ व अपील क्रमांक १८८५) (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. म. बहाओद्दीन सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलूम संस्था, नांदेड, श्री. म. जावीद, सचिव, अल अखलासा एज्युकेशन सोसायटी, मार्फत सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड, श्री. सुनिल बाबाराव अेबडवार, सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हे बोरगांव संचालित, मार्फत विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, बिलोली (यापुढे त्यांना अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, नांदेड (अपील क्रमांक १८७४), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, (अपील क्रमांक १८७८), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण हायस्कूल, बिलोली (अपील क्रमांक १८८२), जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, मार्फत हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, नांदेड, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, ज्ञानदीप शिक्षण मंडळ, हदगांव संचालित, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, रंगराव पाटील प्रतिष्ठाण, जनाई वसंतनगर, मार्फत यशवंतराव चव्हाण हायस्कूल, बिलोली, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. गणेश शिक्षण संस्था, मार्फत लालबहादूर शास्त्री विद्यालय, कासराळी, मौजे कासराळी, तालुका बिलोली व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १२-०६-२००७ व दिनांक २४-०७-२००७ रोजी केलेली व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या सर्व व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सर्वसाधारणतः असे म्हटले आहे की, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे या प्रकरणी अपील अर्ज स्वीकारले नाहीत व पोस्टाने पाठविलेले अपील अर्ज परत पाठविले तर काही जणांनी आजपर्यंत अपील अर्ज घेण्यास नकार दिला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधीत शाळा स्थापनेपासून ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः अर्ज करेपर्यंतच्या कालावधीतील माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- आपल्या हायस्कूलमध्ये कार्यरत असलेले एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नावांची यादी,

त्यांचा नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता, जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत, त्यांच्या कायम नियुक्ती करण्याच्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत, मुलाखतीकरिता आलेल्या उमेदवारांच्या नावांची यादी, मुलाखत घेणा-या संचालक मंडळाच्या शे-यांची सत्यप्रत, त्यांच्या नेमणूकीस शिक्षण मंडळ नांदेड यांच्याकडून मिळालेल्या मान्यतेची प्रत व कायम नियुक्तीसाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत व इतर माहिती -- या मुद्दयांचा समावेश होता.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सर्व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे सांगितले तर अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने सर्व संबंधितांना त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहितीसाठीचे प्रथम अर्ज व अपील अर्ज पाठविल्याचे आयोगास सांगितले व त्यांच्या या विधानाच्या पृष्ठ्यर्थ त्यांनी सर्व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविलेली पावती आयोगास दाखविली. अपिलार्थीने ज्यावेळी उपरोक्त सर्व जन अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपिले केली त्यावेळी जन अपिलीय अधिकारी म्हणून संबंधीत संस्थेच्या सचिवांची नेमणूक शिक्षण संचालकांनी केली होती, तथापि आता शिक्षण संचालकांनी संबंधीत जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या परिपत्रकाव्दारे केली असल्याने या टप्प्यावर संबंधीत शिक्षणाधिका-यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलांची सुनावणी घेणे गरजेचे वाटते. त्यांना या आदेशासोबत अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत पाठविण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या प्रथम अर्जाची अतिरिक्त झेराक्स प्रत सर्व उपस्थितांना देण्याचे मान्य केले आहे. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही व जन अपिलीय अधिकारी म्हणून आता शिक्षण संचालकांनी वेगळया अधिका-याची नेमणूक केली असल्याने या टप्प्यावर आयोगास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलांची सुनावणी होणे गरजेचे वाटते. सबब संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांची सुनावणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत घेऊन आपले निर्णय पारित करावेत. अपिलार्थीस हे आदेश मान्य नसल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेली दहा व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८७३/०७, १८७४/०७, १८७५/०७, १८७६/०७, १८७७/०७, १८७८/०७, १८७९/०७, १८८२/०७, १८८४/०७ व १८८५/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००७ व दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या प्रत्येकी दोन, ०७-०५-२००७ रोजीच्या तीन, ०५-०५-२००७, १९-०५-२००७ व ११-०६-२००७ रोजीच्या प्रत्येकी एक अशा एकूण दहा प्रथम अपील अर्जांवर झ ाालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातूल उलुम हायस्कूल, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, देवीनगर, देविमंदिर समोर, देगलूर नाक्याजवळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विद्या निकेतन मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री विद्यालय, मौजे कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण हायस्कूल, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी, मदरसे, मदिनातूल ऊलूम संस्था, देगलूर नाका, जगजीवनराम रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, मार्फत हजरत ऊर्दू उमर फारुख ऊर्दू हायस्कूल, मिल्लतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अल अखलासा एज्युकेशन सोसायटी, मार्फत सर सय्यद ऊर्दू प्राथमिक शाळा, दिवाणी बावळी, करबला रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हे बोरगांव संचालित, मार्फत विद्या निकेतन प्राथमिक विद्यालय, (इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, चेतना शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हे बोरगांव संचालित, विद्या निकेतन मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, ज्ञानदीप शिक्षण मंडळ, हदगांव संचालित, विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१७ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. गणेश शिक्षण संस्था, मार्फत लालबहादूर शास्त्री विद्यालय, कासराळी, मौजे कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१८ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, रंगराव पाटील प्रतिष्ठाण, जनाई वसंतनगर, मार्फत यशवंतराव चव्हाण हायस्कूल,

(इंदिरानगर), बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१९ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कुरेशिया एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, बारा इमाम मस्जीदजवळ, मनियार गल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२० शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : आदेशातील अनु. क्र. २ येथे नमूद दिनांकांच्या एकूण दहा प्रथम अपील अर्जांच्या प्रती)

२१ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८७१
निर्णय दिनांक   २६-११-२००८

1 श्री. नरेंद्र बारकू चौधरी, रा.धुळे. : अपिलार्थी

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, शहादा, जि.नंदूरबार : प्रतिवादी

2 जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती,शहादा, जि.नंदूरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः शाखा अभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन उपविभाग, शहादा, जि.नंदूरबार

जन अपिलीय अधिकारीः उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन उपविभाग, शहादा, जि.नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नागेश चौधरी,अपिलार्थी नरेंद्र बारकू चौधरी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री.संजय लक्ष्मण पवार, जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन उपविभाग, शहादा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विनायक रमाकांत पाठक, जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता,जिल्हा परिषद,

लघुसिंचन उपविभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)ँ हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०२.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नसताना, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्याबद्दल कोणताही दंड केला नाही, त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन, त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नाहीत व जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले आहे.या अर्जामध्ये अंतिमतः त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विकास कामांचे, दि. १.४.२००५ ते १.९.२००६ या कालावधीशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.६.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.११.२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे दिसून येते. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे, हे कळण्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कोणताही मार्ग नाही. मात्र या संदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १५.११.२००६ रोजीच्या पत्रावरुन, अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांचेवर विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- दंड लावावा व त्या दंडाची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात करावी, अशी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे, तथापि ती विलंबाने त्यांना प्राप्त झाली आहे, असा आयोगासमोर युक्तिवाद केला, त्यांच्या या युक्तिवादापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास अपिलार्थीकडून त्यांना दि. ७.७.२००७ रोजीचे प्राप्त झालेले पत्र सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ७.७.२००७ रोजी माहिती मिळाल्याची पोच दिली आहे, या पत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ७.७.२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने दि. ११.९.२००६ रोजी माहितीची मागणी केली असता, सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.१०.२००६ रोजी अगर तत्पूर्वी देय ठरत होती. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.७.२००७ रोजी विलंबाने माहिती पुरविली आहे, हे अशाप्रकारे सिध्द होत आहे. या विलंबास उपलब्ध कागदपत्रांवरुन कोणतेही समर्थन असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंबाने प्रतिसाद देऊन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार, यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र बारकू चौधरी, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन उपविभाग, शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुसिंचन उपविभाग, शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले क्रमांक १८६६/२००७, १८६७/२००७ व १८६८/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८६६,१८६७ व १८६८

निर्णय दिनांक २६-११-२००८

१ श्री. अरुण रामदास पाटील, : अपिलार्थी
रा.धुळे.

**विरुध्द**

१ (अपील क्रमांक १८६६)

| | | | |
|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जि.प.बांधकाम साक्री उपविभाग, जि.धुळे | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.धुळे | : | **प्रतिवादी** |

२ (अपील क्रमांक १८६७)

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जि.प. बांधकाम तळोदा उपविभाग,जि.नंदूरबार | जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जि.प.बांधकाम तळोदा उपविभाग, जि.नंदूरबार |

3 (अपील क्रमांक १८६८)

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जि.प. बांधकाम अक्कलकुवा उपविभाग, जि.नंदूरबार | जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता जि.प. बांधकाम अक्कलकुवा उपविभाग, , जि.नंदूरबार |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अरुण रामदास पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. उदयसिंग दोधूसिंग राजपूत, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,

जि.प.बांधकाम साक्री उपविभाग जि.धुळे, श्री. गजानन नगीनदास सराफ,जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,जि.प.बांधकाम तळोदा उपविभाग,जि.नंदूरबार व श्री. दिलीप आत्माराम गवळे जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जि.प. बांधकाम अक्कलकुवा उपविभाग,जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच श्री. सुधाकर शांताराम सांगळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.धुळे, श्री. महेंद्र भाईदास पवार, प्र.जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता,जि.प.बांधकाम तळोदा उपविभाग, जि.नंदूरबार, श्री.शांताराम राजाराम कापडी,प्र.जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता,जि.प.बांधकाम अक्कलकुवा उपविभाग, जि.प.नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त तीनही प्रकरणात अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये अनुक्रमे दि. २३.३.२००७, दि. १८.०४.२००७ व दि. १८.४.२००७ रोजी दाखल केलेली द्वितीय अपिले आज आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास दि. २६.११.२००६ रोजीच्या तीन स्वतंत्र पत्रान्वये या तीनही प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने,त्यांना ही सर्व अपिले चालवावयाची नसून, ही तीनही विचाराधीन अपिले रद्द करण्याची आयोगास स्वेच्छेने विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने उपरोक्त तीनही अपिले रद्द करण्याची केलेली सदर विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. १८६६/२००७ खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्र. १८६७/२००७ खारीज करण्यात येत आहे.

३) अपील क्र. १८६८/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण रामदास पाटील,३-ब, विजय पोलीस कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर,धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जि.प.बांधकाम साक्री उपविभाग, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जि.प. बांधकाम तळोदा उपविभाग,जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जि.प.बांधकाम तळोदा उपविभाग, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

६. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता जि.प. बांधकाम अक्कलकुवा उपविभाग, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

७. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता जि.प. बांधकाम अक्कलकुवा उपविभाग, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

८. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८६४
निर्णय दिनांक २६-११-२००८

1 श्री. नरेंद्र भास्कर पाटील, : अपिलार्थी
रा.जळगाव

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल,
जि.जळगाव

2 जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल,
जि.जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः कार्यालय अधीक्षक,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल,
जि.जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नरेंद्र भास्कर पाटील यांच्या वकील श्रीमती अभया राम शेलकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) श्री. राजाबापू शिवाजीराव भोईटे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. बाळासाहेब भास्करराव देशमुख, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल,जि.जळगाव (यापुढे

त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे वकील श्री. विनय डी.अंजनमतीकर यांच्यासह हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०९.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव या संस्थेच्या जळगाव व यावल या महाविद्यालयाशी संबंधित सन १९९०-९१ ते २००५-०६ या कालावधीतील काही माहिती मागविली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. २०.०७.२००६ रोजी प्रथम अपील केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जात असे नमूद केले आहे की, त्यांनी प्रथम अपील केले असता, या अपिलावर यावल महाविद्यालयाने त्यांच्या दि. ७.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर पाठविले. सदरच्या पत्रावर अपिलीय अधिकारी म्हणून पत्र न पाठविता माहिती अधिकारी म्हणून अज्ञात व्यक्तीने सही केली असून त्यावर या व्यक्तीचे नाव,हुद्दा याबाबतचा उल्लेख नाही. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले असून माहिती नाकारण्याची कारणे महाविद्यालयाने अशी दिली आहेत की, महाविद्यालयाच्या आर्थिक बाबीसंबंधी मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ३२७४/२००१ प्रलंबित आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या याचिकेमध्ये ते वादी अथवा प्रतिवादी नसल्याने व ते व संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य हे दोघेही वादी अथवा प्रतिवादी नसल्याने, जन अपिलीय अधिकारी

यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. अपिलार्थीचे म्हणण्याप्रमाणे या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ७.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीशी पत्रव्यवहार केला असून त्यामध्ये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरवता येणार नसल्याचे म्हटले आहे. सदर निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांची सही नसून, हे पत्र महाविद्यालयाच्या माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस पाठविण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी सुनावणी घेतली नसल्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे या टप्प्यावर आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,यावल जि.जळगाव यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २०.७.२००६ रोजी दाखल केलेल्या अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय घ्यावा. सदर सुनावणीचे सूचनापत्र अपिलार्थीस किमान सात दिवस अगोदर मिळेल, याची जन अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या दि. २०.७.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय घ्यावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र भास्कर पाटील, ७१,दिक्षीतवाडी,जिल्हापेठ,जळगाव -४२५ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८६५
निर्णय दिनांक २६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| 1 श्री. निंबा नंदा पाटील,<br>रा.सुद्रेपाडा जि.धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| 1 जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय वन अधिकारी (नियोजन),<br>धुळे. | : | प्रतिवादी |
| 2 जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य वन संरक्षक (प्रा)<br>धुळे | | |

त्रयस्थ पक्षः श्री. आबा भिला न्याहाळदे

श्री. राजेंद्र पिरन न्याहाळदे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. संभा खंडू गवळी, जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), धुळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. हिंमत नामदेवराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. अनुरोधकुमार निगम, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रा) धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. आबा भिला न्याहाळदे व राजेंद्र पिरन न्याहाळदे हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. निंबा नंदा पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०६.२००६ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. १७.०५.२००६ रोजी प्रथम अपील केले असता संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना वक्तशीर माहिती पुरविण्यासंदर्भात कोणताही आदेश दिला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतरही अपूर्ण माहिती प्राप्त झाली . "सदर माहिती सार्वजनिक स्वरुपाची होती, म्हणून शासकीय माहिती अधिकारी यांनी जी माहिती पुरविणे शक्य होते, ती माहिती पुरविली आहे", असे म्हणून जन अपिलीय अधिकारी दिशाभूल करत आहेत. या शासकीय प्राधिकरणाने अवाजवी शुल्क वसूल करण्याच्या कृतीचे जन अपिलीय अधिकारी यांनी समर्थन केले व माहिती अधिकारी यांना जाणीवपूर्वक पाठीशी घातले. त्यांनी ३० दिवस उशिरा माहिती पुरविल्याचे सिध्द होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाहीची तजवीज करण्यास नकार दिला. केवळ या कारणास्तव त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या अर्जामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अशी विनंती केली आहे की, त्यांचे अपील मंजूर करुन संबंधितांवर, योग्य ती कार्यवाही करावी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांना गैरवाजवीरित्या संरक्षण दिल्याच्या बाबीची गंभीर दखल घेऊन उचित कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ७.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने दि. २३.३.२००६ रोजी जीप/ट्रक चालक या पदासाठी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात - भटक्या जमाती (क) प्रवर्ग परिक्षार्थींची नावे, पत्ता व आवश्यक गुण तसेच श्री. आबा भिला न्याहाळदे व श्री. राजेंद्र पिरन न्याहाळदे या त्रयस्थ पक्षाची परीक्षेसाठी प्राप्त झालेली निवेदने व त्यासोबत त्रयस्थ पक्षांनी जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती यांची मागणी नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५२/- इतक्या रकमेचे चलन या पत्रासोबत पाठविले व अपिलार्थीस सदर रक्कम त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित करुन, चलन प्राप्त झाल्यानंतर माहिती देण्याचे आश्वासित केले. तद्नंतर अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारामध्ये दि. १०.५.२००६ रोजी केला. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली. अपिलार्थीने एकूण दोन मुद्याद्वारे माहिती विचारली असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी फक्त एकाच मुद्याशी संबंधित माहिती देऊन दुसऱ्या मुद्यासंदर्भात त्यांनी मागणी केलेले अभिलेखे तपासणीसाठी त्यांच्या कार्यालयात दि. १७.५.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले. या तपासणीसाठी अपिलार्थीकडून शुल्क आकारण्यात येईल, असेही त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्रात म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १७.५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय

अधिकारी यांनी दि. ७.६.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ७.६.२००६ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले असून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही ठोस निर्णय दिल्याचे आयोगास दिसून येत नाही. मात्र या अपील निर्णयाबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भाने त्यांनी माहिती पुरविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे दि. २२.११.२००८ रोजीचे लेखी निवेदन आयोगास प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांना जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असली तरी ती त्यांना ३० दिवस उशिराने प्राप्त झाल्याचे नमूद करुन, त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तसेच त्यांना प्रथम व द्वितीय अपील करण्याकामी अंदाजे रु.२५०/- इतका खर्च झाल्याने या खर्चाची भरपाई करण्यास त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ७.४.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.४.२००६ म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जरी प्रतिसाद दिला असला तरी या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे माहिती पुरविण्यापोटीच्या शुल्काचा जो हिशोब (माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर) अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते, तो अपिलार्थीस कळविला नाही. अपिलार्थी यांच्याकडून दि. १०.५.२००६ रोजी शुल्काचा भरणा झाल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस एका मुद्याशी संबंधित माहिती दि.११.५.२००६ रोजी व उर्वरित दुसऱ्या मुद्याशी संबंधित माहिती दि. ७.६.२००६ रोजी दिली. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून

शुल्क प्राप्त होऊनही प्रथमतः अर्धवट माहिती दिली व नंतर २० दिवसांच्या विलंबाने त्यांना उर्वरित मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती दिली.

आज रोजी सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कदापिही नाकारले नाही. त्यांच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले. अपिलार्थीने लेखी स्वरुपात माहिती मागितली असता ती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित केले, असे सांगितले. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली म्हणून ही माहिती मागणी केलेल्या स्वरुपात पुरविण्याऐवजी दुसऱ्या स्वरुपात ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे, त्या स्वरुपात ती त्यांना पुरविणे कलम ७ च्या तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार अभिप्रेत असलेला कोणताही पत्रव्यवहार त्रयस्थपक्षाशी केल्याचे आढळून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे, असे वाटले असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अर्धवट माहिती व त्यानंतर उर्वरित माहिती विलंबाने पुरवून अधिनियमातील कलम ७ चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या चुकीच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. उपरोक्त प्रकरणी जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.४.२००६ रोजी पाठविलेले पत्र अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीशी सुसंगत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अर्धवट व तदनंतर विलंबाने माहिती पुरविली आहे. हे पाहता अपिलार्थीस प्रत्यक्षतः ही माहिती विनामूल्य देय ठरते, मात्र ही माहिती घेण्यापोटी रु.५२/- इतके शुल्क दि. १०.५.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु. ५२/- हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीने त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये या प्रकरणी त्यांना झालेल्या रु.२५०/- इतक्या खर्चाची नुकसानभरपाई मिळण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या रकमेचा तपशील अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर न केल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

त्रयस्थ पक्षास त्यांच्याविषयीची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबत,आयोगाने विचारले असता, त्यांची यासंदर्भात काहीही हरकत नसल्याचे त्रयस्थ पक्षाने आयोगास आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे, असे आयोगास वाटत नाही, मात्र वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द झाले आहे.अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती देऊन नंतर दुसऱ्या मुद्दयावरील माहिती २० दिवस इतक्या असमर्थनीय विलंबाने पुरवून जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या एकूण २० दिवसांच्या विलंबाकरिता त्यांना माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२० दिवसांसाठी) एकूण रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात जमा करावी.

लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, याची जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय,धुळे यांनी खात्री करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ ह्व दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी यांना रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३) जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय,धुळे यांनी

उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे अनुपालन होईल,असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निंबा नंदा पाटील, मु.सुद्रेपाडा, पो. मेहेरगाव ता.जि.धुळे

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), धुळे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),धुळे यांचे कार्यालय जमनागिरी रोड, एसआरपीएफ कँपजवळ,धुळे-४२४ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),धुळे जमनागिरी रोड, एसआरपीएफ कँपजवळ,धुळे-४२४ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८६९
निर्णय दिनांक २६-११-२००८

1 श्री. नरेंद्र बारकू चौधरी, : अपिलार्थी
रा.धुळे.

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शहादा कार्यालय,
जि.नंदूरबार

2 जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शहादा,जि.नंदूरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शहादा कार्यालय,
जि.नंदूरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नागेश चौधरी, अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकु चौधरी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा

जि.नंदूरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०१.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, अधिनियमातील तरतुदी प्रमाणे माहितीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे दंड न करता त्यांना आपल्या पाठीशी घालण्याचे प्रयत्न केले आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयांशी संबंधित असल्याने त्यांनी ती अपिलार्थीस जाणीवपूर्वक दिलेली नाही, असे नमूद करुन, त्यांनी आपल्या  मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.४.२००५ ते १५.८.२००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शहादा,मोलगी,धडगाव क्र.१ व धडगाव क्र.२ आदी कार्यालयाशी संबंधित अपिले दाखल झ ााली आहेत काय, असल्यास त्याचा सविस्तर तपशील, अपिलार्थीचा अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय जन माहिती

अधिकारी दोषी आढळले आहेत काय, असल्यास त्यांच्यावर शास्ती लावण्यात आली किंवा कसे, संबंधितांनी दंड भरल्यास, दंड भरलेल्या पावत्याची झेरॉक्स प्रत, वरील उपविभागातील अधिकारी एक किंवा एकपेक्षा अधिक प्रकरणात दोषी आढळले आहेत काय,असल्यास, त्यांच्यावर खातेनिहाय चौकशीची केलेली शिफारस इ.चा तपशील- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि.१.९.२००६ (प्रत्यक्ष दि.१/९/२००५ असे टंकलिखित) रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्यासाठी १५ दिवसांच्या मुदतवाढीची मागणी अपिलार्थीस केली. परंतु पाठोपाठ त्यांच्याकडील दि. २.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस वेगळया तऱ्हेने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "त्यांना आवश्यक असलेली माहिती कोणत्या प्रयोजनार्थ व कोणत्या हेतूने केलेली आहे, हे नमूद केल्यानंतर त्यांच्या मूळ अर्जाचा विचार करण्यात येईल", असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.११.२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी प्रस्तावित केल्याचे दिसून येते, तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे हे या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याने कळू शकत नाही. अपिलार्थी यांच्या मते अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय घेतला नाही. या प्रथम अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांना जास्तीत जास्त दंड करावा, अशी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे त्यांच्या दि. २८.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपील अर्जांची संख्या, त्यावर घेतलेले निर्णय याच्या प्रती अपिलार्थीस पुरविणे या प्रकरणी अपेक्षित होते, परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा विचाराधीन प्रथम अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. याउलट अपिलार्थीस ही माहिती मागण्यामागे कोणता हेतू आहे, हे त्यांच्या दि. २.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे विचारले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अधिनियमातील कलम ६(२) प्रमाणे माहिती मिळण्यासाठी विनंती करणाऱ्या अर्जदारास, माहितीसाठीचा अर्ज करण्याची कोणतीही कारणे देण्याची किंवा त्यांच्याशी संपर्क साधण्याची आवश्यकता असेल, त्या खेरीज अन्य कोणताही तपशील देण्यास भाग पाडणे अपेक्षित नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दिलेले दि. २.९.२००६ रोजीचे पत्र सर्वथा चुकीचे व गैर ठरत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५ मुद्यांवर माहिती मागितली असून यातील मुद्दा क्र ४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यांद्वारे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली असून त्यांनी मुद्दा क्र. ४ व ५ द्वारे विचारलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या मुद्दा क्र. ३ मध्येच समाविष्ट असणे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रश्नांना उत्तर अपेक्षित केलेले आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. तसेच येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना माहिती

अधिकाऱ्यास शास्ती लावण्याची अथवा त्यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याची तरतुद या अधिनियमामध्ये नाही. हे पाहता व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील फक्त मुद्दा क्र. १ ते ३ शी संबंधित माहिती ही, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरते. अपिलार्थीस माहिती देण्याची विहित मुदत आता व्यपगत झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास नकारात्मक प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ६(२) च्या तरतुदीकडे पूर्णतया दुर्लक्ष करुन, कारणे विचारण्याच्या कृतीचे समर्थन करण्यासाठी आज जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंबहुना अधिनियमामध्ये कारणे न विचारण्याची स्पष्ट तरतुद असताना त्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारची कारणे विचारण्याची त्यांची कृती ही सर्वथा गैर ठरत आहे. अशाप्रकारच्या कृतीमुळे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे..

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ते ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ते ३ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक, यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र बारकू चौधरी, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक,बांधकाम भवन, त्र्यंबक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८७०
निर्णय दिनांक २६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| 1 श्री. नरेंद्र बारकू चौधरी,<br>रा.धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| 1 जन माहिती अधिकारी<br>उप अभियंता (इ व द),<br>जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग पेठ,<br>जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| 2 जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१,<br>नाशिक. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नागेश चौधरी, अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रविंद्र रामदास चिरमाडे, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (इ व द) जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पेठ जि. नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सतीश उखाजी साळुंके, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद विभाग क्र. १ नाशिक जि. नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०१.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय

अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही, अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्याबद्दल कोणताही दंड न करता त्यांच्या अपिलावर निर्णय देखिल घेतला नाही व जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले. या अपील अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.४.२००५ ते १.८.२००६ या कालावधीची रस्ते विकास कामाशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामाची सद्यस्थिती, देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, ठेकेदाराचे/ एजन्सीचे नाव, कामाच्या सर्वसाधारण वर्णनाची प्रत, कामाचे बील अदा केले असल्यास धनादेशाचा क्रमांक व रक्कम- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि.२४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- इतके भरण्याचे सूचित केले.अपिलार्थीस हे पत्र दि. ४.९.२००६ रोजी प्राप्त झ ाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दि. ३०.१०.२००६ व नंतर दि. २७.११.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीसाठी गैरहजर राहण्याचे कारण त्यांना सांगता आले नाही.

आयोगासमोर उपलब्ध कागदपत्रावरुन व दोन्ही बाजूंनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपात होती. अपिलार्थीच्या दि. ११.८.२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या दि. २४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. तथापि हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याच्या पुराव्याप्रित्यर्थ त्यांनी आज रोजी आयोगासमोर, आयोगाने पूर्वसूचना देऊनही त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही सादर केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून प्राप्त झालेल्या पत्रास 'प्राप्ती-स्वीकृती' म्हणून सादर केलेल्या पावतीवर पत्राचा क्रमांक ५१२ असा लिहिलेला आहे, तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.८.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राचा क्र. ५२७ असा आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना पुरविण्यापोटी आवश्यक असलेल्या (प्रस्तावित पृष्ठसंख्या,माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ दर) रकमेचा तपशील, जो माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३) (क) प्रमाणे त्यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक आहे, तो दिलेला नाही. त्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस दि. २४.८.२००६ रोजी दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे व अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस दि. २४.८.२००६ रोजीचे कथित पत्र खरोखरीच पाठविले आहे किंवा कसे, याबाबतचे जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते अभिलेखे आयोगासमोर सादर न केल्याने त्यांनी अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे, पुराव्याअभावी सिध्द होत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कार्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक, यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे

यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-११-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नरेंद्र बारकू चौधरी, बाफना मार्केट, तळमजला, राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (इ व द) जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पेठ जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद विभाग क्र. १ नाशिक जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक,बांधकाम भवन, त्र्यंबक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८८६

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चोपडा,
जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, जिल्हा
जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र हिसास पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चोपडा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संजय दत्तात्रय सोनवणे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १०-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार रस्ते विकास कामाची माहिती मागितली असता त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०,४७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि या रकमेचा तपशील त्यांनी, मागितला असता तो दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपल दाखल केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली, तथापि ती माहिती अपूर्ण स्वरुपाची असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यांनी पुन्हा आदेश देऊन ८ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्दितीय अपील करेपावेतो उर्वरित माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे

विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामाची एकूण ८ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -- कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नांव -- या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद दिनांक १५-०५-२००७ रोजी देऊन रुपये १०,४७५ इतक्या रकमेचा भरणा त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करण्याचे सुचविले. तदनंतर दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या माहितीकरिता रुपये ३० इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००७ रोजी घेऊन जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी माहितीपोटी मागणी केलेल्या रक्कम रुपये १०,४७५ चा तपशील अपिलार्थीस देण्याचे सूचित केले व अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ७ मधील माहिती ८ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना २ टप्प्यात देण्यात आली असून, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक २३-०७-२००७ रोजी व तदनंतर दिनांक २४-०८-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली. अपिलार्थीस माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाची पोच पावती आयोगास दाखविली, तथापि अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या पत्राव्दारे ही माहिती पाठविली हे जन माहिती अधिकारी आयोगासमोर स्पष्ट करु शकले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली किंवा कसे हे कळण्यास अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे कोणताही मार्ग नाही हे पाहता, अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्याचे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चोपडा, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८८७

निर्णय दिनांक २७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे,<br>दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,<br>तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,<br>धुळे | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक १, धडगाव, जिल्हा नंदुरबार | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा<br>नंदुरबार | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. दिलीप यशवंत पाटील, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक १, धडगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, तदनंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००७ रोजी दाखल केले असता त्यावर दिनांक १२-०७-२००७ रोजी सुनावणी झाली. या सुनावणीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०७-२००७ पर्यंत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना व्दितीय अपील करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती या अर्जाच्या अखेरीस अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -- कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नांव -- या मुद्दयांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक ०८-०८-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक २०३ अन्वये पाठविल्याचे आयोगास सांगत आहेत. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही व अपिलार्थीस दिलेली कथित माहिती त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी

आयोगाकडे सादर केलेल्या आवश्यक त्या पुराव्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०८-०८-२००७ रोजी पुरविल्याचे सिध्द होत आहे, मात्र दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागविली असता अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये दिली नसल्याचे देखिल येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद दिला नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २७-०७-२००७ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांनी या मुदतीत अपिलार्थीस माहिती पुरविली नाही हे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक १, धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८८८

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहादा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा
नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शिवाजी हरी पाटील, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहादा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात दिलेल्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे माहिती दिली, परंतु ही माहिती अपूर्ण असल्याचे आढळल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले. तथापि उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -- कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नांव -- या मुद्दयांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस २ टप्प्यात माहिती दिली असून त्यांनी प्रथमतः दिनांक ३१-०७-२००७ रोजी (जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश झाल्यानंतर) व दिनांक १८-०८-२००७ रोजी उर्वरित माहिती पुरविली आहे, तथापि जन माहिती अधिकारी त्यांच्या या युक्तिवादाप्रीत्यर्थ ते कोणताही पुरावा आज आयोगासमोर सादर करु शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे अनुमान काढून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अर्ज करतेवेळी जे उप अभियंता जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले होते व ज्यांच्याकडून माहिती देण्यास विलंब झाला आहे, ते आता मयत झाले असल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ०७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८८९

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक २, धडगाव, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा
नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. गंजीधर भिका पवार, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक २, धडगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रस्ते विकास कामांची त्यांनी, त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिली नाही, तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाच्या संदर्भात दिनांक १२-०७-२००७ रोजी घेतलेल्या सुनावणीसंदर्भात दिनांक १३-०७-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही असे नमूद केले असून, जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियमांर्तगत वेळेत माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -- कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नांव -- या मुद्दयांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००७ रोजी पुरविली आहे. आयोगाने पूर्वसूचना देऊनही जन माहिती अधिकारी हे यासंदर्भात कोणताही पुरावा आज सुनावणीच्या वेळी सादर करु शकले नाहीत, तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे या त्यांच्या विधानाचे खंडन करण्यास अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे योग्य त्या पुराव्याअभावी जन माहिती अधिकारी, यांचा त्यांनी अपिलार्थीस माहिती पाठविली हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस पुरविली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती पाठविली हे म्हणणे आयोग मान्य करीत नाही. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने देखील अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ७ चा निःसंशयपणे भंग केल्याचे दिसून येते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक २, धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९०

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा
नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. प्रमोद विश्वनाथ मोराणकर, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागितलेल्या रस्ते विकास कामांविषयी कोणतीही माहिती दिली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०७-२००७ रोजी आदेश देऊनही त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपर्यंत माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दिनांक १४-०८-२००७ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने दिनांक १४-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाल्याचे व या माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे कळविले आहे. सदर पत्र साक्षांकीत केलेले आहे. यावरुन या प्रकरणाशी संबंधीत पूर्ण माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे सिध्द होत आहे, तथापि अपिलार्थीने दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-०८-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीपेक्षाही विलंबाने प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे, त्यामुळे

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी,
जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९१

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, तळोदा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, जिल्हा
नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. तुकाराम ज्योतिराम पाटील, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, तळोदा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. चव्हाण अनीलकुमार भाईदास, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ३०-०७-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जानुसार रस्ते विकास कामाची माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यावर दिनांक ०२-०७-२००७ रोजी सुनावणी झाली, तथापि सुनावणीस जन माहिती अधिकारी हे गैरहजर राहिले, मात्र या सुनावणीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १२-०७-२००७ रोजीचे आदेश पारित केले व त्यामध्ये तळोदा सार्वजनिक बांधकाम उपविभागात कोणतेही काम झाले नाही असे स्पष्ट केले, तथापि तदनंतर लगेचच त्यांनी दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या उपविभागातील कामांची काही माहिती दिली (अपिलार्थीस सदर माहिती दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्राप्त झाली आहे). जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रातील तळोदा उपविभागात कामे झाली नसल्याच्या जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विधानास अपिलार्थीची हरकत असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद करुन त्यांच्या मूळ अर्जासंबंधीत माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कसूर केल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम,प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी यांचे नाव. - या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-०६-२००७ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आपल्या कार्यालयाकडील जावक नोंदवही व अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टने पाठविलेल्या पत्राची कॉपी दाखविली, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी उपस्थित नाहीत, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपूर्ण असल्याचे दिसून येते, कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहितीचा त्यामध्ये समावेश नाही, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे, जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियामप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, तळोदा, जिल्हा नंदुरबार यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९२

निर्णय दिनांक २७-११-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे,<br>दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,<br>तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,<br>धुळे | | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार, जिल्हा<br>नंदुरबार | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार, जिल्हा<br>नंदुरबार | | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक अभियंता, श्रेणी -२, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. हेमंत दगाजी चव्हाण, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-२, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शिरसाठ पंडीत रोहीदास, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २९-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २३-०४-२००७ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत देखील कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर

रक्कम,प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी यांचे नाव. - या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके चलनाने बँकेत भरण्याचे सूचित केले व चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर केल्यानंतर अपिलार्थीस माहिती पाठविण्याचे आश्वासित केले, परंतु अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा बँकेत अशा प्रकारे भरणा न करता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात मनीऑर्डरने सदर शुल्क पाठविले, तथापि जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाने बँकेत कोणतेही खाते नसल्याने त्यांनी सदर मनीऑर्डर स्वीकारण्यास नकार दिला. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, मात्र अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या पत्रामध्ये माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क बँकेत चलनाने भरण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविली आहे. त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ पोस्टाचा दिनांक २२-१०-२००७ या दिनांकाचा शिक्का व ४६६९ या क्रमांकाची पावती आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे, तथापि ही माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे दिसून येते. या टप्प्यावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे शुल्काचा भरणा बँकेत केला नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने शुल्काचा भरणा कोणत्या बँकेत, कोणत्या लेखाशिर्षाखाली करावयाचा तसेच शुल्काचा अधिनियमातील कलम ७(३) (क) प्रमाणे आवश्यक असलेला तपशील अपिलार्थीस कळविला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३०-०४-२००७ चे पत्र अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्राप्त होण्याची वाट पाहत होते व नंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी ही माहिती अपिलार्थीस दिली. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते मार्गदर्शन मिळाले नसल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे, त्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन विभाग), नंदुरबार यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन विभाग), नंदुरबार यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी -२, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, पंचायत समिती, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन विभाग), नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९३

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, — अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती,
साक्री, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजपूत उदयसिंग देधूसिंग, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, साक्री (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुप्पाकर शाताराम सांगळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २७-११-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील अर्ज रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. खुद्द अपिलार्थीनेच आता त्यांचे अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे

अपील क्रमांक १८९३/२००७ दिनांक ०७-०९-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८९३ /२००७, दिनांक ०७-०९-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, साक्री, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९४

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, — अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, भडगांव, जिल्हा जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजन कृष्णा नाईक, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, भडगांव, जिल्हा जळगांव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. राजश्री दत्तात्रय घाणे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली असता ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २६-०५-२००७ पर्यत देणे त्यांच्यावर बंधनकारक असतांना त्यांनी ती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी देखील या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०८-२००७ रोजी माहिती पाठविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुमारे १२६ दिवस इतक्या उशिरा माहिती पुरविल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास या अर्जाच्या अखेरीस विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २५.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर

रक्कम,प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी यांचे नाव. - या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात मागणी केलेली माहिती त्यांना प्रथमतः दिनांक १७-०७-२००७ रोजी व तदनंतर दिनांक २९-०८-२००७ रोजी दिली आहे. त्यांच्या या विधानाच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०७-२००७ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने माहिती पाठविलेल्याबाबतचा पुरावा आयोगासमोर सादर केला. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार त्यांनी परत अपिलार्थीस दिनांक २९-०८-२००७ रोजी तीच माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे, मात्र ही माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस जरी प्रथमतः दिनांक १७-०७-२००७ रोजी माहिती पुरविली ही बाब खरी मानली तरी त्यांनी अपिलार्थीस दिलेला हा प्रतिसाद देखील अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे दिनांक २४-०५-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती विलंबाने पुरविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, पुणे यांना जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, पुणे यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, भडगांव, जिल्हा जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग, जळगांव यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९६

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, नवापूर, जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर, जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. रविंद्र दंगल वाडिले, जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. बापू तुका पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केल्याप्रमाणे माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे दिनांक ०५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही अथवा या अपिलासंदर्भात कोणताही निर्णय पारित केला नाही, असे नमूद करुन उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालमर्यादेचे पालन न केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम,प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी यांचे नाव. - या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरव्दारे पाठविले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००७ रोजी काही माहिती पुरविली. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही सुनावणी घेण्यात आली नाही. (सदर सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००८ व ०९-०८-२००८ रोजी ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे हजर झाले नसल्याचे जन अपिलीय अधिकारी आज सांगत आहेत) जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस, दिनांक २३-०४-२००७ च्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेली ३० दिवसाची मुदत व्यपगत झाल्यानंतर दिनांक ०२-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व तदनंतर अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००७ रोजी काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या माहितीचे अवलोकन करता यामध्ये अपिलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ चा समावेश नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ७ व्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीकडे रुपये २००० इतक्या शुल्काची दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही टप्प्यावर आवश्यक असलेला सकारात्मक प्रतिसाद विहित मुदतीत दिला नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील अनुक्रमे कलम ७(१) व १९(६) चा भंग केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती पाठविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती विनामूल्य द्यावी लागेल तसेच अपिलार्थीकडून त्यांनी वरील माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० अपिलार्थीस परत करावे लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय ठरते, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून अपूर्ण माहितीपोटीचे शुल्क रुपये १२० इतके स्वीकारले आहे, ही त्यांची कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उशिरा दिलेला प्रतिसाद व त्या प्रतिसादाचे स्वरुप पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम, नंदुरबार यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० हे त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० हे त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

३. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम, नंदुरबार यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९७

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, अपिलार्थी
दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट,
तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, शिरपूर, जिल्हा धुळे

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, शिरपूर, जिल्हा धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र सन्मुखलाल सोनार, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, शिरपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुधाकर शांताराम सांगळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये रस्ते विकास कामांची माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व उशिरा माहिती दिली, त्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी अद्यापपावेतो या अपिलाची सुनावणी घेतली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण स्वरुपाची माहिती मिळाल्याच्या या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांनी यांच्या सुनावणीमध्ये कोणतीही कोणतीही भूमिका घेतली नाही. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कालमर्यादेचे पालन न करुन माहिती अधिकार अधिनियमतील तरतुदींचा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या अर्जावन्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते विकास कामासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - कामाचे नाव, योजनेचे नाव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम,प्रत्यक्ष झालेला खर्च, कामांची सद्यस्थिती, कामाचे सर्वसाधारण वर्णनाची प्रत व संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी यांचे नाव. - या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २३-०४-२००७ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या-कडील

दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्याप्रीत्यर्थ एकूण ६० रुपये इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार त्यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी दिनांक २०-०७-२००७ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००७ रोजीचे पत्र व अपिलार्थीचे दिनांक २६-११-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे या सुनावणीमध्ये निर्णय घेण्यात येत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे वेळीच सूचित केले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या शुल्काचा संपूर्ण हिशोब, जो, अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे त्यांनी देणे आवश्यक आहे, तो दिला आहे. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरलेले नाही, त्यामुळे अपिलार्थीस वेळेत माहिती प्राप्त न होण्यास तेच पूर्णतः जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या या पत्राचा उल्लेख द्वितीय अपील अर्जात केलेला नाही परंतु या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येते. आवश्यक त्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी माहिती विनामूल्य पुरविली आहे हे पाहता, अपिलार्थीचे सदर अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-११-२००८

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, धुळे, दैनिक राजरंग टाइम्स, बाफना मार्केट, तळमजला, महाराणा प्रताप चौक, मनपासमोर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९०७, १९०८, १९०९, १९१०, १९११, १९१२ व १९१३**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०७, १९०८, १९०९, १९१०, १९११, १९१२ व १९१३

निर्णय दिनांक २८-११-२००८

१ श्री. अच्युत जनार्दन इनामदार, अपिलार्थी
पोलीस निरीक्षक, दिव्य दर्शन अपार्टमेंट, बी-९,
विसेमळा, इच्छामणी गणपती मंदिरा शेजारी,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
पोलीस मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य,
पुणे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा पोलीस उप महानिरीक्षक,
पोलीस मोटार परिवहन, महाराष्ट्र, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | पोलीस उप अधीक्षक (प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ |

## निर्णय

वरील सात प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २८-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अच्युत जनार्दन इनामदार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. भगवान हरि परमार, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हणमंतराव शामराव पडवळ, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थींची राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २३-०५-२००७ रोजी नोंदणी झालेली सात व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी सर्वसाधारणतः असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही, काही प्रकरणांमध्ये ही माहिती त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये प्रथम अपील केल्यानंतर प्राप्त झाली होती व ती देखील अपूर्ण व चुकीची आहे, असे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी प्रत्येक अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः ०१-०२-२००७ रोजी ३, ०७-०३-२००७ रोजी ३ व दिनांक ११-०१-२००७ रोजी १ अशा एकूण ७ वेगवेगळया अर्जांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत विविध कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यभाराशी संबंधीत असल्याचे दिसते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे

विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीअन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी ०१, दिनांक १४-०३-२००७ रोजी ३ व १९-०४-२००७ रोजी ३ अशी सात प्रथम अपिले केली आहेत. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे अभिप्रेत आहे, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जांसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता या विषयासंदर्भात अपिलार्थीशी काही प्रमाणात पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. सदर पत्रव्यवहाराचे अवलोकन करता अपिलार्थी त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येते, तसेच या पत्रव्यवहारामध्ये अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कुठल्याही प्रकरणात दिल्याचे आढळून येत नाही. या सर्व बाबी लक्षात घेता व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वर उल्लेखित केलेल्या प्रथम अपील अर्जांवर प्रथमतः सुनावणी घेणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने सुनावणीसाठीचा कालावधी त्यांच्या तब्येतीच्या कारणास्तव वाढवून देण्याची आयोगास विनंती केली आहे, अपिलार्थीची सदर विनंती आयोगाने मान्य केली असून, सदर सुनावणी ३० ऐवजी ६० दिवसात घेण्याचे मान्य केले आहे. जेणेकरुन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी मिळू शकेल. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २३-०२-२००७, दिनांक १४-०३-२००७, व १९-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ६० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले निर्णय पारीत करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी वरील सुनावणी घेतांना अपिलार्थीस किमान १० दिवस अगोदर सुनावणीच्या नोटीसा प्राप्त होतील अशी व्यवस्था

करावी. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली सर्व व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९०७/२००७, १९०८/२००७, १९०९/२००७, १९१०/२००७, १९११/२००७, १९१२/२००७ व १९१३/२००७, ही सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२ जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २३-०२-२००७, दिनांक १४-०३-२००७, व १९-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर झालेला व संभाव्य विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ६० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले निर्णय पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अच्युत जनार्दन इनामदार, पोलीस निरीक्षक, दिव्य दर्शन अपार्टमेंट, बी-९, विसेमळा, इच्छामणी गणपती मंदिरा शेजारी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार

परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९१४

निर्णय दिनांक २८-११-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, अपिलार्थी
रा. मेन रोड, बोदवड,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.),
जिल्हा परिषद, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजाराम शंकर काळे, विस्तार अधिकारी, (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, जळगांव, जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अनिल बाळाजी लांडगे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १६-०१-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाप्रमाणे माहिती दिली नाही, जिल्हा परिषद, जळगांव व ग्रामपंचायत बोदवड हे संगनमताने शासकीय वापराच्या सार्वजनिक जमिनीवर अनधिकृत ठराव पारित करत असतात, कागदोपत्री चुकीची माहिती देत असतात. प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १६ अ हा बोदवड गावातून जातो परंतु सदर रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध नाही, सदर रस्त्यावर अनेक नावाने रुपये कागदोपत्री रस्ता दाखवून खर्च केलेले आहे. या रस्त्याची देखरेख जिल्हा परिषद, जळगांव बांधकाम विभागाच्याकडे असते, ग्रामपंचायत बोदवड हे निश्चित व खरी माहिती देत नाहीत तरी त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील खरी माहिती जन माहिती अधिकारी यांना देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बोदवड ग्रामपंचायत कमिटीच्या कामकाजाबाबत व इतर प्रशासकीय कामकाजाबाबत सन १९९८ ते २००६ या कालावधीतील माहिती एकूण ६ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीमध्ये -- कर्तव्यात कसूर केल्याबाबत प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार व कर्तव्य कोणाचे आहे, जिल्हा परिषद, जळगांव यांच्या दिनांक २२-०८-२००६ च्या पत्रातील मुद्दा क्रमांक ७ बाबत खुलासा व्हावा, दप्तर तपासणीचे अधिकार कोणास आहेत, आदेशाची पुर्तता झाली किंवा नाही हे पाहण्याचे अधिकार कोणास आहेत, ग्रामपंचायत बोदवड यांनी कर्तव्यात कसूर केला आहे याबाबत कामकाजाची पध्दत व स्थायी समिती जिल्हा परिषद, जळगांव यांची माहिती, संबंधितांचे फोन नंबर, फॅक्स नंबर, अधिका-याचे नांव, पदनाम, कर्तव्य याची माहिती, कामकाजाबाबत मुदतीचे बंधन असते याची माहिती, स्थायी समितीच्या प्रमुखाचे

नांव, पदनाम याची माहिती, दप्तर दिरंगाईचे बंधन जिल्हा परिषद, जळगांव यांचे कामकाजासाठी शासनाने अंमलात आणले आहे काय, माहितीकरिता जिल्हा परिषद यांच्या अखत्यारितील माहिती अधिका-यांची यादी, त्यांचे कर्तव्य, ग्रामपंचायत समिती बोदवड यांच्याबाबत शासनाने प्रदान केलेले अधिकार व कर्तव्य, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकार व कर्तव्याची माहिती व शासकीय रस्त्यांचे फी भाडे वसूल करणे, अनधिकृत ठरावाव्दारे शासकीय सार्वजनिक वापराच्या रस्त्यावर जागा देणे, न्यायालयात खोटे शपथपत्र व माहिती देणे, ग्रामपंचायत बोदवडच्या आर्थिक नुकसान करणेबाबत दखल घेणा-या अधिका-याची माहिती, चुकीचे ठराव व शासकीय वापराचे रस्त्यावर दिलेल्या जागेच्या प्रती -- या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस या पत्राव्दारे योग्य तो खुलासा केला आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २७-११-२००६ रोजी पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०१-२००७ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये प्रमुख जिल्हा मार्ग १६ अ हा रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध नसल्याचे जे विधान केले आहे ते असत्य

असून सदर रस्ता हा वाहतुकीसाठी उपलब्ध आहे. अपिलार्थीस केवळ त्यांच्या स्वतःच्या फायद्यासाठी ग्रामपंचायतच्या जागेवरील बांधकाम हलवून हवे आहे, त्यामुळे अपिलार्थी या रस्त्यासंबंधीची माहिती त्यांच्याकडे वारंवार मागत असतात. अपिलार्थी ज्या ज्या वेळी माहिती मागतात त्या त्या वेळेस त्यांच्यातर्फे ती वेळेत पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिलेली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर स्वरुप संमिश्र असे आहे. अपिलार्थीने जिल्हा परिषदेच्या अधिका-यांचे कर्तव्य, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारी अशा प्रकारच्या माहितीच्या मागणी बरोबरच जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व मोघम स्वरुपात विचारली आहे. उदा. आपल्याकडून दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्रमांक ७ चा खुलासा व्हावा, दप्तर दिरंगाईचे बंधन जिल्हा परिषद, जळगांव यांच्या कामकाजासाठी शासनाने अंमलात आणले आहे काय, अशी "माहिती" मागितली आहे, जी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमानुसार देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील उपलब्ध माहितीसंदर्भात त्यांचा खुलासा किंवा स्पष्टीकरण मागणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नसून, अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदाराला ठराविक पध्दतीचा अवलंब करुन यासंदर्भात आपला निर्णय देणे अशा प्रकारची तरतूद आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००६ रोजी दिलेले पत्र पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जावर खुलासा केल्याचे दिसून येत आहे. सदर खुलासा सर्वसाधारण परिस्थितीत संयुक्तीक आहे असे आयोगास वाटते. त्यांनी विचारलेल्या माहितीतील काही माहिती उदा. जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील सर्व जन माहिती अधिकारी यांची यादी, पत्ते इत्यादी. ग्रामपंचायतच्या

कर्तव्यसंदर्भात संबंधीत अधिका-यांची कर्तव्य व जबाबदा-या या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना संबंधीत विभागाच्या मॅन्युअलवरुन अथवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके व आदेश यावरुन अपिलार्थीस देणे जास्त संयुक्तीक ठरेल असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यातील "खुलासे" ही माहिती वगळून उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतून टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी "खुलासे" ही माहिती वगळून उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. मेन रोड, बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९१६

निर्णय दिनांक २८-११-२००८

१ श्री. मुरलीधर गणपत मराठे, अपिलार्थी

एम. २५, एम. आय. डी. सी. गोदावरी इंजि. कॉलेज मागे, जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नगर रचनाकार, जळगांव महानगरपालिका, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा. प्र.),

जळगांव महानगरपालिका, जळगांव

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगांव महानगरपालिका, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. दिपक मुरलीधर मराठे, अपिलार्थी श्री. मुरलीधर गणपत मराठे यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. देविसिंग हिलाल पाटील, जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, जळगांव महानगरपालिका, जळगांव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. नितीन सिताराम आढारी, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगांव महानगरपालिका, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. विजय चंपालाल लोढा हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८-०२-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी श्री. विजय चंपालाल लोढा यांच्या जळगांव येथील सि. टी. एस. नं. १८३८/१, प्लॉट नं. १३७ टी. पी. एस. जुना आठवडे बाजार ११२/अ/२ व सि. टी. एस. नं. १९७६/ब/८/१, या तीनही बांधकामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती देण्यास टाळाटाळ केली. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर निर्णय देऊन त्यांचे अपील मान्य करण्यात आले. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. विजय चंपालाल लोढा यांच्या ३ बांधकामासंदर्भात एकूण ३ मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- तिन्ही प्लॉटचे क्षेत्रफळ व नियमाप्रमाणे मंजूर प्लॅनच्या कॉपीज, नियमाप्रमाणे किती बांधकाम करता येते व सत्यपरिस्थितीत किती बांधकाम झाले आहे, एफ. सी. आय. पेक्षा किती बांधकाम जास्त झाले आहे, पार्कींगकरिता नियमाप्रमाणे जागा सोडली आहे काय -- या मुद्दयांचा समावेश होता. जन माहिती अधिकारी

यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच दिनांक १८-११-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील मंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाचे अवलोकन करता, त्यांच्याकडील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी ३० दिवसांची मुदत मागवून घेतली होती व त्याकरिता अपिलार्थीने थांबण्याची तयारी देखील दर्शविली होती. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास या टप्प्यावर कोणतीही अडचण नसावी असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये १८० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १२-०१-२००७ रोजी केला, तथापि सदर शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस व्दितीय अपील करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्दयांवर माहिती मागितली होती. यापैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधीत माहिती, ती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असली तरी ती अपिलार्थीस देय ठरते, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या मालकीच्या बांधकामाशी संबंधीत होती (मंजूर प्लॅनशी संबंधीत) ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असल्याने व त्रयस्थ पक्षाचे बांधकाम सर्वांना उघड उघड पाहता येत असल्याने त्यामध्ये गोपनीय स्वरुपाची अशी कोणतीही माहिती राहत नाही. त्रयस्थ पक्षाला या बांधकामाच्या विक्रीसंदर्भात व्यवहार करतांना मंजूर नकाशाच्या प्रती वेळोवेळी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर कराव्या लागतात. यास्तव अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गोपनीय अथवा वैयक्तीक स्वरुपाची, खाजगी अशा प्रकारची न राहता ती सार्वजनिक स्वरुपाची ठरते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अशा प्रकारे सार्वजनिक स्वरुपाची ठरत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार साहजिकच ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना सदर माहितीची आजही आवश्यकता आहे व त्यांना विचाराधीन अपील चालवावयाचे आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती, तथापि ही माहिती घेण्याकरिता अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थी यांच्याकडे ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी गेल्याचा कोणताही लेखी पुरावा उपलब्ध नाही. त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना दिनांक १८-०६-२००७ रोजी, त्यांच्या विरुध्द वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे केलेले तक्रारी अर्ज मागे घेतल्याचे ५० रुपये इतक्या किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिलेले आहे. तसेच अपिलार्थीने दिनांक १८-०६-२००७ रोजी जळगांव शहर महानगरपालिका आयुक्तांना उद्देशून एक पत्र दिले असून त्या पत्रामध्ये अपिलार्थीची त्रयस्थ पक्षाविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही, त्यांनी त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता नाही व त्रयस्थ पक्षासंदर्भाने केलेल्या सर्व तक्रारी त्यांनी मागे घेतल्या असल्याचे नमूद केले आहे. एवढे असूनही अपिलार्थी आज हे अपील चालवावयाचे आहे असे सांगत आहेत ही अपिलार्थी यांच्या वर्तनातील विसंगती आहे. एका बाजूला या पक्षाची माहिती ते माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागतात व माहितीची आवश्यकता नसल्याचे नमूद करुन त्या पक्षाशी सामंजस्य करार करतात, तर दुस-या बाजूला सार्वजनिक प्राधिकरण व आयुक्तांकडे ही माहिती आवश्यक असल्याचे प्रतिपादन करतात.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत देण्याचे आयोगास कबूल केले आहे. त्रयस्थ पक्षाच्या मंजुर प्लॅनचे अवलोकन करता त्यामध्ये

अपिलार्थीने मागणी केलेली सर्वसाधारणपणे सर्व माहिती उपलब्ध असल्याचे दिसून येते. त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीच्या विसंगत वर्तनाबाबत व त्यांच्या अपिलार्थीशी झालेल्या सामंजस्य करारासंदर्भात जो युक्तिवाद केला आहे तो पाहता अपिलार्थीच्या वर्तनातील विसंगती व त्या दोघांतील सामंजस्य करार या बाबी अपिलार्थी व त्रयस्थ पक्षामधील खाजगी बाबी आहेत व अशा प्रकारचा सामंजस्य करार, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीन्वये माहिती देण्यापासून प्रतिबंध करत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ०७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. ही माहिती देतांना त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना देण्यासाठी त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रुपये १८० इतके त्यांना परत करावे. ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित होणे अनिवार्य आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी वरील मुद्दयातील माहितीबरोबर, अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे घेतलेले रुपये १८० इतके त्यांना परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २८-११-२००८ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुरलीधर गणपत मराठे, एम. २५, एम. आय. डी. सी. गोदावरी इंजि. कॉलेज मागे, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९८

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, मनमाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अनिल जनार्दन पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, मनमाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शरद नागनाथ राजभोज, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-१२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-०२-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिली असल्याने व ती माहिती व्यवस्थित असल्याने त्यांचे दिनांक २२-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता निकाली काढण्याची विनंती केली असल्याने, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक १८९८/ २००७, दिनांक २२-१२-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८९८ /२००७, दिनांक २२-१२-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८९९

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
सार्वजनिक बांधकाम रोजगार हमी योजना विभाग, मनमाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुनिल दत्तात्रय जगताप, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शरद नागनाथ राजभोज, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-१२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-०२-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिली असल्याने व ती माहिती व्यवस्थित असल्याने त्यांचे दिनांक २४-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता निकाली काढण्याची विनंती केली असल्याने, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक १८९९/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८९९ /२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९००

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड, जिल्हा नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड, जिल्हा नाशिक |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. संदीप नारायण शिराडकर, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिलीप त्र्यंबक भदाणे, जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, अपिलीय अधिका-याने त्यांचे प्रथम अर्जाची दखल घेतली नाही, बुध्दीपुर:स्सर सुनावणी घेण्यास टाळाटाळ केलेली आहे त्यामुळे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यावर कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करावी अशी विनंती त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांच्याकडे त्यांच्याकडील शाखेमध्ये सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती निधी प्राप्त झाला व तो कोठे वापरला त्या सर्व कामांची सविस्तर माहिती पत्त्यासह मागितली होती, तसेच या अर्जामध्ये त्यांनी अपिलीय अधिका-याचे पूर्ण नांव, पत्ता, दूरध्वनी नंबर व भ्रमणध्वनी नंबर इत्यादीची माहिती मागितली होती. याच अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीचा तपशील या सदरापुढे "०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीसाठी आपल्या शाखेला किती निधी मंजूर झालेला आहे व खर्चाचे प्लॅनिंग" या स्वरुपाची माहिती मागविल्याचेही दिसून येते. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत उप अभियंता यांनी त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५५ इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात त्या शुल्काचा भरणा न करता सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ते २६-०९-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी उपस्थित राहिलो असता जन माहिती अधिकारी उपलब्ध होऊ शकले नाहीत व त्यांच्याकडून कोणीही भरणा स्वीकारला नाही. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनाक ०५-११-२००७ रोजी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले, तथापि सदर आदेश अपिलार्थीस मिळाले किंवा कसे हे अपिलार्थीचा आवश्यक तो पुरावा आयोगासमोर उपलब्ध न झाल्यामुळे सांगता येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांनी नाकारलेले नाही, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे. तथापि त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिला नाही व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः प्रथम अर्ज केल्यानंतर कधीही उपस्थित झाले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी उपविभागीय लिपीक यांची माहिती अधिकारी म्हणून व उपविभागीय अभियंता यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली होती. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील प्रथम अपील हे दोन्ही चुकीच्या प्राधिकरणाकडे केले होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीत जन माहिती अधिकारी यांना सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती निधी प्राप्त झाला व तो कोठे वापरला त्या सर्व कामांची सविस्तर माहिती अपेक्षिली आहे, तथापि 'सविस्तर' म्हणजे नेमक्या कोणत्या मुद्दयांवर अपिलार्थीस माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही, तथापि या अपील अर्जातील ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीसाठी किती निधी मंजूर झालेला आहे ही माहिती अपिलार्थीस देय ठरते. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून - सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षामध्ये त्यांना प्राप्त झालेला निधी, सदर निधी ज्या कामासाठी प्राप्त झाला होता त्या कामाचे नांव व सन २००७ ते २००८ या कालावधीमध्ये त्यांच्या उपविभागास प्राप्त झालेला निधी अपिलीय अधिकाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व फोननंबर (कार्यालयीन दूरध्वनी)- ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय ठरते. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ही माहिती १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा दिनांक २७-०७-२००७ रोजीचा अर्ज प्रत्यक्षात दिनांक ०९-०८-२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०८-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क कळविले, तथापि त्यांनी या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस जो तपशील कळविणे आवश्यक आहे (माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर) तो त्यांनी अपिलार्थीस कळविला नसल्याने त्यांचे दिनांक २९-०८-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरते. त्यामुळे त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल व ही माहिती अपिलार्थीस १० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूलही केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी निःसंशयपणे नाकारल्याचे या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००७ रोजी सुनावणीसाठी बोलाविले असता अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत, मात्र त्यांनी आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे असत्य विधान केले आहे. ही वस्तुस्थिती पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ श्री. नरेंद्र मधुकर लचके, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

३ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०१

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, त्र्यंबकेश्वर,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र दत्तात्रय आढाव, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, त्र्यंबकेश्वर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. कृपासागर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-१२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०६-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिली असल्याने व ती माहिती व्यवस्थित असल्याने त्यांचे दिनांक २४-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता निकाली काढण्याची विनंती केली असल्याने, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक १९०१/२००७ दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९०१/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०२

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, — अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सुरगाणा,
तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. युवराज एस. बि-हाडे, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सुरगाणा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. कृपासागर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-१२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०-०६-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिली असल्याने व ती माहिती व्यवस्थित असल्याने त्यांचे दिनांक २४-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता निकाली काढण्याची विनंती केली असल्याने, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक १९०२/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९०२/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सुरगाणा, तालुका सुरगाणा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०३

निर्णय दिनांक २७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर आर. जाधव,<br>एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,<br>४ थी स्किम, नवीन सिडको,<br>नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, येवला, तालुका येवला,<br>जिल्हा नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),<br>नाशिक | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अनिल उत्तमराव निकम, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शरद नागनाथ राजभोज, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-१२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २९-०२-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिली असल्याने व ती माहिती व्यवस्थित असल्याने त्यांचे दिनांक २४-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता निकाली काढण्याची विनंती केली असल्याने, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील क्रमांक १९०३/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९०३/२००७, दिनांक २४-१२-२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०४

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण,
जिल्हा नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग,
कळवण, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. भागवते संतोष शंकरराव, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. वाघ चंद्रकांत धवळू, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदणी झालेले केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात त्यांना पत्र पाठविले नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी हे सुनावणी घेणार नसल्याची त्यांना खात्री झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपील केल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ अर्जाव्दारे केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागास २००६-२००७ या वर्षासाठी एकूण मंजूर निधी किती, सदरील खर्च झालेला निधी केव्हा व कशा मार्गाने पब्लिश केला, आपला भ्रमणध्वनी व दूरध्वनी क्रमांक देणे इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक १८-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी गेले असता आवश्यक ते अधिकारी उपस्थित नव्हते व त्यांचा भरणा कोणीही केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित दिनांक ११-०९-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास दिनांक १७-०९-२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जावर त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीत म्हणजे दिनांक १८-०९-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१०-२००७ रोजी प्रथम अपील करणे पसंत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी परत त्यांना दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने निश्‍चितपणे कोणत्या लिपिकाकडे भरणा करावा त्याचा नावासह उल्लेख केला असून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीकडून कोणत्याही शुल्काचा भरणा करुन घेण्यापासून नाकारले नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे २ वेळा अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित करुनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केला नाही. अपिलार्थीच्या दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. सुनावणीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१०-२००७ रोजी पाठविले होते. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २७-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पोस्टाच्या पोचसहीवरुन दिसून येते. अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी कळवून सुध्दा अपिलार्थी हे या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये सुनावणीचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-१०-२००७ रोजी पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. सदर आदेश त्यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला व जन अपिलीय अधिकारी यांच्या त्यांनी प्रथम अपिलावर सुनावणी ठेऊन यासंदर्भातील आपले निर्णय पारित केले या विधानांचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेला या संदर्भातील पुरावा ग्राह्य मानण्यात येत आहे. या पुराव्यावरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळवूनही अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नाही. मात्र त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करतांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे म्हटले आहे जे वास्तवात धरुन नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. अपिलार्थीस जर खरोखरच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याची इच्छा असती तर ते सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिले असते व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा मनीऑर्डरद्वारे देखिल केला असता. तथापि व्यक्तिशः माहितीची अपेक्षा करुन ते कधीही माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः हजर राहिले नाहीत व आवश्यक शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्रत्येक टप्प्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद प्राप्त होऊनही अपिलार्थीने मात्र सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-याच्या कोणत्याही पत्रास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास मनीऑर्डरव्दारे शुल्क पाठविता आले असते परंतु त्यांनी शुल्क भरणा करण्यासाठी अशा प्रकारे कोठल्याही मार्गाचा अवलंब केला नाही. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीमध्ये, अर्जदारास सशुल्क माहिती देतांना अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे माहिती मागविणे व माहिती पुरविणे या घटनांमध्ये समसमान उत्तरदायित्व आहे, जितकी विहित मुदतीत माहिती पुरविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे तितकीच जबाबदारी अर्जदाराची, शुल्क भरण्यासंदर्भात आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून यासंदर्भात प्राप्त झालेल्या सूचनेस त्वरित व सकारात्मक प्रतिसाद देणे हे ख-या अर्जदाराकडून अभिप्रेत आहे व असे घडल्यासच माहिती अधिकाराचा मूळ हेतू सफल होईल अये आयोगास वाटते.** तथापि विचाराधीन प्रकरणी असे काही घडल्याचे आढळून येत नसल्याने या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीस अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य असेल तर त्यांनी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०५

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव,
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

अपिलार्थी

२ श्री. नरेंद्र मधुकर लचके,
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),
त्र्यंबक रोड, बांधकाम भवन, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),
त्र्यंबक रोड, बांधकाम भवन, नाशिक

प्रतिवादी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. प्रवीण वसंत नाईक, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. कृपासागर विठ्ठल जिरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव, व श्री. नरेंद्र मधुकर लचके हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी पत्र देऊन दिनांक १७-०९-२००७ सुनावणीसाठी बोलाविले होते. सुनावणीमध्ये प्रथम अपिलीय अधिका-याने उडवाउडवीची उत्तरे देऊन अपिलार्थीस खोटी माहिती देऊन खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यांना प्राप्त झालेली माहिती संशयास्पद असल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीमधील त्यांच्या विभागास प्राप्त झ ाालेल्या निधीसंदर्भात काही माहिती मागविली होती. याच अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कामामध्ये वापरलेल्या साहित्याचे नमुने दाखविण्याची विनंती केली होती. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत केलेल्या कामाची तपासणी

करण्याची इच्छा या अर्जामध्ये व्यक्त केली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक १७-०९-२००७ रोजी घेऊन आपला निर्णय एका पत्राव्दारे दिनांक १८-०९-२००७ रोजी पारित केला. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, "सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या सर्व शंकांचे त्यांनी योग्य निरसन केले, अर्जात नमूद केल्याप्रमाणे मुदतीचे आत माहितीच्या सत्यप्रती देण्यात आल्या, प्रत्यक्षात माहिती दाखवून व याउपरही अधिक काही माहिती विस्तृत स्वरुपात पाहिजे असल्यास माहितीचा अर्ज सादर करण्याबाबत अपिलार्थीस व्यक्तिशः सांगण्यात आले," तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रातील मजकूर अपिलार्थीस मान्य नसल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०७-०६-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी या पदावर श्री. बी. सी. सोनवणे नावाचे कनिष्ठ अभियंता कार्यरत होते. ते सध्या नाशिक उत्तर विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दाखविली असल्याचे अनुमान त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन काढले आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दाखविली असल्याचे कोणत्याही पुराव्याच्या उपलब्धते अभावी म्हणणे, आयोग मान्य करत नाही. अपिलार्थीने प्रथम अर्जामधील एकूण ३ मुद्दयांद्वारे एका मुद्याबाबत लेखी स्वरुपात माहिती मागितली आहे तर उर्वरित एका मुद्याव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे झालेल्या कामामध्ये वापरलेल्या साहित्याचे नमुने पाहण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे व याचबरोबर उर्वरित मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीत केलेल्या कामांची तपासणी करण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी काही प्रमाणात सुसंगत आहे, मात्र त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे निधीचा खर्च कशा पध्दतीने झाला याची सविस्तर माहिती द्यावी, असे म्हटले आहे. 'सविस्तर' म्हणजे नेमके काय याचा अपिलार्थीने येथे स्पष्ट उल्लेख केला नाही, त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमाक १ मधील या भागाची माहिती ती मोघम असल्यामुळे देय ठरत नाही, मात्र उर्वरित भागाची ही माहिती "आपल्या विभागास प्राप्त झालेला निधी" अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी हे यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगासमोर लेखी स्वरुपात सादर करु शकले नाहीत हे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ संदर्भात त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत संबंधीत कामामध्ये वापरलेले साहित्य अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे व कामाचे निरीक्षण करण्यास अपिलार्थीस परवानगी द्यावी.

वरील सर्व बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ संदर्भात हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत संबंधीत काम व कामामध्ये वापरलेले साहित्य अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ श्री. नरेंद्र मधुकर लचके, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

३ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),
त्र्यंबक रोड, बांधकाम भवन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), त्र्यंबक रोड, बांधकाम भवन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०६

निर्णय दिनांक २७-११-२००८

१ श्री. सुधाकर आर. जाधव, — अपिलार्थी
एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्किम, नवीन सिडको,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहुरी,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (कार्य), विभाग, अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मधुकर एकनाथ पाटील, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहुरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुरेश गोपाळराव देशपांडे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (कार्य), विभाग, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर आर. जाधव, व श्री. नरेंद्र मधुकर लचके हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे सुनावणीसाठीचे पत्र दिनांक १२-१२-२००७ रोजीचे त्यांना दिनांक १८-१२-२००७ रोजी प्राप्त झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दिनांक १७-१२-२००७ रोजी ठेवली होती. सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी उशिरा पाठविले असे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील संबंधीत सन २००६-२००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये -- त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला एकूण निधी, तो कोठे वापरला, व वापरला त्या कामांची सविस्तर माहिती, कामे कोणत्या ठेकेदाराने केली त्याची माहिती -- या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १३ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी गेले असता सदरचा भरणा संबंधीत कार्यालयाने स्वीकारला नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०१-२००८ रोजी पारित केले व या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी कधीही नाकारले नाही, याउलट अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. माहिती व्यक्तिशः मागवूनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही व्यक्तिशः उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी दिनांक १७-१२-२००७ रोजी झाली. या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर होते, त्यांच्या गैरहेजरीचे कारण त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलात सुरुवातीच्या परिच्छेदात वरीलप्रमाणे नमूद केले आहे. येथे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची किंचितही वाट न पाहता लागलीच दिनांक २८-१२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करावयाचे आहे, तथापि या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देण्याच्या आधीच (दिनांक ०९-०१-२००८ रोजी) अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. पुढे असेही दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये १३ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि सदर शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याचे अथवा शुल्क भरण्यासंदर्भात इतर मार्गाचा (मनीऑर्डर) अवलंब केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये असे म्हटले आहे की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता त्यांच्या शुल्काचा भरणा संबंधीत कार्यालयाने करुन घेतला नाही व जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात उपस्थित नव्हते, हा सर्व घटनाक्रम पाहीला असता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती खरोखरीच हवी होती किंवा कसे याबाबत आयोग संभ्रमित होत आहे कारण या प्रकरणी अपिलार्थीस माहितीची खरोखरच आवश्यकता असती तर ते माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरनेही पाठवू शकले असते, तथापि अशा प्रकारच्या कोणत्याही मार्गाचा अवलंब त्यांनी केला नाही, हे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे.

वरील संपूर्ण घटनाक्रम व अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यास केवळ तेच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने, वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहुरी,
जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (कार्य), विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९१५

निर्णय दिनांक २८-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>रा. मेन रोड, बोदवड,<br>जिल्हा जळगांव | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जळगांव | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजाराम शंकर काळे, विस्तार अधिकारी, (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, जळगांव, जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अनिल बाळाजी लांडगे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६-०२-२००७ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्जाप्रमाणे पूर्ण व खरी माहिती दिली नाही, त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे शासनाने प्रदान केलेले कर्तव्य केले नसून सरकारला फसविले गेले आहे. ग्रामविकास अधिकारी बोदवड यांनी माहिती अधिकाराप्रमाणे माहिती दिली नाही, असे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे, तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांचे कर्तव्य खरोखरच केले आहे किंवा कसे याची खरी, पूर्ण व अचूक माहिती खात्याचे दस्त व अभिलेख तपासून देण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८० ते २००६ या एकूण २६ वर्षाच्या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती एकूण दोन मुद्दयांव्दारे व अनेक उप मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कर्तव्य, अधिनियमातील कलम ४ (२) प्रमाणे असणा-या इतर बाबी, जिल्हा परिषदेच्या दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक ८ व १० नुसार ग्रामपंचायत ठराव क्रमांक १२/७ च्या प्रती, ग्रामपंचायतीच्या कामकाजामध्ये त्यांच्यावर नियंत्रण असणा-या अधिका-याची माहिती, बोदवड ग्रामपंचायतचे ठराव व कामकाज हे शासकीय अधिनियमानुसार आहे किंवा नाही याची २०००

पासून आजपावेतोची माहिती, माहिती अधिका-यासाठी मिळालेल्या गाव नकाशाच्या झेरॉक्स प्रती, ग्रामपंचायत यांच्या ठरावासंबंधी माहितीच्या ठरावाची प्रत -- या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक ०७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००६ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-११-२००६ रोजी पारित केले. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००६ रोजी माहिती पुरविली असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास असेही अवगत करुन देण्यात आले आहे की, अपिलार्थी हे वारंवार एकाच प्रकारची माहिती त्यांच्याकडे मागत असतात. अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तीक फायद्याकरिता बोदवड ग्रामपंचायत-च्या मालकीच्या काही जमिनीवर बांधकामे हलवून हवी आहेत. अपिलार्थीने वेळोवेळी याच विषयावर मागितलेली माहिती त्यांना प्रत्येक वेळी विहित मुदतीत पुरविण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमा-तील विहित तरतुदीनुसार दिनांक २९-१०-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे भाग होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ७ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खुलासेवजा काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०७-११-२००६ च्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्याने त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भातील माहितीबाबत खुलासा केला आहे व ग्रामपंचायत स्तरावरील माहितीच्या संदर्भा ती माहिती ग्रामविकास अधिकारी बोदवड यांना देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी केलेल्या युक्तिवादावरुन ही माहिती संबंधीत ग्रामविकास अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपिलासंदर्भात दिनाक २२-०९-२००६ रोजी पुरविली असल्याने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात ही माहिती पुरविले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या कथित माहितीवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात ब-याच अंशी खुलासा केलेला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती पाहता ही जिल्हा परिषद अधिनियम १९६१ मध्ये व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये समाविष्ट आहे असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दयांसंदर्भात माहिती अधिकार या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास विहित मुदतीत देण्यासंदर्भात निर्णय देणे असे अभिप्रेत आहे असे येथे नमूद करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे ती कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस पुरविणे अधिक उचित राहील, असे आयोगास वाटते. सदर कागदपत्रे आता त्यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागतील, ही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २० दिवसाच्या आत पुरविण्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. मेन रोड, बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२६
निर्णय दिनांक २९-११-२००८

| | | |
|---|---|---|
| 1 श्री. निमणखॉ उस्मानखॉ पठाण,<br>मु.पो.जांभोरे,ता.धरणगाव जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| 1 जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, जांभोरे, ता.धरणगाव<br>जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| 2 जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,धरणगाव<br>जि.जळगाव. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. रमेश काशिनाथराव कुलकणी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,जांभोरे, ता.धरणगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रामदास पुंजाजी मारोडकर,जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धरणगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. निमणखॉ उस्मानखॉ पठाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०४.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्ज अपिलार्थी यांनी जांभोरे ग्रामपंचायतीने इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल देण्यासंदर्भात तयार केलेल्या यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करण्यासंदर्भात दिला असल्याचे दिसून येते. या अर्जामध्ये अपिलार्थीने - "गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धरणगाव यांनी मुदतीत माहिती दिली नाही व त्याचप्रमाणे प्रकल्प संचालक यांनी अपील निकाली का काढले ? त्याचप्रमाणे ग्रामसेवक, जांभोरे यांनी पाठीशी का घातले जात आहे," अशाप्रकारची माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "दि. ३०.११.२००६ रोजी झालेल्या ग्रामसभेत प्रोसिडींग न लिहिता ती घरी लिहिले,माझी वैयक्तीगत मागणी असताना का डावलले." अशाप्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलासा केला. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः व्यक्तिशः देण्यासाठी प्रयत्न केले. तथापि हे पत्र अपिलार्थीने स्वीकारले नाही, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांचे हे पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाची पावती आयोगास दाखवली.त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.२३.१.२००७ रोजी याच माहितीकरिता प्रथम अपील केले. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे

प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे जांभोरे या गावात राहत नसून कधी त्यांचा मुक्काम जांभोरे येथे असतो तर कधी सूरत येथे असतो. इंदिरा आवास योजनेअंतर्गत त्यांना जांभोरे येथे एका निवासस्थानाची आवश्यकता आहे. प्रथमतः या गावामध्ये ज्यावेळी सन २००२ मध्ये दारिद्रयरेषेखालील व्यक्तिंचा सर्व्हे घेण्यात आला, त्यावेळी अपिलार्थी हे गावात उपस्थित नव्हते, त्यामुळे त्यांचे नाव दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या यादीमध्ये समाविष्ट होऊ शकले नाही. त्यानंतर राज्यभरातून वेगवेगळया ठिकाणांहून अशाप्रकारांच्या संदर्भात अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या, त्यानुसार ज्या व्यक्तिंनी इंदिरा आवास योजनेतील घरकुलासंदर्भात तक्रारी केल्या त्या तक्रारींची सुनावणी तहसील कार्यालयाकडून करण्याचे शासनातर्फे आदेशित करण्यात केले, परंतु यावेळीही अपिलार्थीने त्यांच्याकडे अर्ज केला नसल्याने अपिलार्थीचे नाव या यादीमध्ये समाविष्ट होऊ शकले नाही.

अपिलार्थीच्या दि. २१.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे नाव डावलल्याबाबतचा खुलासा अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल कोणतेही कारण अथवा खुलासा विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल, निर्णयाबद्दल अर्जदारास अशाप्रकारचा खुलासा, स्पष्टीकरण देणे अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्यासंदर्भात निर्णय घेणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे, हे पाहता, मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' चा विषय होऊ

शकत नाही. या प्रकरणामध्ये अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन त्यांचे वैयक्तिक काम जन माहिती अधिकारी यांच्याकडून केले जाणे अपेक्षित असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीचे काम न होण्यास ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, ही सर्व परिस्थिती पाहता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन असलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निमणखॉ उस्मानखॉ पठाण, मु.पो.जांभोरे,ता.धरणगाव जि.जळगाव.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,जांभोरा,ता.धरणगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धरणगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९१९
निर्णय दिनांक २९-११-२००८

| | | |
|---|---|---|
| 1 श्री. अनिल कृष्णराव पाटील,<br>रा.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| 1 जन माहिती अधिकारी<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. | : | प्रतिवादी |
| 2 जन अपिलीय अधिकारी<br>मुख्य सचिव (महसूल),<br>मंत्रालय,मुंबई. | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | चिटणीस,<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. |
| जन अपिलीय अधिकारी | उपआयुक्त (महसूल),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. बाळासाहेब मुरलीधर वाक्चौरे, जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. ओमप्रकाश देशमुख, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)* हजर आहेत, ल्ङ्क अपिलार्थी अनिल कृष्णराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०४.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे महसूल विभागाकडून झालेल्या अन्यायामुळे, अनियमिततेमुळे नुकसानीच्या बाबत प्रथम माहिती अधिकाराचा अर्ज दि. १८.१२.२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी मुख्य सचिव (महसूल) यांच्याकडे दि. ७.२.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज दि. १५.२.२००७ रोजी महसूल आयुक्तालय, नाशिक यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविला. परंतु आज अखेरपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या विनंतीबरोबर त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी या द्वितीय अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तर जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर हजर आहेत. अपिलार्थीच्या विचाराधीन द्वितीय अपिलासंदर्भात त्यांनी आयोगास अशी विनंती केली की, मूळात त्यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा दि. १८.१२.२००६ रोजीचा (प्रत्यक्षात सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीवर दि.२८.१२.२००८ नमूद केलेली आहे) कथित अर्ज व अपर मुख्य सचिव,महसूल यांच्याकडून अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झालेले नाहीत. त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगाकडे लेखी शपथपत्राद्वारे सादर केले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यास

आजरोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरण्यात येऊन, ही सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः दि. २८.१२.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे त्यांच्या स्वमालकीची विहिर महसूल प्रशासन व जिल्हा परिषद प्रशासनाने अवैधरित्या वापरल्यामुळे त्यांच्यावर झालेल्या कथित अन्यायासंदर्भात एकूण ६ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी वरील सर्व मुद्यांद्वारे (मुद्दा क्र. २ चा काही भाग वगळता उर्वरित सर्व) जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित केले आहे, जे माहिती अधिकार अधिनियमामध्ये कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणाही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय, खुलासे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ते अर्जदारास देणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस, मूळात त्यांच्या दि. २८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ चा काही भाग वगळता, उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.२ मधील अपिलार्थीने दि. ३१.८.२००६ रोजी विभागीय आयुक्तांकडे दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली आहे, अशी माहिती मागितली आहे, ती अपिलार्थीस देय ठरते, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.८.२००६ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील. अधिनियमाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याची विहित केलेली मुदत संपल्यामुळे, आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची व अपील

अर्जाची प्रत नुकतीच आयोगाच्या कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झालेल्या सूचनापत्रा (नोटीस)सोबत मिळाल्याचे त्यांनी कबूल केले आहे. तसेच त्यांनी आयोगासमोर असेही स्पष्ट केले की, या प्रकरणावर अपिलार्थी यांनी मा.लोक आयुक्त यांच्याकडे तक्रार केली असून, या तक्रारीची चौकशी चालू आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली असता, मानवी हक्क आयोगाने अपिलार्थीचे म्हणणे अग्राहय धरुन त्यांची विनंती फेटाळून लावली आहे. अपिलार्थी त्यांच्याकडे महसूल खात्याने अधिग्रहित केलेल्या विहिरीतील पाणी वापराबाबत व त्यांच्या झालेल्या शेताचे नुकसानीबाबत काही नुकसानभरपाई मागत आहेत. अपिलार्थीच्या वडिलांना त्यांची जमीन शासनाने १८ वर्षाच्या कराराने दिल्याचे दिसून येते, या जमिनीतील विहिर जी मूळात महसूल खात्याने अधिग्रहित केलेल्या या शासकीय जमिनीत असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे ही त्यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना, आयोगास सांगितले, या प्रकरणाच्या गुणवत्तेमध्ये आयोग अधिकारितेअभावी जाऊ इच्छित नाही. मात्र माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील जी माहिती देय आहे, ती जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य द्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती, हे आदेश निर्गमित होताच दहा

दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल कृष्णराव पाटील,इंदिरानगर, भडगाव रोड, पाचोरा,जि.जळगाव-४२४२०१.

२. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२०
निर्णय दिनांक २९-११-२००८

1 श्री. प्रभाकर मुरलीधर भगत, : अपिलार्थी
रा.नाशिक.

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
नाशिक जिल्हा ग्राहक पंचायत,
नाशिक.

2 जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: अपर जिल्हाधिकारी, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रभाकर मुरलीधर भगत (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), व श्री. रामचंद्र पवार, तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी, नाशिक जिल्हा ग्राहक पंचायत,नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०७.२००६ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीच्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास नकार दिला, त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलावर काहीही निर्णय दिला नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ६.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीच्या माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी, २००० ते मार्च,२००० या कालावधीतील काही माहिती मागविली असता, त्यांना संबंधित ग्राहक पंचायतीकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे दि. ११.५.२००६ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार प्रथम अपील केले.

अपिलार्थी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये त्यांचे असे म्हणणे मांडले की, त्यांना संबंधित नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी अन्नधान्य पुरवठा विभागाचे प्रमुख म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसून जिल्हाधिकारी नाशिक यांच्या दि. २५.८.२००५ रोजीच्या आदेशान्वये माहिती अधिकारातील प्रथम अपिलावर निर्णय घेण्यासाठी, अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांनी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे पाठवून दिला होता. तथापि नव्याने पारित केलेल्या

आदेशाप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या अन्य काही माहितीच्या अपील अर्जांवर त्यांच्याकडे सुनावणी घेतल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व या पृष्ठयर्थ काही कागदपत्रे आयोगास सादर केली. तथापि या कागदपत्रांमध्ये अपर जिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतल्याचे आढळून आले नाही.

या प्रकरणातील मूळ विषय लक्षात घेता, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नाशिक अथवा अशा प्रकरणी नियुक्त केलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास इष्ट वाटते. सबब अपिलार्थीचा सदर प्रथम अपील अर्ज, अपर जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे पाठवून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अथवा संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.अपिलार्थीचे या निर्णयाने समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नाशिक अथवा संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या

दि. ११.५.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रभाकर मुरलीधर भगत,२६,बालाजी विहार, अशोकस्तंभ,नाशिक-४२२ ००२

२. जन माहिती अधिकारी, नाशिक जिल्हा ग्राहक पंचायत, मंगलनगर, समाजमंदीर,बोहरा पार्कमार्ग, गंगापूररोड, नाशिक-४२२००२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (रजिस्टर्ड पोस्टाने)

४. जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२१
निर्णय दिनांक २९-११-२००८

1 श्री. दिपक दगडू जाधव, : अपिलार्थी
धुळे.

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,
धुळे.
2 जन अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,धुळे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय,
धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.गुलाबसिंग सिंगा वळवी, जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)हु अपिलार्थी,श्री. दिपक दगडू जाधव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०४.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्यास दिरंगाई केल्याचे व चुकीची माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३.११.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयाने त्यांच्या दि. २५.०१.२००६ रोजीचे पत्र क्रमांक DTMS/११८३ रोजगार मिळणेबाबत" - या विषयावर पाठविलेल्या पत्राबाबत पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. "मा. उपमुख्यमंत्रीसाहेब यांनी धुळे कलेक्टरसाो यांना काही इंग्रजी हस्ताक्षरात सुचना केली आहे त्या लेखी सह स्वाक्षरीचे पत्राची चौकशीचे लेखी स्वरुपात माहिती पाहिजे."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मूळ माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या नियुक्तीबाबत काय कार्यवाही करण्यात आली, याविषयीची माहिती हवी असल्याचे अनुमान काढून या पत्राद्वारे अपिलार्थीस योग्य तो खुलासा केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. १५.११.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.७.२००४ रोजी व दि. ७.९.२००६ रोजी आवश्यक तो खुलासा केला आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या पत्राच्या संदर्भात माहिती मागितली आहे, ते पाहता, असे दिसून येते की, सदर पत्र म्हणजे अपिलार्थीने

जिल्हाधिकारी, धुळे यांना दि. ०७.१२.२००५ रोजी त्यांना अपंग आरक्षणात सामावून घेण्याबाबत केलेला अर्ज आहे. या अर्जावर उपमुख्यमंत्री यांनी इंग्रजीत- " Collector,Dule- Pl. do the needful." असे जिल्हाधिकारी, धुळे यांना आदेशित करुन हे पत्र DTMS /११८३ या क्रमांकाने दि. २५.१.२००६ रोजी पाठविले आहे. या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस नोकरीची आवश्यक असून त्याकरता त्यांनी हरतऱ्हेने प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमापुरता विचार करावयाचा झाल्यास अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी स्पष्ट स्वरुपात केलेली नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे, असे दिसून येत आहे.या घटनाक्रमामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे, सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक दगडू जाधव,रा.सुभाषनगर, सुपडू आप्पा कॉलनी, जुने धुळे, जि.धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले क्रमांक १९२२/२००७ व १९२३/२००७

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२२ व १९२३
निर्णय दिनांक २९-११-२००८

| | | |
|---|---|---|
| 1 श्री. मनिष सुरजमल जाखेटे,<br>रा. देवपूर, धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| 1 जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>उपविभाग क्र.१,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.<br>साक्रीरोड, धुळे.<br>2 जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>शहर व ग्रामीण विभाग,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,लि.<br>साक्रीरोड, धुळे. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील दोन्ही प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. शामराव बाळकृष्ण चव्हाण, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग क्र.१ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.साक्रीरोड,धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)व श्री. साहेबराव गणपत मोरे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,शहर व ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,साक्रीरोड,धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर

अपिलार्थी श्री. मनिष सुरजमल जाखेटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०२.२००७ व ०४.०४.२००७ रोजी नोंदवलेली दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे, असे नमूद करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.८.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "दि.२६.०८.२००६ रोजी ओम क्रिटीक केअर सेंटर येथील वीज कनेक्शन तोडण्यात आले. यासाठी वीज कनेक्शन तोडण्याआधी हॉस्पिटल मॅनेजमेंटला कळविण्यात आले होते का? कोणत्या अधिकाऱ्याने हे आदेश दिलेत याविषयी आणि त्या अधिकाऱ्याने दिलेल्या लेखी आदेशाची प्रत मिळावी" ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी,एम.एस.ई.डि. धुळे या अधिकाऱ्याकडे केला होता. सदर अर्ज कार्यकारी अभियंता,एम.एस.डी.सी.लि.अर्बन अँड रुरल डिव्हीजन धुळे यांच्याकडे प्राप्त झाला तथापि ते स्वतः जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी या प्रकरणाशी संबंधित जे जन माहिती अधिकारी आहेत, त्यांच्याकडे हा अर्ज पाठवून दिला, सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः दि. १८.९.२००६ रोजी प्राप्त झाला. अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.१०.२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.या पत्रामध्ये त्यांनी, "दि.

२६.८.२००६ रोजी आपल्या ओम क्रेटीकल केअर सेंटर धुळेचा विद्युत पुरवठा तोडणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही," असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ३०.११.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही सुनावणी घेतली अथवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, 'ओम क्रिटीक केअर सेंटर'या हास्पीटलचा विद्युत पुरवठा त्यांनी दि. २६.८.२००६ रोजी खंडीत केला नव्हता, सदर पुरवठा त्यांनी दि. २५.८.२००६ रोजी खंडीत केला होता. सदर विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत संबंधित ग्राहकाला त्यांनी त्यांच्याकडील दि. १८.८.२००६ च्या पत्रान्वये पूर्वसूचना दिली होती. अपिलार्थीने त्यांच्याकडे असलेली थकबाकी पूर्ण न भरल्याने त्यांनी या सूचनेनंतर पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे आठ दिवसांत, दि. २५.८.२००६ रोजी अपिलार्थीचा विद्युत पुरवठा खंडीत केला. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असून, या माहितीपैकी विद्युत कनेक्शन तोडण्याबाबत हॉस्पीटल मॅनेजमेंटला कळविण्यात आले होते काय, हा भाग माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या प्रश्नांचे उत्तर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय नाही. याही उपर असे दिसून येते की, 'ओम क्रिटीक केअर सेंटर'या हास्पीटलचे विद्युत कनेक्शन तोडण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयाकडून दि. १८.८.२००६ रोजी अपिलार्थीस पूर्वसूचना दिली गेली होती. सदर नोटीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात आली होती. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दे लक्षात घेता, विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश ज्या अधिकाऱ्यांनी दिले, त्या अधिकाऱ्याच्या लेखी आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, उपकार्यकारी अभियंता, यांच्या दि. ३०.९.२००६ व कनिष्ठ अभियंता यांच्या दि. ४.१०.२००६ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती पाठविली, तथापि या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.७.२००६ रोजीच्या व संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी दि. ४.१०.२००६ रोजीच्या पत्राची प्रत साक्षांकित करुन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या अपील क्र.१९२२/०७ चे अवलोकन करता, अपिलार्थीने हीच माहिती या अपील अर्जासंदर्भात लोक आयुक्त यांच्याकडे मागितली होती. सदर अपील लोक आयुक्त यांच्या कार्यालयात दि. २५.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते, तथापि अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी वेगळा आयोग स्थापन झाला असल्याने व ही बाब त्याद्वारे लोकआयुक्त, उपलोकायुक्त यांच्या कार्यकक्षेबाहेर गेल्याने आणि मूळात अपिलार्थीचे अपील वर नमूद केल्याप्रमाणे निकाली काढल्यामुळे अपिलार्थीचे अपील क्र. १९२२/०७ हे, खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.१९२३/२००७ हे अंशतः मान्य व अपील क्र.१९२२/२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र. १९२३/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) अपील क्र.१९२२/२००७,दि. ०५.०२.२००७ खारीज करण्यात येत आहे.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनिष सुरजमल जाखेटे,वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे-४२४ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग क्र.१ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, साक्रीरोड,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,शहर व ग्रामीण विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,साक्रीरोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२४
निर्णय दिनांक २९-११-२००८

1 सौ.छाया चंद्रकांत कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.धुळे.

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
सरस्वती माध्यमिक विद्यालय,
शिरपूर जि.धुळे.

2 जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
श्री. हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, शिरपूर
जि.धुळे.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,धुळे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती माध्यमिक विद्यालय, शिरपूर,जि.धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) यांचे व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, श्री.हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट यांचे वकील श्री. योगेश डी.अग्रवाल, हे हजर आहेत, तर अपिलार्थी सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०२.२००७ रोजी नोंदवलेले (अपिलार्थीच्या

अपील अर्जावर दि.१३.२.२००७ अशी तारीख नमूद आहे.) द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने राज्य माहिती आयोगाकडे सदर अपील केल्याचे नमूद करुन, असे म्हटले आहे की, त्यांच्या दि. २३.३.२००६ व २३.११.२००६ च्या अर्जानुसार त्यांनी मागणी केलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली नाही. त्यांनी या अर्जाद्वारे - "जून २००३ ते ३१.३.२००४ पर्यंतच्या माध्यमिक मस्टरमधील त्यांच्या सहीच्या पृष्ठांच्या"- झेरॉक्स प्रती मागितल्या होत्या. या संदर्भात त्यांना मुख्याध्यापकाकडून दि. २१.११.२००६ रोजी पत्र प्राप्त झाले असून त्या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे दि.६.८.२००६ रोजीच्या पूरात नष्ट झाल्याचे म्हटले आहे. त्यासाठी अपिलार्थीने दि. २३.११.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमानुसार संबंधित पंचनाम्याची प्रत मागितली होती व किमान जून २००३ ते दि.३१.३.२००४ या कालावधीची माध्यमिक विभागात काम केल्याचे लेटरपॅडवर दाखला मिळावा, असा अर्ज केला होता, परंतु त्यांना पंचनाम्याची प्रत मिळाली नाही म्हणून दि. २३.१२.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी सचिव व अध्यक्ष यांच्याकडे अर्ज केला असता त्यांना कोणीही उत्तर न देता केवळ दोन्ही मुख्याध्यापकातर्फे दि. ५.१.२००७ नुसार अपिलार्थीस अनेक वेळा माहिती पाठविल्याचे खोटेच कळविले आहे,असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.११.२००६ व २३.११.२००६ रोजी दोन वेगवेगळया अर्जाद्वारे त्यांच्या सेवेशी संबंधित जून, २००३ ते दि. ३१.३.२००४ या कालावधीतील काही माहिती मागितली होती व जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.११.२००६ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख असलेल्या पंचनाम्याची प्रमाणित प्रत मागितली होती.

अपिलार्थीच्या दि. १७.११.२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती दि. ६.८.२००६ रोजी शिरपूर शहरात आलेल्या पूरात नष्ट झाली असल्याचे अपिलार्थीस नमूद करुन माहिती देण्याचे नाकारले. तसेच या पत्रामध्ये पुढे जन माहिती अधिकारी यांनी "या पूरस्थितीचा सरकारी पंचनामा करण्यात आला असून तो योग्य वेळी सादर करण्यात येईल", असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या पंचनाम्याची प्रत त्यांच्या दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असा खुलासा केला की,अपिलार्थी या त्यांच्या शिक्षण संस्थेमध्ये सन २००२ ते २००४ या कालावधीमध्ये तात्पूरत्या स्वरुपात शिक्षिका या पदावर कार्यरत होत्या. त्यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव नगरपालिका शिक्षण मंडळाकडे पाठविला असता संबंधित मंडळाने तो प्रस्ताव नाकारला, यावर अपिलार्थी या शाळा न्यायाधिकरण, नाशिक यांच्याकडे गेल्या असता त्यांचे अपील फेटाळण्यात आले. त्यानंतर त्यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पीटीशन दाखल केले असून सध्या हे प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमाचा गैरवापर करुन त्यांच्याकडे वेळोवेळी या माहितीची मागणी करीत असतात, अपिलार्थीस माहिती पाठविली असता त्या संस्थेकडून पाठविलेले पाकीटाचा स्वीकार करीत नाहीत. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी संस्थेने अपिलार्थीस पाठविलेली, "Refused" व "मालक घेत नाहीत,सबब परत" असा शेरा लिहिलेली दोन पाकीटे आयोगास दाखविली. त्यापैकी एका पाकीटामध्ये अपील सुनावणीबाबतचे पत्र असावे, असे अनुमान, या पाकीटावर लिहिलेल्या मजकूरावरुन काढण्यात येत आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्या संस्थेकडे माहिती

प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या वर्तनासंदर्भात त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या दि. १२.८.२००८ रोजीच्या एका माहितीसाठीच्या अर्जाची प्रत दाखवली, त्यामध्ये अपिलार्थीने अर्जातील मुद्दा क्र. ४ या सदरात असे म्हटले आहे की, वरील सर्व माहिती हस्तपोच हवी आणि बंद पाकीटात नसावी. माहितीच्या झेरॉक्स कॉपी बघूनच पोच देण्यात येईल, या सर्व उदाहरणावरुन जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या माहिती स्वीकारण्याबाबतच्या वर्तनाकडे आयोगाचे लक्ष वेधले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस कथित पंचनाम्याची प्रत व जून, २००३ ते दि.३१.३.२००४ या कालावधीत त्यांनी केलेल्या सेवेचा दाखला जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.त्यापैकी पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे आज सुनावणीमध्ये सांगितले व त्यासंबंधीत कागदपत्रे आयोगास दाखविली. या कागदपत्रांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस लिहिलेल्या दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस पंचनाम्याची प्रत पुरविली आहे, असा स्पष्ट उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रावर दि. ५.१.२००७ अशा तारखेचा उल्लेख नाही. मात्र सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.१.२००७ रोजी पोस्टात दिल्याबद्दल पोस्टाची पोचपावती दाखविली. तथापि या पत्रामध्ये पंचनाम्याची प्रत दिली असल्याचे स्पष्टपणे सिध्द होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील पंचनाम्याची प्रत त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीमध्ये अपिलार्थी उपस्थित न राहिल्यास त्यांना सदर पंचनाम्याची प्रत विनामूल्य देय होणार नाही. अपिलार्थीने

द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेला सेवाविषयक दाखला जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे, तथापि ही बाब पूर्णतः प्रशासकीय असल्याने अपिलार्थीच्या या माहितीच्या मागणीवर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. २१.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जान्वये संदर्भित केलेल्या पंचनाम्याची प्रत हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपिलार्थीने वरील आदेश क्र.२ प्रमाणे पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये स्वतः उपस्थित राहून व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. छाया चंद्रकांत कुलकर्णी-५अ,शारदानगर,शिरपूर,जि.धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,सरस्वती माध्यमिक विद्यालय, बाबूराव वैद्य मार्केट, शिरपूर, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, श्री. हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, बाबूराव वैद्य मार्केट, शिरपूर, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९२५
निर्णय दिनांक २९-११-२००८

1 श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी, रा.धुळे. : अपिलार्थी

**विरुध्द**

1 जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नाशिक. : प्रतिवादी

2 जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित आहेत.

1. श्री. श्रीकांत पांडुरंग शिवलकर विधी अधिकारी — जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नाशिक.

अपिलार्थी श्री. शेख निसार अहमद शेर महंमद तांबोळी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०४.२००७ रोजी नोंदवलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरवली नाही व कायद्याचे उल्लंघन करुन, अपील फेटाळले असून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाप्रमाणे शास्ती व कारवाई करण्यासाठी सदर अपील केल्याचे म्हटले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८.१०.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित,- धुळे शहरातून जात प्रमाणपत्र नामंजूर आदेशाविरुध्द, मुस्लीम ओबीसी उमेदवारांनी विभागीय समितीकडे अपील दाखल केलेली आहेत.त्यासंदर्भात एका विशिष्ट परिपत्रकात - माहिती मागितली होती, तर दुसऱ्या मुद्याद्वारे - धुळे शहरातून मुस्लीम ओबीसी उमेदवारांच्या समितीकडे आलेल्या अर्जासंदर्भात - माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३.३.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती/अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.१२.२००६ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात लिहिलेल्या या पत्रावर दि. २२/१२/२००६ व ३/३/---- अशा दोन तारखा नमूद केलेल्या आहेत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चित कधी माहिती पाठवली याचा बोध होत नाही. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, समिती मुस्लीम ओबीसी

जातनिहाय माहिती ठेवत नसल्याने अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देता येणार नाही. अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जातनिहाय मागितली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित असलेले विधी अधिकारी यांनी जातपडताळणी समितीची अशाप्रकारची कार्यपध्दती आज आयोगासमोर विशद केली आहे. जात पडताळणी समितीची ही कार्यपध्दती लक्षात घेता, या समितीच्या कामकाजाचे स्वरुप अर्धन्यायिक स्वरुपाचे असून त्यांच्याकडे दाखल होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर सदर समिती निर्णय घेत असते. अपील अर्ज प्राप्त झाल्यापासून ते निर्णय देईपर्यंत अपिलार्थीने अपेक्षिल्याप्रमाणे त्यांच्याकडे जातनिहाय कोणतेही अभिलेखे ठेवले जात नाहीत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात अपिलार्थीस त्यांनी ती देणे अभिप्रेत आहे. जातपडताळणी समितीकडे प्राप्त होणाऱ्या अर्जाची व अपिलांची संख्या (अंदाजे १२०००) लक्षात घेता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित समितीच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर उपलब्ध होऊ शकेल. माहिती अधिकार अधिनियमानुसार दाखल कागदपत्रे व अभिलेख्यांची तपासणी करण्याचे अधिकार अपिलार्थीस आहेत, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांची पहाणी करणे इष्ट राहिल, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येते. मात्र यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे अभिलेख्यांची पहाणी करण्यासाठी वेगळयाने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करावा लागेल.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील कलम ७(१) द्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जी माहिती अथवा जो प्रतिसाद अपिलार्थीस दि. २२.११.२००६ रोजी अगर तत्पूर्वी

देणे अधिनियमातील तरतुदीनुसार देणे अभिप्रेत होते. तो त्यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०३.२००७ (प्रत्यक्ष २२.१२.२००६/०३.०३) रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे दिसून येते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देण्याच्या त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यपध्दतीमुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब, संचालक, समाज कल्याण यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २९-११-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख निसार अहमद शेख महंमद तांबोळी, ३५,आविष्कार कॉलनी,चाळीसगावरोड,धुळे-४२४ ००१

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त(महसूल),विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, समाजकल्याण संचालनालय, चर्चरोड, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.